| संस्थापक : | साने गुरुजी |

# साधना

शनिवार
३० ऑगस्ट २००८
मूल्य रु. ८/-







के. आर. दातेप्रणित

## पर्यायी हरितक्रांतीचा मार्ग...

'पर्यायी हरितक्रांती'त
शाश्वत समृद्धीसाठी केवळ
निसर्गसंपत्तीच्या सुयोग्य वापराचा
विचार नाही; पारंपरिक शेती-ज्ञान व
पारंपरिक कारागिरी याला
आधुनिक विज्ञानाची जोड देत,
या मनुष्यबळाला सामावून घेत,
भूमिहिनांसह सर्व शेतकऱ्यांना
समान पाणी मिळण्यातून समतेकडे
वाटचाल होण्याची दिशाही त्यात आहे.
- अनंत फडके

**विशेष लेख :**

- समजून घ्यावे की ही सर्व ऊर्जा अपुरी आहे! - द. गो. भापकर
- शेती-विकासासाठी कोणी प्रयास करील काय? - रमेश पाध्ये
- कोंबडे झाकल्याने सूर्य उगवायचा थांबत नाही... - सुभाष आठले



एका महिन्यात दुसरी आवृत्ती!
वारी एक आनंदयात्रा
संदेश भंडारे
वारी एक आनंदयात्रा
मराठी माणसाच्या आस्थेचा
विषय असलेल्या,
वारी एक आनंदयात्रा
या छायाचित्रात्मक पुस्तकाला
दिलेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल
मराठी वाचकांचं
खास अभिनंदन !
मूल्य रुपये ३५०
ऑगस्टमध्ये प्रकाशित होत आहे
चंद्रमोहन कुलकर्णी
यांचे पुस्तक
कॉल ऑफ द सीज्
समुद्र आणि त्याची लेकरं
यांच्या
उत्कट नात्याची
संवेदनशील शब्द-चित्रे
मोठा आकार
पुठ्ठा बांधणी
आर्टपेपरवरील
१०४ रंगीत पृष्ठे
मूल्य रुपये ४०० । सवलतीत रुपये ३६०
सवलत मर्यादित काळासाठी
मनोविकासचे
आणखी एक
अभिमानास्पद
प्रकाशन !
मनोविकास प्रकाशन
६७२, नारायण पेठ, पुणे ३० दूरध्वनी : ६५२६२९५०

# पहिल्या सोनेरी किरणाच्या निमित्ताने...

१०८ वर्षाच्या ऑलिंपिक इतिहासात भारताने प्रथमच १ सुवर्ण व २ ब्राँझ असा पदकांचा तिरंगा फडकवला. देशाची मान अभिमानाने उंचावली. यश अनपेक्षित होते त्यामुळे तर आनंद आणखीनच वाढला. ऑलिंपिक इतिहासातील भारताची ही आजवरची सर्वोत्तम कामगिरी. ११५ कोटी लोकसंख्या असलेल्या देशाने एवढेसे तर मिळवले, त्याचे कौतुक कशाला? असे न म्हणता सकारात्मक दृष्टीनेच याकडे पहायला हवे.

हॉकीचा सुवर्णकाळ वगळता दुर्लभ असलेल्या सुवर्णपदकाचे दर्शन नेमबाज अभिनव बिंद्राने देशाला घडवले. भारतीय नेमबाजांच्या कर्तृत्वाचा गेल्या काही वर्षांचा आढावा घेतला तर हे यश दृष्टिपथातील होते असेच म्हणावे लागेल. जागतिक अजिंक्यपद आणि इतर अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांत भारतीय नेमबाजांनी आपला दर्जा गेली काही वर्षे उंचावत नेला आहे. अर्थात अभिनव बिंद्राची आर्थिक सुबत्ता हा भागही महत्त्वाचा आहे. नेमबाजी हा खूपच खर्चिक खेळ आहे. बिंद्राला वातानुकूलित शूटिंग रेंज घरीच उपलब्ध होता. मात्र अवघ्या वर्षापूर्वी झालेल्या पाठीच्या जीवघेण्या दुखण्यावर मात करीत त्याने हे यश मिळवले. त्यासाठी करड्या लष्करी शिस्तीसारखे प्रशिक्षण घेतले हेही महत्त्वाचे.

फ्री स्टाईल कुस्तीच्या६६ किलो गटात सुशीलकुमारने अनपेक्षितपणे कांस्य पदकाची कमाई केली. भारतीय मानसिकतेचा विचार करता हे पदक बरेच समाधान देणारे ठरले यात नवल नाही. सर्वसामान्यांचेच प्रतिनिधित्व करणाऱ्या विजेंद्रकुमारनेही ब्राँझ पदकाची कमाई केली. उपांत्य फेरीत विजेंद्र पराभूत झाला, पण तेथपर्यंत त्याने मारलेली धडकही देशातील नव्या खेळाडूंना संजीवनी देणारी ठरावी. क्यूबाच्या ज्या एमिलिओकडून विजेंद्रकुमार पराभूत झाला तो जागतिक क्रमवारीत विजेंद्रपेक्षा कितीतरी पुढे आहे. त्याच्या वीडलांनी १९८२ च्या ऑलिंपिकमध्ये बॉक्सिंगमध्येच सुवर्णपदक जिंकले होते. क्यूबा आणि बॉक्सिंग हे शब्द जणू एकमेकांना पर्यायी झालेले आहेत. याउलट परिस्थिती भारतात आहे, पहिल्यांदाच भारतीय बॉक्सरने ऑलिंपिकमध्ये पदकापर्यंत 'पंच' मारला. जितेंद्र, अखिल आणि विजेंद्र यांना फक्त चांगल्या मदतीची गरज आहे. २०१२ च्या लंडन ऑलिंपिकमध्ये क्यूबाच्या वर्चस्वाला आव्हान देण्याच्या त्यांच्या निर्धाराला प्रत्यक्षातले भरीव पाठबळ मिळायला हवे. बॅडमिंटनपटु सायना नेहवाल हिच्याबद्दलही अशीच आशा बाळगता येईल. मात्र या आनंदात वास्तवाच्या दुसऱ्या बाजूचा विसर पडू देता कामा नये. गेल्या १०८ वर्षांत ऑलिंपिकमध्ये भारताला फक्त १७ पदके मिळाली आहेत. आणि त्यातील अकरा हॉकीतील आहेत. खाशाबा जाधव यांना

स्थापण्या
समता शांती
ठेवुनी शुद्ध
**साधनां ।**
करिती साधना
त्यांना ठेवो
उत्स्फूर्त
**साधना**

**३० ऑगस्ट २००८**
वर्ष ६१ / अंक ३

- संपादक : **नरेंद्र दाभोलकर**
- युवा संपादक : **विनोद शिरसाठ**

- हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी साथीदार प्रिंटर्स, पुणे ३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, बॅ.गाडगीळ रस्ता, पुणे ४११०३०.** येथे प्रकाशित केले.
- दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, (०२०) २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स : २४४३२४०२
E-mail : ssadhana@vsnl.net साधना मीडिया सेंटर :- (०२०) २४४५९६३५ / ४१
web : www.sadhanatrust.com
- वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ४००/-, संस्थांसाठी रु. ५००/-
- (अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
- मुखपृष्ठ : शेखर गोडबोले : Mob. 9822503398

पहिले कांस्य पदक मिळाले. पहिले सुवर्णपदक मिळण्यासाठी भारताला तब्बल ५६ वर्षे वाट पहावी लागली. चीनला पहिले ऑलिंपिक सुवर्णपदक १९८४ साली प्राप्त केले. तो देश आता अमेरिका, रशिया यांना मागे सारून जागतिक पातळीवर पहिल्या क्रमांकावर पोचला आहे. अगदी चिमुकल्या जमैका देशानेदेखील हेवा वाटावा असे यश मिळविले आहे. लोकसंख्येच्या तुलनेत ऑलिंपिकमध्ये मिळणाऱ्या पदकांचा विचार केला तर भारताचे स्थान तळाशीच आहे, याची नोंद अंतर्मुख होऊन घ्यावयास हवी.

खेळातील यशाबरोबर क्रिडासंस्कृती रूजण्याचे काही अगदी वेगळे फायदे असतात. राष्ट्रीय एकात्मतेचा जेवढा सहजसुंदर व प्रगल्भ आविष्कार खेळाच्या मैदानावर दिसतो तेवढा तो क्वचितच अन्यत्र दिसत असेल. जात, धर्म, भाषा प्रांत या पलीकडे जाऊन एकत्र येण्याची मानसिकता खेळाच्या संस्कृतीत आपोआप घडते. झुंज निकराने द्यावी व पराभवही हसतमुखाने सोसावा हे व्यक्तिमत्त्व घडवणारे बाळकडूही खेळाच्या मैदानावर मिळते. परंतु आजच्या जगात झपाट्याने सर्व बाबींचे व्यावसायीकरण झाले आहे. त्यामुळे खेळाचा हा पैलू दुर्लक्षित झाला आहे. क्रिकेट या खेळाचे अतिरेकी मायाजालही त्याला कारणीभूत आहे. अशी क्रिडासंस्कृती व जागतिक पातळीवरचे देदिप्यमान यश याचा संबंध असेलच असे नाही. मात्र या स्वरूपाची क्रिडासंस्कृती व त्यातून निर्माण होणारी मानसिकता आणि त्यासाठी करावयाचे प्रयत्न ही एक स्वतंत्र पण महत्त्वाची बाब आहे, याची नोंद तरी आपण घ्यावयास हवी.

सर्वाधिक तरुणांचा देश असलेल्या भारताच्या क्रिडाक्षेत्राच्या पिछेहाटीला कारणीभूत असलेल्या अनेक बाबी आजही कायम आहेत. पायाभूत सुविधा व अत्याधुनिक प्रशिक्षणाचा अभाव, सरकारी पातळीवरील अनास्था, प्रायोजकांची ऑलिंपिक खेळाबद्दलची उदासीनता, क्रिडासंघटनाचे राजकारण अशी न संपणारी यादी आहे. पण यावर मात करण्याचा निर्धार व शहाणपणा शेवटी आपणच दाखवावयास हवा. अमेरिका, रशिया या महासत्तांना मागे टाकून सुवर्णपदकांची लयलूट करणाऱ्या चिनी खेळाडूंची शिस्त काय आहे? अथेन्स ऑलिंपिकनंतर त्यांनी फक्त सहा दिवसांची सुट्टी देऊन सुवर्णपदक विजेत्यांना सरावाला जुंपले. वर्षातून एकदाच आईवडिलांना भेटायला दिले. डझनावारी सुवर्णपदकांची लयलूट करायची तर अशीच करडी (काहींना क्रूरही वाटू शकणारी) शिस्त लागते.

भारतीय क्रिडाक्षेत्रातला आणखी एक पैलू सतत चर्चेला येतो. तो असा की, भारतातील जनजाती, जमाती, उदाहरणार्थ आदिवासी, फासेपारधी यांना जन्मजात काही कौशल्ये लाभलेली असतात. त्यांच्या कौशल्याचा शास्त्रीय विकास हा त्यांना व देशाला यशापर्यंत लवकर पोचवेल. त्यासाठी आदिवासी भागातील गुणवत्ता शोधून त्याला आकार देण्याचे काम भारतीय क्रिडा प्राधिकरणाच्या (साई) माध्यमातून कधीच सुरूही झाले आहे, पण आतापर्यंत अपवाद वगळता त्याला अपेक्षित फळ आलेले नाही. एका बाजूला अत्याधुनिक व शास्त्रीय ट्रेनिंग याचा अभाव, प्रशिक्षकांची मर्यादित कुवत या बाबी आहेत तर दुसरीकडे प्रशिक्षणार्थीही आंतरराष्ट्रीय पातळीवर पराक्रम गाजवण्याच्या इच्छेऐवजी केंद्र शासनाच्या सेवेतील नोकरी मिळणे यातच आत्मसंतुष्ट आहेत.

आजचे अत्युत्तम दर्जाचे क्रिडाशिक्षण विलक्षण महाग आहे. शिवाय आंतरराष्ट्रीय स्पर्धात भाग घेण्याचा खर्चही अफाट असतो. चीनमध्ये हा प्रश्न नाही, कारण शासनच हा सर्व भार उचलते. भारतात आरोग्य व शिक्षण यासारख्या अत्यावश्यक बाबीतून सरकार अंग काढून घेत असताना ते क्रिडा क्षेत्रावर किती खर्च करणार? प्रकाश पदुकोन व गीत सेठी या आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या कल्पनेतून साकारलेले ऑलिंपिक गोल्ड क्वेस्ट वा मित्तल चँपियन्स ट्रस्ट यांनी खेळाडू घडवण्याचे चालू केलेले कार्य उत्सावर्धक आहे. अनेक प्रायोजक भारतीय नेमबाजांना जाणीवपूर्वक मदतीचा हात देत आहेत हे आश्वासक आहे. स्वातंत्र्यानंतर ६० वर्षात प्रथमच ऑलिंपिकच्या बाबतीत परिवर्तन घडते आहे. आपणही चीनसारखी वा त्यापेक्षा दमदार गतिमान वाटचालीची अपेक्षा का करू नये? तसे झाले तर २०२० च्या ऑलिंपिकमध्ये भारताला खरे सोनेरी यश लाभू शकेल. सुवर्णपदक विजेत्या बिंद्राने अशी भावना व्यक्त केली की.. I sincerely hope my medal changes the face of India's olympic sports हे उद्‌गार सार्थ ठरावावयास हवेत.

व्यासपीठ

रजिया पटेल

१

**देशातल्या आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर स्नेहलता रेड्डी यांच्या 'सीता' नावाच्या नाटकाचा सरिता पदकी यांनी केलेला अनुवाद साधनामधून यदुनाथजींनी प्रकाशित केला. त्यातल्या सीतेनं मला झपाटून टाकलं. त्यातली सीता माझ्याच भावना बोलत होती. देशातल्याच नाही तर माझ्या अवतीभवती स्त्री म्हणून जी आणीबाणी समाजव्यवस्थेनं उभी केली होती, त्याविरुद्ध लढण्याची, बंडाची, विद्रोहाची भाषा त्यातली सीता बोलत होती. बंडखोरी करून मरण पत्करणं किंवा शरण जाणं हे दोनच रस्ते माझ्यापुढं आहेत. मला मरणाची भीती वाटत नाही, पण हा समाज त्याची ही नीती, धर्म या नावाखाली जे ढोंग भविष्यकाळपर्यंत चालवलं जाईल त्याला घाबरते मी. मला माहीत आहे, जग एका दिवसात बदलणार नाही. पण मी नाहीच शरण जाणार, मी स्वतंत्रपणे निवड करीन, माझी निवड आहे बंडाची. जीवनाचं मोल देऊन!**

# माझ्या बंडखोर जाणीवांचा प्रवास

माणूसपणाच्या हक्कासाठी आणि अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी माझ्या मनात पहिल्यांदा जाणीवा निर्माण झाल्या आणि मी आवाज बुलंद करण्यासाठी सिद्ध झाले तेव्हा अभिव्यक्तीसाठी सर्वप्रथम व्यासपीठ मला 'साधना' साप्ताहिकाने दिलं. २८ वर्षांपूर्वी सुरू केलेला लढा चालूच आहे. या लढ्याच्या अभिव्यक्तीसाठी गरज पडेल तेव्हा आणि मधूनमधून काही प्रश्नांवर काही मुद्द्यांच्या अनुषंगाने साधनात मी लिहीत आलेच आहे. पण 'व्यासपीठ' सदराच्या निमित्ताने पुन्हा एकदा साधनाने एक अवकाश प्राप्त करून दिला आहे, जो आयुष्याच्या या टप्प्यावर आवश्यकच होता.

१९८० ते ८२ या काळात मी माझ्या मनातील घुसमट व्यक्त करणारी अनेक पत्रे साप्ताहिक साधनाच्या संपादकांना लिहिली होती. यदुनाथ थत्ते हे तेव्हा साधनाचे संपादक होते. त्यांनी ३ एप्रिल १९८२ च्या साधना अंकात माझी पत्रे छापली होती. ज्या माणूसपणाच्या आणि समतेच्या हक्कासाठीच्या जाणीवांचा उल्लेख मी वर केला आहे. त्या जाणीवांची निर्मिती आणि त्याला बळ देणाऱ्यांमध्ये साधनाचं स्थान महत्त्वाचं होतं आणि यदुनाथजींची भूमिका फक्त संपादक इतकीच नव्हती, त्यापेक्षाही व्यापक होती. विशिष्ट सामाजिक, राजकीय विचारांचे प्रतिनिधी म्हणून त्यांचा समाजाशी असलेला संबंध, त्यांच्याबद्दल असलेला आदर या सर्व गोष्टी त्यात अंतर्भूत होत्या. त्यामुळे प्रचंड सामाजिक दडपणाखाली असतानाही साप्ताहिक साधनाच्या या संपादकापर्यंत आपलं म्हणणं आपली वेदना पोचवली पाहिजे असा विश्वास त्या किशोरवयीन अवस्थेतही मला वाटला.

मुस्लिम कुटुंबातून, मुस्लिम समाजातून अशा प्रकारच्या सामाजिक राजकीय चळवळीत आणि तेही मुलीने येणं ही आजही सहज न घडू शकणारी गोष्ट, वीस-पंचवीस वर्षांपूर्वी घडू शकली ती कशामुळे? याचा मी विचार करते तेव्हा मला दोन गोष्टी स्पष्टपणे जाणवतात त्यातली पहिली गोष्ट म्हणजे ज्या प्रकारच्या वातावरणात तुम्ही बालपण घालवता, वाढता, त्याचा तुमच्या मनावर, विचारांवर भावविश्वावर व्यक्तिमत्त्वावर न पुसला जाणारा ठसा उमटतो आणि दुसरी गोष्ट असते ती तुमच्या विचारांमुळे निर्माण झालेल्या नात्यांची.

माझे वडील पुणे येथील म.फुले कृषि विद्यापीठातून पदवी घेऊन बाहेर पडले. खरं तर त्यावेळी त्यांना मोठ्या पगाराची नोकरी मिळाली असती, पण त्यांनी गावात येऊन शेती करायचे ठरवले. ते प्रगतीशील शेतकरी होते तसेच गावात श्रमदान करून जी माध्यमिक शाळा सुरू केली होती, त्यात शिक्षक म्हणूनही काम करत होते. त्या काळात त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांसाठी जे साहित्यसंकलन केले ते माझ्याही वाचनात आले. त्याचा माझ्या मनावर खोल ठसा उमटला.

या साहित्य संकलनात कबीर, सूरदासपासून ते रस्कीन टॉलस्टॉय, मोपांसा यांचे विचार सांगणारे उतारे आणि भगवद्गीता, कुराण, बायबल यातील उतारेही आहेत.

माझ्या वडिलांचा लोकसंग्रह अफाट होता. त्यांच्यात नेतृत्व कौशल्य होतं. पण त्यांचा विश्वास सत्तातीत, धर्मातीत राजकारण व लोकनीती यावर होता. त्यामुळे त्यांनी कधीही कुठलीही निवडणूक लढवली नाही. गांधीजी, साने गुरुजी आणि राष्ट्रीय चळवळीचा वारसा घेऊन एका लहान गावातील मुस्लिम कुटुंबात जन्मलेल्या, आयुष्यभर शेतकरी म्हणून राबलेल्या, आणि अन्यायाविरोधात मी केलेल्या बंडखोरीत माझ्या पाठीशी राहिलेल्या, मी चळवळीत काम करत असताना समाजाच्या टिकेला तोंड देत राहणाऱ्या माझ्या वडिलांचा खोलवर ठसा माझ्या मनावर व बुद्धीवर पडला आहे.

माझा आत्तापर्यंतचा प्रवास मधून मधून कठीण आणि थकवणारा वाटला तरी मी वर नमूद केलेल्या दोन्ही गोष्टी म्हणजे ज्या वातावरणात मी वाढले ते माझं कुटुंब, गाव, माझा समाज त्यातून घडलेली मी आणि ज्या विचारांमुळे मी या लढ्यात आहे ते यांचा नेहमीच आधार वाटतो.

मी ज्या गावात वाढले ते भारतातील खेड्यांचं जे प्रातिनिधिक चित्र आहे, त्यापेक्षा काही वेगळं नव्हतं. माझ्या लहानपणी सातशे घरांची वस्ती तिथे होती, आता बरीच वाढली आहे.

गावात गावगाड्याची व्यवस्था आणि रचना होती. गावाच्या मध्यभागी एक ब्राह्मण कुटुंबाचं घर, मग लेवापाटील, मग मुसलमान नंतर सर्व बलुतेदार आणि जातीव्यवस्थेतला खालचा स्तर. मुख्य वस्ती लेवापाटील शेतकऱ्यांची. पंधरा वीस घरं पटेल, देशमुख या शेतकरी (यात शेतमजुरही होतेच) मुसलमानांची, एक-दोन घरं पठाण, मोगल, कासार (मुसलमान) आणि फकीर, बकरकसाब (खाटिक) यांची. गावातील सर्व

सवाष्णींना बांगड्या भरण्याचं काम मुसलमान कासाराचं, खाटिकही गावाचाच. फकीर कुटुंबातल्या पुरुषांचं काम होतं रमजान महिन्यात उपवासासाठी. पहाटे तीन वाजता मुसलमान घरातल्या सर्वांना जागं करायचं. सर्वांना रोजाच्या सहरीसाठी (सूर्योदयापूर्वी घ्यायचं जेवण, मग सूर्यास्तापर्यंत अन्न नाही की पाणी नाही असा रोजा) जो उठवायला यायचा त्याचं नाव अरमानशाह फकीर. आम्हाला सक्त ताकीद होती की त्याला 'अरमानदादा' म्हणायचं, नुसत्या नावानं हाक मारायची नाही. हा अरमानदादा हातात कंदील, पांघरूण गुंडाळलेला, खड्या सुरेल आवाजात एक गाणं म्हणून मुसलमान कुटुंबांना जागं करायचा. त्याचं गाणं, त्या गाण्याचे शब्द, त्याचा आवाज आजही मला आठवतो- ते गाणं कुठल्या तरी सिनेमातलं असावं. त्याचे शब्द होते....

*रातभर का है मेहमां अंधेरा*
*किसके रोके रूका है सवेरा*
*रात जितनी भी संगीन होगी*
*सुबहा उतनी ही रंगीन होगी*
*गम ना कर गर है बादल घनेरा*
*किस के रोके रूका है सवेरा*
*आ कोई मिलके तदबीर सोचे*
*सुख के सपनों की ताबीर सोचे*
*जो तेरा है वही गम है मेरा*
*किस के रोके रुका है सवेरा*

अरमानदादाच्या कुटुंबाचा दुसरा व्यवसाय होता लग्न आणि उत्सवांमध्ये ताशा आणि बँड वाजवणे. पण ते वर्षातून ठराविकच वेळेला मिळणारं काम. मुसलमान घरांना रोजच्या भाकरीसाठी हाक घालणं आणि ती गोळा करणं हे त्याचं रोजच्या उपजीविकेसाठी काम. मुस्लिम समाजव्यवस्थेतही असणाऱ्या जातिव्यवस्थेच्या उतरंडीवर तो खालीच होता. अरमानदादाचं घर गावगाड्यात खालच्या उतरंडीवर असणाऱ्या इतर जातींच्या वस्तीमध्येच होतं. याशिवाय एक घर सुताराचं, एक घर न्हाव्याचं, एक-दोन घरं मातंगांची, कुंभारवाडा सात-आठ घरांचा. चांभारवस्ती सात-आठ घराची, दोन घरं मारवाड्यांची सगळ्या गावाला किराणा पुरवणारी दुकानं त्यांची.

बारा बलुतेदारांव्यतिरिक्त शेतकऱ्यांच्या घरात सालगडी म्हणून काम करणाऱ्यांमध्ये मुसलमान आणि चांभार समाजाचे लोक मुख्यत्वे होते. आमच्याकडे असलेल्या सालगड्यामध्ये चांभार समाजातला होता. याच्याबाबतीतही आम्हाला सांगितले होते की, त्यांना 'भाऊ' म्हणायचे. इतकेच काय शेतीच्या रखवालीसाठी एक भिल्ल कुटुब होतं, त्यातल्या जंग्या भील हा आमचा जंग्याभाऊ. असेच मग सुपड्याभाऊ, रामभाऊ... या सर्वांना आमच्या स्वयंपाक घरापर्यंत प्रवेश होता. ईदच्या दिवशी या सर्वांचे जेवण आमच्या घरी केले जायचे, त्यांच्या पंक्तीला वाढण्याचे काम आम्हा मुलांचे असायचे.

याशिवाय तालुक्याच्या गावातून येणारा एखादा किरकोळ विक्रेता, चणे-फुटाणे विकायला येणाऱ्या भोईणी यांच्या दुपारच्या जेवण्याची व्यवस्थाही होऊन जायची. डोक्यावर टोपलं घेऊन वस्तू विकायला आलेल्या एका मुलाची तर आमची आजी, फक्त जेवणच नाही तर रात्र झाल्यास ओसरीवर झोपण्याची व्यवस्थाही करायची.

गावाच्या सीमेलगत एक ओढा होता. त्याला मधून मधून पाटाचं पाणी सोडलं गेलं की पाणी यायचं. या ओढ्यावर गावातल्या महिला धुणी-भांडी करायला येत. या ओढ्याच्या पलीकडे शेतं सुरू होत. ओढा ओलांडला की गावाच्या पूर्वेकडे एक महानुभाव पंथाचं मंदिर होतं. तिथे काळे कपडे घातलेल्या पुजारणी आणि गुलाबी फेटे घातलेले महानुभाव भक्त अधून मधून दिसत. एक मशीद होती.

अशा या गावात मुस्लिम शेतकऱ्याच्या कुटुंबात मी वाढले. आता मुस्लिम असं विशेषत्वाने नमूद करण्यासारखं काय तर धर्म आणि काही चालीरिती, विवाहपद्धती, सणसमारंभ वेगळे इतकंच.। बाकी काही फारसा फरक नव्हता. आमचं कुटुंब एकत्रकुटुंब होतं. त्यामुळे चार काका, काकू, चुलतभावंडं, मोठ्या बारदान्यात आश्रयाला असलेली माणसं, विधवा स्त्रिया, आले-गेले असा सर्व मोठा पसारा. या सर्व पसाऱ्यांची सूत्रधार माझी आजी. ती कुटुंबप्रमुख. आमच्या आजोबांना पहिल्याचं आठवलं नाही, ते आमच्या मोठ्या भावंडांच्या लहानपणीच गेले. माझी आजी गुजराती पद्धतीची साडी नेसायची, म्हणजे मागून समोर पदर तर तिच्या सुना सर्व पाचवारी गोल पातळ नेसायच्या. बुरख्याची पद्धत नव्हती, मात्र फारशा बाहेर पडत नसत. आम्ही सर्व नातवंडांना फ्रॉक, शर्ट आणि हाफचड्डी तर शाळेत जाणाऱ्या बहिणींना स्कर्ट ब्लाऊज अशी वेशभूषा. घरात बोलली जाणारी भाषा थोडीशी उर्दू आणि बरेचसे मराठी अशा मिश्रणातून तयार झालेली.

दरवर्षी घरातल्या कुणा ना कुणा भावंडाला शाळेत नाव दाखल करण्याचा समारंभ असे. छोटी भावंडं घरात राहत. शाळा मराठी माध्यमाचीच, शिवाय जिल्हा परिषदेची. गावातली सगळीच मुलं याच शाळेत येत, त्यामुळे जवळपास सगळ्याच समाजातल्या मुलांशी आमची मैत्री होई. त्यात काही जातीभेद विशेषत: आम्हा सर्वच भावंडांच्या मित्र-मैत्रणींमध्ये दिसला नाही. जिल्हा परिषदेच्या शाळेने आमच्यावर केलेला तो सर्वात महत्त्वाचा संस्कार आहे असं मला वाटतं.

आमच्या घरात दिवाळी, ईदही व्हायची. शेतकरी कुटुंब म्हणून आखाजी व्हायची (अक्षय तृतीया), बैलपोळा व्हायचा. त्यात बैलांना आंघोळ घालून त्यांच्या शिंगांना रंग, झूल, गोंडे इत्यादींनी सजवून त्यांना पुरणपोळी खाऊ घातली जायची. शिवाय दरवर्षी गावची जत्रा असायची. ईदच्या दिवशी गावातल्या लोकांना शिरखुरमा खायला बोलवायचं, दिवाळीच्या वेळी आकाशकंदिल मुलांनी घरीच बनवायचा. फटाके, फुलबाज्या आणायच्या. फराळाचे पदार्थ करायचे. कुंभाराने आणून दिलेल्या कोऱ्या पणत्या पाण्यात बुडवून ठेवायच्या. वाती वळून ठेवायच्या. संध्याकाळी आजी म्हणायजी 'लक्ष्मी आने का बखत हुवा दिया जलाओ'. सगळ्या पणत्या पेटवून घराच्या अंगणापासून ते कोनाड्यापर्यंत ठेवल्या जायच्या. 'दसरा सण मोठा, नाही आनंदा तोटा' हेदेखील असायचंच. वडील पांढरे शुभ्र धोतर, सदरा नेसून बाहेरच्या खोलीत बसायचे, ते दसऱ्याचं सोनं आणि मिठाई घेऊन. गावातली माणसं येऊन कोणी पाया पडायचं, कोणी भेट घ्यायचं, सोन्याची पानं दिली-घेतली जायची. संक्रातीचा हलवाही असाच दिला-घेतला जायचा. हे सगळं तर होतंच, शिवाय पैगंबर जयंती (मिलादून नबी वा ईद ए मिलाद)च्या रात्री रात्रभर जागरण करून नमाजपठण, त्यात पैगंबर

गीतं म्हणायची. याशिवाय पंढरपूरची वारी, कीर्तनाचा गजर. हाजी मलंगच्या डोंगरावर गावातील हिंदू मुसलमानांसकट सगळे जायचे. असे वर्षभर भरगच्च सणवार असायचे. शिवाय सुगीच्या दिवसात रामायण, महाभारत नाटक मंडळी यायची. त्यांची नाटकं, रामलीला बघायला जायचे, शिवाय शिवाय कव्वालीचा कार्यक्रम इथंपासून ते शाळेतले मित्र-मैत्रिणींसोबत शेतात केलेली भरीतपार्टी ते भुलाबाई-भुलोजी आणि भोंडला, इथंपर्यंत. हे सर्व सांगायचे कारण म्हणजे स्वत:ची जडणघडण म्हटली तर त्यात या सगळ्याच गोष्टी आल्या. यातली एकही गोष्ट मला माझ्यापासून वेगळी करता येईल का? किंवा माझ्या मनातून त्या नाहीशा करता येतील का? अशक्यच आहे. भारतीय गाव किंवा समाजाची ही जी एकरूपता आहे, ती आज दोन्हीकडच्या धर्मांध शक्ती जाणून-बुजून तोडायचा प्रयत्न करीत आहेत हे पाहून मन विषण्ण होतं.

आमचे कुटुंब म्हणजे मोठा बारदानाच, त्यामुळे मोठ्या काकांपासून ते छोट्या काकांपर्यंत, आईपासून काकू-आत्यापर्यंत आणि मोठ्या चुलत भावंडांपासून ते धाकट्या चुलतभावंडांपर्यंत या सर्वांचेही अंश माझ्या या जडणघडणीत आहेत. माझी मोठी आत्या तिच्याकडे तर सात-सात दिवस चालणाऱ्या कहाण्यांचा साठा होता. शिवाय मन्नत (नवस) फिटण्यासाठी मोहोल्ल्याच्या महिलासभेत वाचल्या जाणाऱ्या जनाबे सय्यदाच्या कहाण्या 'हार खुंटीने गिळला...' याही होत्याच. शाळेत जाणाऱ्या माझ्या मोठ्या ताईने केलेले संस्कार नीटनीटके, स्वच्छ राहण्याचे, मन लावून अभ्यास करण्याचे. शिवाय नीतीमूल्ये सांगणाऱ्या कथा सांगून केलेले संस्कार. तिने एक वही केली होती, ज्यात ती गांधीजींच्या वर्तमानपत्रातून येणाऱ्या गोष्टी कापून चिकटवत असे. त्यांची चित्रे चिकटवत असे. त्या वहीमध्येच मी पहिल्यांदा 'उचललेस तू मीठ मूठभर, साम्राज्याचा खचला पाया' हे ग.दि.माडगूळकरांचे गीत वाचले आणि पुढे शाळेत सामूहिकरित्या म्हटले. लेखन-वाचनाचा पहिला संस्कार माझ्या आईने केला, ती आमच्या घरातली एकमेव साक्षर सून गावात ज्या मोजक्या घरात वर्तमानपत्र यायचे, त्यात आमचं घर होतं. शिवाय आमच्याकडे साधना साप्ताहिकदेखील येत होतं. आई वर्तमानपत्र वाचायची, आम्ही सर्व बहीण-भावंडंही वर्तमानपत्रं आणि साधना वाचायचो. आमची वाचनाची आवड वाढली ती माझ्या सर्वात धाकट्या काकांमुळे ते तालुक्याच्या गावी गेले की आमच्यासाठी एखादं तरी लहान मुलांचं मासिक, गोष्टीचं पुस्तक घेऊन येत, त्यात हिंदी, मराठी दोन्ही भाषांमधील पुस्तकं असत. माझ्या वडिलांनी साधना साप्ताहिकाची वर्गणीच माझ्या नावाने भरली होती, त्यामुळे साधना साप्ताहिक वाचणं आपलं कर्तव्यच आहे असं मला वाटायचं. पुढे गावानेच प्रयत्न करून सुरू केलेल्या माध्यमिक शाळेत, ज्याला हायस्कूल असं म्हटलं जायचं, त्या शाळेने आणि शाळेच्या वाचनालयाने माझी वाचनाची ओढ वृद्धिंगत केली. चांदोबा, कुमार, किशोर, एकलव्य, आनंद यांसारख्या मुलांच्या मासिकांपासून ते पराग, धर्मयुग सारख्या हिंदी मासिक-साप्ताहिकांपर्यंत साहित्य वाचनासाठी उपलब्ध झालं. त्यातून मराठी सोबत हिंदीचीदेखील गती वाढली. वक्तृत्व स्पर्धामध्ये भाग घेतल्यावर बक्षीस मिळायचं, ते पुस्तकांचंच. कुटुंब, समाज आणि गाव या पाठोपाठ जर माझ्या जडणघडणीवर प्रभाव असला तर तो या वाचनाचा आहे. भाषा विषयाची पाठ्यपुस्तके माझी जास्त आवडती. बहिणाबाईंच्या कवितांपासून कवियित्री पद्मजा...

*दु:ख नको टीचभर हृदयाचे*
*दु:ख नको ओंजळभर प्रीतीचे*
*दु:ख नको भिंतीतच उबणारे*
*दु:ख नको छपरातच दबणारे*
*दु:ख असावे असे विशाल*
*घेईल ते निज कवेत क्षितीताला*
*दु:ख हवे गरुडाचे गर्वोहत*
*मातेच्या मुक्तीसह आणील जे जगी अमृत*
*प्रभू तुझ्या हास्यासम करुणामय*
*दु:ख हवे ही*

आणि रामावतार त्यागीच्या 'पर मै बेईमान समय को अपना अहम नही बेचूंगा' पासून ते हरिवंशराय बच्चन यांच्या 'नन्हे पौधे और वृक्ष' यांचा संवाद... कवी बी यांची कविता.

*तेजाचे तारे तुटले मग मळेची सगळे पिकले*
*लागती दुहीच्या आगी राष्ट्राच्या संसाराला*
*अति महापूर येतो ढोंग्यांच्या पावित्र्याला*
*खडबडाट उडवी जेव्हा, कोरड्या विधींचा मेळा*
*चरकात मान्यवर पिळती, सामान्य मुकी जनता ती*
*कौटिल्य स्वैर बोकाळे तेजाचे तारे तुटले*

अशा सगळ्या भाषा साहित्याने माझं मन आणि विचारविश्व घडवलं. भोवतालच्या स्त्रियांची दु:ख, आसपासची दु:खं, स्वत:ची होणारी कोंडी ही स्पष्टपणे पाहू शकले ती त्यातून. सभोवतालच्या दु:खांची जाणीव आणि त्याविरुद्ध लढलं पाहिजे, तो लढा कसा असेल याची दिशा साधनातून मिळाली.

देशातल्या आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर स्नेहलता रेड्डी यांच्या 'सीता' नावाच्या नाटकाचा सरिता पदकी यांनी केलेला अनुवाद साधनामधून यदुनाथजींनी प्रकाशित केला. त्यातल्या सीतेनं मला झपाटून टाकलं. त्यातली सीता माझ्याच भावना बोलत होती. देशातल्याच नाही तर माझ्या अवतीभवती स्त्री म्हणून जी आणीबाणी समाजव्यवस्थेनं उभी केली होती, त्याविरुद्ध लढण्याची, बंडाची, विद्रोहाची भाषा त्यातली सीता बोलत होती. ती म्हणत होती- 'अशा परिस्थितीत मी काय करावं? मला उत्तराची अपेक्षा नाहीच. बंडखोरी करून मरण पत्करणं किंवा शरण जाणं हे दोनच रस्ते माझ्यापुढं आहेत. मला मरणाची भीती वाटत नाही, पण हा समाज त्याची ही नीती, धर्म या नावाखाली जे ढोंग भविष्यकाळपर्यंत चालवलं जाईल त्याला घाबरते मी. पुरुष जातीच्या भयंकर दडपणाची भीती वाटते मला. आम्ही स्त्रिया भुवया न उंचावता मान तुकवतो. पुरुषाचं अधिराज्य स्वीकारतो आपल्या आत दु:ख सोसतो काही न बोलता. पण मी नाहीच शरण जाणार, मी स्वतंत्रपणे निवड करीन, माझी निवड आहे बंडाची, जीवनाचं मोल देऊन. मला माहीत आहे, जग एका दिवसात बदलणार नाही.'' तेव्हापासून तुम्ही मला संपवू शकाल माझ्या विचारांना नाही. ही भावना मनात सततची जागी राहिली अगदी सिनेमाबंदीच्या लढ्यापासून ती आजतागायत.

(क्रमश:)

**रजिया पटेल**
P-17, सुयोग हाईट्स, रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे ४११०३८.
raziap@gmil.com.
Mob. : 9823074054

कानगोष्टी

# ओळख

माझी मुलगी या वर्षी दहावीची परीक्षा चांगल्या गुणांनी पास झाली. एस.एस.सी. बोर्डाने दोन वर्षापासून गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणे बंद केले, अन्यथा तिचे नाव गुणवत्ता यादीतही आले असते, तरी झाडून सगळ्या वर्तमानपत्रांतून शाळेच्या निकालाबरोबर तिचे नाव झळकले... सगळीकडे चर्चा झाली. तिचे अभिनंदन करण्यासाठी अनेकजण येऊन गेले.

निकालानंतर दोन दिवसांनी एक मोठी व्यक्ती तिचे अभिनंदन करण्यासाठी आली. तशी त्या व्यक्तीची आणि माझी फक्त ओळख होती, दाट परिचय किंवा घरगुती संबंध म्हणावेत एवढे आमचे घनदाट नाते नव्हते. हातात मोठासा फुलांचा गुच्छ आणि पेढ्याचा पुडा घेऊन त्यांनी आमच्या घरी आगमन केलं. नमस्कार वगैरे घालून झाल्यावर त्यांनी कन्येला बोलावलं. आमची कन्या त्यांच्यापुढे आली, त्यांनी तिचे अभिनंदन करीत फुलांचा गुच्छ आणि पेढ्याचा पुडा तिच्या हाती दिला. पुन्हा एकदा तिचे अभिनंदन केले. पुढे काय करणार वगैरे विचारले. इतर मुले जे उत्तर देतात तेच तिने दिले. तिला इंजिनियर वगैरे व्हायचं आहे.

कन्या त्यांच्या पायावर डोकं ठेवून आत गेली. चहा-पान झाल्यावर ते गृहस्थही निघून गेले. जाताना आपण तिच्या भावी शिक्षणासाठी मदत करू असं म्हणाले. स्वत:ही दहा हजार रुपयांची मदत देण्याचे कबूल केले.

सर्वसाधारणपणे हुशार मुलांच्या बाबतीत घडतो तोच प्रसंग माझ्या घरात माझ्या मुलीच्या बाबतीत घडला, पण खऱ्या अर्थाने मला नंतर अवघडल्यागत वाटू लागलं. ते गृहस्थ गेल्यावर कन्येने मला विचारलं, ''कोण होते ते?''

नेहमीसारखाच तिचा साधा प्रश्न, पण त्या प्रश्नाचे उत्तर देताना मला काय बोलावं ते कळेना. माझी परिस्थिती खूपच अवघडल्यागत झाली.

येऊन गेलेले गृहस्थ समाजातले मोठे पुढारी वगैरे नव्हते, ते एका पतसंस्थेचे अध्यक्ष होते. गेली दहा वर्षे त्यांची पतसंस्था समाजात नावाजली होती, पण मागील वर्षी त्या पतसंस्थेत अध्यक्षांनी आणि तिच्या संचालकांनी मोठा भ्रष्टाचार केला होता. अनेक सभासदांचे पैसे त्यांनी पळवले होते. ठेवीदारांच्या ठेवी गिळंकृत केल्या होत्या. गोरगरिबांच्या घामाचे पैसे लंपास केले होते, पुढे पोलिसकेस वगैरे झाली. अध्यक्षांना अटक झाली. त्यातून ते सहीसलामत सुटलेही.

अध्यक्षांनी गिळंकृत केलेल्या पैशांतून ठाणे परिसरात शंभराहून जास्त एकर जमीन खरेदी केली होती. तिथे हौसिंग सोसायटी बांधली होती. त्याचा भरपूर पैसा अध्यक्षांच्या हातात खेळत होता. आता ते समाजात मोठ्या मानाने जगत होते. समाजसुधारणेत आपल्याला जास्त रस आहे असे दाखवीत होते. शाळातील मुलांना वह्या-पुस्तकाचे वाटप करीत होते, हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देत होते. आणि माझ्या मुलीने विचारले, 'कोण आहेत ते?'

तिला या सद्गृहस्थाची ओळख काय म्हणून करून देऊ? जीवनाच्या एका नवीन वळणावर उभ्या असलेल्या तिच्यासारख्या बुद्धिमान मुलीला एका भ्रष्टाचारी माणसाची ओळख सांगू? शिक्षणाशी ज्याला काही देणंघेणं नव्हतं, जो स्वत: दहावी नापास झाला होता आयुष्यात जगण्यासाठी जी लबाडी लागते त्या लबाडीत मेरीटने पास होऊन कोट्यवधी रुपये ज्याने जमविले होते, त्याच्या कर्तृत्वाची ओळख तिला कशी करून देऊ?

जीवनात यशस्वी होण्यासाठी त्याने जो मार्ग निवडला होता, त्या मार्गाची ओळख माझ्या मुलीला झाली तर तिचा शिक्षणावर विश्वास बसेल का? आतापर्यंत फक्त शिक्षणानेच माणसाचा विकास होतो हे तत्त्वज्ञान आम्ही उभयतांनी मुलांच्या मनावर बिंबवले होते, त्याला तडा जाण्याची वेळ आली होती.

बरं खोटं बोलण्याचा आपला स्वभाव नाही. मुलांसमोर तर नाहीच नाही. अशावेळी काहीतरी तडजोडीचं बोलणं भाग पडतं, म्हणून मी तिला म्हणालो,

''समाजात यशस्वी होणारी माणसं दोन प्रकारची असतात, एक शिक्षण घेऊन यशस्वी होणारी आणि दुसरी न शिकता यशस्वी होणारी. तो माणूस दुसऱ्या प्रकारातला आहे. फरक एवढाच की शिक्षण घेऊन यशस्वी होणारी माणसं समाजातल्या चांगल्या मूल्यांच्या आधाराने यशस्वी होतात. शिक्षण न घेतलेली माणसं कोणत्याही मार्गाने यशस्वी होतात, पण त्यांना जेव्हा मूल्यांच्या मार्गावरून शिक्षण घेत जाणाऱ्या हुशार माणसांचं महत्त्व पटत तेव्हा ते त्यांचा गौरव करण्यासाठी पुढे येतात. सध्याच्या घडीला त्यांच्यात एवढा जरी बदल दिसला तरी खूप झालं. त्यांच्या हातून सत्कार स्वीकारून आपण अशाही माणसात बदल घडवण्याचा प्रयत्न करू या.''

माझ्या मुलीला काय कळलं कोण जाणे, तिने तो विषय तेथेच थांबवला.

**प्रा. साईनाथ पाचारणे**
प्राचार्य, डी.एड.कॉलेज भोर, ता.भोर, जि. पुणे.
भ्रमणध्वनी : 9326092428

# गुलाबाचे काटे

शुक्रवारचा दिवस. सकाळी खिडकीतून बाहेर पाहिले. एका हातात आईचा हात, अन् दुसऱ्या हातात टपोरा गुलाब घेतलेला एक विद्यार्थी शाळेला जाताना दृष्टीस पडला. काही वेळाने इमारतीतून खाली उतरलो. समोर मुलांची प्रचंड गर्दी दिसली. प्रत्येकाच्या हातात गुलाबच दिसत होता. शाळेच्या फाटकाबाहेर गुलाबविक्रेत्या महिला बसल्या होत्या. त्यांच्याभोवती मुलांचा-पालकांचा गराडा पडला होता. जवळच एक मुलगी आपल्या आईचा हात पकडून तिला गुलाबविक्रेत्या बाईपाशी ओढत होती, तर हाती दफ्तर घेतलेली तिची आई तिला शाळेच्या दिशेने खेचत होती.

त्या दोघींची ओढाताण काय सांगत होती?

''आई, आई मला घेऊन दे ना एक गुलाब.''

''अगं पण माझ्याजवळ पैसे नाहीत ना.''

''मग आज मला नाही शाळेत जायचं.''

''काय? वेड लागलं होय तुला? चल ये.''

''नाही. मी नाही जाणार. आज बघ, सगळी मुलं आपापल्या बाईंना गुलाबाचं फूल देणार आहेत आणि मीच तेवढी गुलाबावाचून जाऊ होय?''

रडकुंडीस आलेली मुलगी रस्त्यावर पाय आपटू लागली. मग आईने तिला एक चापटी देऊन फरफटत ओढत शाळेच्या दिशेने नेले.

मी गुलाबवालीकडे जाऊन गुलाबाचा भाव विचारला 'पाच रुपये' म्हणत तिने हातातील गुलाब माझ्यापुढे केला. मी काही विकत घेत नाही, नुसता भाव विचारतोय म्हणून एक जळजळीत कटाक्ष टाकून ती अन्य ग्राहकांकडे वळली.

पाच रुपये! पाच रुपयासाठी त्या आईनं आपल्या मुलीला हिरमुसलं करावं, चापट मारावी? पाच रुपये ही काय मोठी रक्कम झाली?

'होय! झोपडपट्टीतून येणाऱ्या पालकांना, विशेषत: आयांना पाच रुपये हे तसे मोठेच वाटतात. तेवढाच फाटक्या संसाराला हातभार. अन् तू नाही का पाच रुपये वाचवावेत म्हणून बस किंवा शेअररिक्षा सोडून पायी चालत जात?' माझ्या विवेकाने मलाच चिमटा घेतला.

आपल्याकडे आता रोजरोज 'रोज डे' व्हायला लागलेत. बर्थ डे, वेडींग डे, व्हॅलेंटाईन्स डे, चिल्ड्रन्स डे, टीचर्स डे तसा 'गुरुपौर्णिमा डे'. या दिवशी गुरुजनांना शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी पुष्पगुच्छ-गुलाब देणे आलेच. पुरेशा खतपाण्याअभावी शेतकऱ्यांची ज्वारी-भाताची पिकं वाळत जातात आणि दुसरीकडे कमर्शियल फार्मस् झालेल्या भांडवलदार- कारखानदारांचे गुलाबांचे मळे बहरत आहेत.

चालतचालत मी शाळेपासून दूरवर आलो होतो. पण ती मुलगी मात्र डोळ्यापुढून जात नव्हती.

काय झालं असेल त्या मुलीचं पुढे? शाळेतील इतर मुलांनी आपापल्या बाई-गुरुजींना देण्यासाठी गुलाब-फुलं नेली आणि तीच तेवढी रिकाम्या हाताने गेली असेल का? काय वाटलं असेल त्यावेळी त्या चिमुकल्या मनाला? एका मुलानं एक गुलाब, म्हणजे वर्गात चाळीस मुलं असली तर बाईच्या टेबलावर चाळीस गुलाब? सबंध शाळेत पाचशे विद्यार्थी असले तर ५०० मुले x ५ रुपये = २५००/- रुपये गुलाबांवर खर्च! शाळा सुटल्यावर संध्याकाळी काय झालं असेल ह्या एवढ्या गुलाबांचं? पालकांच्या खिशाला चाट आणि एका गोड चिमुकल्या मुलीच्या गालावर चापट न बसता आणखी वेगळ्या पद्धतीनं 'सेलीब्रेट' करता आला नसता का हा 'गुरुपौर्णिमा डे?' प्रत्येक विद्यार्थ्यानं आपल्या घराजवळच्या मोकळ्या जागेत किंवा एखाद्या डब्यात गुलाबाचं रोपटं लावावं अन् त्या रोपट्यावर फुललेला पहिला गुलाब आणून मला द्यावा, असं शिक्षकांनी मुलांना सांगितलं असतं तर? प्रश्न- प्रश्न आणि प्रश्न!

तिकडे शिक्षकांच्या दोन्ही हातांत मावेना, तरी पण सारखे गुलाब येत होते अन् इथे माझ्या मनात त्या प्रश्नाचे काटे सलत होते.

**देवेंद्र कांदोळकर**, गोवा

---

# जगरहाटी

एका लग्नातील प्रसंग. लग्नानंतर मेजवानीच्या प्रसंगी शेजारी बसलेले तरुण व वृद्ध गृहस्थ यांच्यातील संवाद, मेजवानीचा आस्वाद घेत ऐकत होतो. वृद्धाचे केस पिकलेले, डोक्यावर पागोटे, नेहरू शर्ट, धोतर परिधान केलेले. तरुण पँट-शर्ट व फ्रेंचकट दाढी या वेषात. त्यांच्यातील संवादावरून ते मामा-भाचे आहेत हे लक्षात आले. वृद्ध मामा व तरुण भाचा खूप वर्षातून भेटल्याचे जाणवत होते. तसेच भाच्याचे आई-वडील म्हणजे मामाची सख्खी बहीण व मेहुणे वारले आहेत हेही लक्षात आले. त्यांच्यातील महत्त्वाचा पण मला खटलेला व लेख लिहावयास भाग पाडणारा संवाद पुढीलप्रमाणे...

'लग्नाला कोण कोण आलाय?'

'एकटाच'.

'बायकू पोरंऽऽ?'

'पोरांची परीक्षा चालू आहे, म्हणून त्यांना आणलं नाही'

'तुमचं कसं काय चाललंय?'

'ठीकं'
'पगार किती मिळतू?'
'तेरा हजारापेक्षा जास्त'
आपल्या अपेक्षेपेक्षा जास्त पगार आहे, हे ऐकताच मामा म्हणाले 'हितका?'
घास घेत भाचा म्हणाला, 'हो.'
जरा थांबून मामांनी विचारले 'काय धा-पाच मिळत्यात का?'
'मामा, धा-पाच मी घेत नाही.' भाचा स्वाभिमानाने म्हणाला.
'च्...च्'. मामा उद्गारले.
भाचा बाणेदारपणे म्हणाला,
'मामा नाव जाईल असं अजूनतरी काही केलं नाही आणि करणारही नाही. जमलं तर नाव कमवीन.'
'पन्, धा-पाचाची जगऱ्हाटीच हाय ना?' मामा.
'मामा, कायदा तोडून व स्वाभिमान सोडून वागणं याला मी जगरहाटी म्हणत नाही. आणि जगरहाटी असली तरी मी स्वाभिमान गहाण टाकणार नाही. पगार बऱ्यापैकी मिळतो त्यात भागवतो आणि पगार कमी असता तरी 'धा-पाच' मिळवले नसते. कष्ट करूनच जगलो असतो. कष्ट करणारा उपाशी मरत नाही.'

भाच्याचे बाणेदार उत्तर ऐकून त्याला कडकडून मिठी मारावी असे वाटले. एका अडाणी, खेड्यात राहणाऱ्या मामाने पुण्यात काम करणाऱ्या सुशिक्षित भाच्याला 'धा-पाच' रुपयाची लाच घ्यायची 'जगरहाटी' शिकवणे मला खटकले.

चौकशीअंती कळले की मामाच्या दोन मुलांपैकी एक वकील व दुसरा पोलीस आहे. वकील व हा बाणेदार भाचा एकत्रच शिकलेले. भाचा सरळमार्गी, स्वाभिमानी, कायदा मानणारा आणि मामा मात्र वकील व पोलिसाकडून होणाऱ्या भ्रष्टाचाराचं शिष्टाचारात रूपांतर करणारे.

कायदा, सुव्यवस्था राबवून आदर्श समाज निर्मितीस हातभार लावण्याऐवजी पगाराव्यतिरिक्त 'धा-पाच' मिळवून दोन पैसे शिल्लक टाकायचे याची रसभरीत चर्चा मामा व त्यांची दोन मुलं यांच्यात होत असेलच. पण शासकीय क्षेत्रातील अपवाद असलेला भाचा समाज निकोप व आदर्श विचाराने चालून बलवान व्हावा अशा विचाराने वागतो. भ्रष्टाचाराचा तिरस्कार करतो. नाव जाईल असं न वागता, नाव कमाविण्याची भाषा वापरतो. म्हणजे वयाने लहान भाचा नैतिकदृष्ट्या वरचढ व आदर्श वाटतो, तर वयाने मोठे, मामा देशद्रोही वाटतात.

**नवनाथ लोंढे**

---

# स्वातंत्र्याच्या प्रतीक्षेत

महात्मा गांधींनी मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी जी ऐतिहासिक अशी दांडीयात्रा केली, त्या यात्रेत हजारो लोक सहभागी झाले होते. त्यातील एक होते दांडीजवळच्या कराडी गावातले रहिवासी पंचाकाका पटेल. पंचाकाका हे अखेरपर्यंत महात्मा गांधींचे निष्ठावंत अनुयायी कसे राहिले त्याची कहाणी ऐकण्यासारखी आहे.

पंचाकाकांनी मीठाच्या सत्याग्रहात आणि महात्मा गांधींच्या असहकार आंदोलनात भाग घेतल्याची शिक्षा म्हणून ब्रिटिश सरकारने पंचाकाकांची जमीन व राहते घर जप्त केले, त्यांना तुरुंगात टाकले. त्यांच्या हातात बेड्या अडकवून त्यांना तुरुंगात नेताना पोलीस अधिकारी तुच्छतेने म्हणाला, 'बघा, काय मिळालं तुम्हाला या संकटात उडी घेतल्याबद्दल? तुमची तसूभरही जमीन राहिली नाही. आता तर तुमचं घरदेखील गेलं.'

पंचाकाकांनी धीर न सोडता उत्तर दिले, 'तुम्ही पहातच रहाल. माझा भारत स्वतंत्र होईपर्यंत मी माझी मालमत्ता परत करा असं सरकारला सांगणार नाही.'

१९३७ मध्ये तत्कालीन मुंबई इलाख्यात कॉंग्रेसचे राज्य स्थापन झाले आणि मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी पंचाकाकांना संदेश पाठवला की, 'आता त्यांचे सरकार पंचाकाकांची जमीन व घर परत करायला तयार आहे.' पंचाकाकांचे उत्तर आले 'भारत स्वतंत्र होईपर्यंत मी आपली मालमत्ता परत न घेण्याची शपथ घेतली आहे आणि तो दिवस अद्याप उजाडलेला नाही.'

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. पंचाकाकांना पुन्हा निरोप पाठवण्यात आला, 'आता तुम्ही आपली जप्त झालेली मालमत्ता पुन्हा ताब्यात घ्यावी.' पंचाकाकांनी काय करावे? त्यांनी थेट महात्मा गांधींशी संपर्क साधला आणि विचारले, 'गांधीजी, आपल्याला असं वाटतं का की, आपण ज्याची अपेक्षा केली होती, ते स्वातंत्र्य आलं आहे?'

गांधीजींचे उत्तर आले, 'दुर्दैवाने नाही.'

आणि काय आश्चर्य. पंचाकाकांनी स्वतंत्र भारत सरकारला लिहिले, 'मला माझी मालमत्ता परत नकोय.'

**मंगेश नाबर**, मुंबई

# के. आर. दातेप्रणित पर्यायी हरितक्रांतीचा मार्ग

**'पर्यायी हरितक्रांती'त शाश्वत समृद्धीसाठी केवळ निसर्गसंपत्तीच्या सुयोग्य वापराचा विचार नाही. पारंपरिक शेतीज्ञान व पारंपरिक कारागिरी याला आधुनिक विज्ञानाची जोड देत या मनुष्यबळाला सामावून घेत भूमिहीनांसह सर्व शेतकऱ्यांना समान पाणी मिळण्यातून समतेकडे वाटचाल होण्याची दिशाही त्यात आहे. पर्यायी हरित-क्रांतीकडे वाटचाल करायची तर त्याचे आर्थिक गणितही बसले पाहिजे. त्यासाठी दाते व सहकारी यांनी सूत्र मांडले आहे की किमान आवश्यक उत्पादनासाठी लागणारे भांडवल सवलतीच्या दरात म्हणजे सुरुवातीला ५% व्याजाने द्यायचे; किंवा देखभालीचा खर्च लागेल अशा प्रकारे शुल्क आकारायचे तर किमान उत्पादनापेक्षा जास्त उत्पादन करणाऱ्यांना बाजारभावाने दर आकारायचे.**

**अनंत फडके**

आज ज्या पद्धतीने 'विकास' केला जात आहे, त्याची पद्धतच अशी आहे की तो समाजातील सर्व लोकांच्या मानवी गरजा पुरवू शकत नाही. याचे एक कारण म्हणजे विकासाचा आराखडाच भांडवली नफ्याच्या प्रेरणेवर आधारलेला असल्याने तो विषमता वाढवत पुढे जातो. यासोबत दुसरे कारणही महत्त्वाचे आहे. ते म्हणजे या विकासासाठी निसर्ग संपत्तीचा वापर ज्या पद्धतीने होतो ती पद्धतच अतिशय अकार्यक्षम व उधळपट्टीवर आधारलेली आहे. त्यामुळे सध्याची पद्धत चालू ठेवली तर हा विकास सर्वांपर्यंत पोचायला आवश्यक तेवढी निसर्गसंपत्ती उपलब्धच नाही. उदाहरणार्थ आज अमेरिका दरडोई भारताच्या २५ पट ऊर्जा वापरते! अमेरिकेत जगातील ६% लोकसंख्या राहते, पण जगातील पेट्रोल वापरात अमेरिकेचा वाटा ४०% आहे! अमेरिकेच्या निम्मी ऊर्जा वापरायची ठरवली तरी भारताला त्यासाठी लागणारी ऊर्जा उपलब्धच होणार नाही. या ऊर्जा-तुटवड्यावर अणुऊर्जा हेही उत्तर नाही. त्यामुळे आधुनिकीकरणासाठी पाश्चात्त्य देशांपेक्षा वेगळी पद्धत भारतात वापरली तरच भारतातील सर्व जनतेला या आधुनिकीकरणात सामील होता येईल. ही पद्धत कोणती असावी याची शास्त्रीय मांडणी द्रष्टे लोकवैज्ञानिक के.आर.दाते व त्यांचे साथीदार यांनी केली आहे. श्री.अ.दाभोळकरांच्या प्रयोग परिवारासकट जगभर ठिकठिकाणी शेती व औद्योगिक विकास यावर बरेच चांगले काम झाले आहे. त्या सर्वांची सांगड घालून के.आर.दातेंनी कृषि-औद्योगिक विकेंद्रित विकासाचा एक मार्ग सांगितला आहे. त्याला थोडक्यात पर्यायी हरितक्रांतीचा मार्ग म्हणता येईल, कारण त्यात वनस्पतीजन्य जैवभार (बायोमास)ला कळीचे स्थान आहे. या पर्यायी हरित-क्रांतीकडे महाराष्ट्रातील, भारतातील अनेक कार्यकर्ते, अभ्यासक, तंत्रज्ञ आकर्षित झाले आहेत. 'केआरडी'चे मोल जाणणारे, त्यांच्यासोबत काम करणारे सहकारी व चाहते यांनी मुंबईत मार्चमध्ये दातेंचा एक सत्कारसमारंभ आयोजित केला होता. 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस'मधील या अतिशय हृद्य सत्कार सोहळ्यात भारतभरच्या निरनिराळ्या तज्ज्ञांनी दातेंचे योगदान, त्यांचा अपरिमित अखंड उत्साह, त्यांच्याबरोबर काम करण्याचे अनुभव मांडले. तसेच अतुल पेठे प्रॉडक्शन्सनिर्मित 'के.आर.दाते- ऊर्जेच्या शोधवाटा' या चित्रफितीचा 'प्रिमिअर शो' झाला. या सर्व कार्यक्रमातून दातेंच्या विचारव्यूहाचा आवाका एकत्रितपणे उभा राहिला. या सर्वांगीण विकास विचाराची थोडक्यात ओळख करून घेऊ या! सुहास परांजपे व के.जे.जॉय यांनी दातेंची मांडणी 'बँकिंग ऑन बायोमास' या पुस्तकात शब्दबद्ध केली आहे. तसेच दातेंच्या सत्कार सोहळ्यानिमित्त लिहिलेल्या निरनिराळ्या पेपर्समध्येही ती थोडक्यात दिली आहे.

**ऊर्जा-समस्येवर मात करण्याचा मार्ग**

आधुनिक विकासामध्ये ऊर्जेला कळीचे स्थान आहे. विकासकामामध्ये ४०% काम हे कुठल्याना कुठल्या बांधकामाच्या रूपात होते. सध्या त्यासाठी खनिज पदार्थ (उदा. लोखंड) व खनिज ऊर्जा तेल, कोळसा इ. यांचा मुख्यत: आधार घेतला जातो व या खनिज कोळसा, तेल यांचे आर्थिकदृष्ट्या परवडणारे साठे २५-५० वर्षांत संपणार आहेत. बांधकामासाठी लागणारे पोलाद, सिमेंट तयार करण्यासाठी प्रचंड ऊर्जा लागते. या खनिज व उर्जाघन पोलादाऐवजी प्रक्रिया केलेले बांबू व कमी व्यासाची लाकडे यांचा बऱ्याच ठिकाणी वापर करता येतो. रासायनिक प्रक्रिया केल्यामुळे हे लाकूड कुजत नाही. बांबू व असे लाकूड यांचे वैशिष्ट्य म्हणजे पोलादाची जागा अनेक बाबतीत ते घेऊ शकते व त्यामुळे खनिज ऊर्जेची प्रचंड बचत होते. कारण एक किलो पोलाद बनवण्यासाठी जेवढी खनिज ऊर्जा लागते, त्याच्या एक तृतीयांश ऊर्जा (उपयुक्तता तेवढीच असूनसुद्धा) एक किलो प्रक्रिया केलेला बांबू बनवायला लागते. दाते-प्रणित बांधकाम पद्धतीमुळे बांधकामातील लोखंडाचे प्रमाण खूप कमी होते. घरे, ऑफिसेस, पाणी अडवण्यासाठी बंधारे एवढेच नव्हे तर रस्ताबांधणीसाठीही बांबूचा/लाकडाचा वापर करता येतो हे वर निर्देशिलेल्या चित्रफितीमध्ये पहायला मिळते.

सिमेंट बनवायलाही प्रचंड ऊर्जा लागते. ती वाचवण्यासाठी एकतर बीमस् व कॉलम्समध्ये (त्यांच्या डिझाईनमध्ये) सुधारणा करून सिमेंटचा अनावश्यक वापर कमी करता येतो. तसेच औष्णिक वीजकेंद्रात तयार होणारी व वाया जाणारी दगडी कोळशाची राख

(फ्लाय ॲश) तसेच स्लॅग यांचा वापर करून सिमेंटची मोठ्या प्रमाणावर बचत करता येते.

खनिज तेलापासून बनवलेले प्लॅस्टिक, पॉलिमर्स यांचा वापर खूप वाढला आहे. हे ऊर्जाघन पदार्थ कायमस्वरूपी मिळणार नसल्याने त्यांच्याऐवजी वनस्पतीजन्य पदार्थ वापरावे लागतील व हे सहज शक्य आहे असे दाते त्याबाबतच्या संशोधनाचा दाखला देऊन दाखवून देतात. खनिज तेलापासून बनवलेली ऊर्जाघन रसायने मोठ्या प्रमाणावर कारखान्यांमध्ये वापरली जातात. रसायनशास्त्राच्या तंत्रविज्ञानात प्रगती झाल्याने त्यांची जागा वनस्पतीजन्य रसायने घेऊ शकतात. थोडक्यात, कारखान्यांमध्ये आज वापरल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या कच्च्या खनिज मालाची जागा वनस्पतीजन्य पदार्थ घेतील. त्यामुळे तेच उत्पादन करण्यासाठी खूप कमी ऊर्जा लागेल व खनिज पदार्थांवरील अवलंबित्वही कमी होईल.

फोटो-सिंथेसिसमार्फत सूर्यऊर्जा वनस्पतींमध्ये पकडली जाते. त्यांचा वापर करून बांधकाम वा इतर उद्योगात लागणारा कच्चा माल बनवण्यासाठी सूर्यऊर्जेचा अप्रत्यक्ष वापर करण्याचे धोरण पर्यायी हरित-क्रांतीत अपेक्षित आहे.

सूर्यऊर्जेच्या अप्रत्यक्ष वापराबरोबर त्याच्या थेट वापराबाबतही दाते अभिनव कल्पना मांडतात. सोलर पॅनेलमधील फोटो-होल्टाइक सेलचा वापर करून वीज निर्माण करायची तर सध्या त्याचा खर्च युनिटमागे १२ रुपये म्हणजे फार जास्त येतो. त्याऐवजी तेवढीच म्हणजे १००० किलो कॅलरी एवढीच सूर्यऊर्जा १.५ रुपयातही मिळवता येते. त्यासाठी सूर्यकिरण परावर्तीत करून त्या उष्णतेपासून पाणी किंवा तेल गरम करायचे व ते कारखान्यात उष्णतेचा स्रोत म्हणून वापरायचे हा अधिक कार्यक्षम थेट मार्ग वापरायला हवा. भुसावळचे इंजिनियर श्री.अष्टुणकर व स्मृतीगत रमेश बोरोले यांनी दातेंच्या मार्गदर्शनाखाली फ्रेनेल भिंगाच्या रचनेसारखी रचना असणारा अभिनव प्रकारचा सौर परावर्तक बसवून त्यापासून तेल गरम बनवण्याचे तंत्रज्ञान विकसित केले. सूर्य जसा कलेल तसा हा परावर्तक आपला कल आपोआप बदलत राहतो व त्यामुळे सकाळपासून संध्याकाळपर्यंत पूर्ण क्षमतेने सूर्यऊर्जेचा वापर होतो. हा परावर्तक पूर्वीपेक्षा खूप कमी खर्चात गावातील सध्याचे कारागीर बनवू शकतात, हा दात्यांचा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण दावा आहे. म्हणजे आधुनिकीकरण म्हणजे आहे त्या कारागिरांना बेकार करणे ही सध्याची पद्धती आहे. ती बदलणारी विकासपद्धती अवलंबिली पाहिजे हे तत्त्व मांडून प्रत्यक्षात आणले गेले आहे हे इथे दिसते. हे सूर्य-परावर्तक ज्या चौकटीवर बसवले जातात ती चौकट, सांगाडा हा स्टीलऐवजी बराचसा लाकडू/बांबूचा बनवता येतो व असे लाखो सूर्य-परावर्तक भारतभर वापरता येतील.

वनस्पतीजन्य 'बायो-फ्युएल'चा अतिरेकी व चुकीच्या पद्धतीने वापर करायची प्रवृत्ती सध्याच्या भांडवली विकासात आहे. पण 'बायो-फ्युएल'ची योग्य प्रकारे निर्मिती केली व सुयोग्य वापर केला तर खनिज ऊर्जेला पर्याय असणाऱ्या चिरंजीवी ऊर्जास्रोतांपैकी बायो-फ्युएल हा एक स्रोत असेल असे निश्चित म्हणता येते. याकडे दाते लक्ष वेधतात.

सूर्य-ऊर्जेचा असा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष वापर वाढवत नेला व पवनऊर्जा, जलविद्युत अशा इतर चिरंजीवी ऊर्जास्रोतांचीही क्षमता पूर्ण वापरली तर एकूण ऊर्जेपैकी खनिजऊर्जेचे प्रमाण २५% पर्यंत उतरवता येईल; असे गणित दाते मांडतात. सध्या ते ७५% आहे.

इथे एक लक्षात घ्यायला हवे की भारतात आज आपण दरडोई वर्षाला फक्त ५० किलो कोळशाएवढी खनिज ऊर्जा वापरतो. आधुनिक जीवन जगण्यासाठी दरडोई ४०० किलो कोळसा ऊर्जेपासून आज जेवढे राहणीमान कमावता येते तेवढे राहणीमान कमवायचे ध्येय ठेवायला हवे, पण आज आपण अत्यंत सदोष व अकार्यक्षम पद्धतीने ऊर्जा कमावतो व वापरतो. या मार्गाने पुढे गेल्यास सर्व जनतेला आधुनिक जीवन जगता येण्यासाठी आवश्यक एवढी ऊर्जा मिळवता येणार नाही. त्यामुळे दातेंनी व इतर तज्ज्ञांनी मांडलेल्या पद्धतीने ऊर्जास्रोतांचा विकास व ऊर्जेचा वापर केला तर ४०० किलो कोळसा दरडोई दरवर्षी वापरून जेवढे राहणीमान आज कमावता येते तेवढे राहणीमान यापेक्षा कितीतर कमी ऊर्जा वापरून गाठता येईल. उदाहरणार्थ बांधकामासाठी लागणाऱ्या ऊर्जेत ७५% बचत करता येईल.

**पुनर्जिवी शेती**

विकेंद्रित, चिरंजीवी, कृषि-औद्योगिक विकासाचा मार्ग शास्त्रीय पद्धतीने मांडताना दातेंचा भर सूर्यापासून मिळणारी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ऊर्जा आणि वनस्पतीजन्य उत्पादन (बायोमास) यावर आहे. एवढा बायोमास कोण व कसा निर्माण करणार, याचेही गणित पर्यायी हरितक्रांतीच्या संकल्पनेत मांडले गेले आहे. ते समजावून घेण्यासाठी 'पुनर्जिवी शेती' (रिजनरेटिव्ह शेती)ची कल्पना लक्षात घ्यावी लागेल. खते, कीटकनाशके इत्यादी बाह्य वस्तूंची मदत न घेता जमिनीची जी उत्पादकता असते ती प्राथमिक उत्पादकता. ही प्राथमिक उत्पादकता वाढवत न्यायची हे पायाभूत धोरण दाते मांडतात. श्री.अ.दाभोलकरांसकट अनेकांनी ही प्राथमिक उत्पादकता वाढवण्याचे निरनिराळे यशस्वी प्रयोग केले आहेत व त्यामागचे शास्त्रही सांगितले आहे. त्याचा वापर करायचा तर मर्यादित पण हुकमी पाण्याचा पुरवठा हवा. तो मिळाला तर आपल्या पारंपरिक शेतीज्ञानाला आधुनिक शेतीविज्ञानाची जोड देऊन सामान्य शेतकरी इतर बाह्य संसाधने खर्च न करता जमिनीची उत्पादकता दुप्पट-तिप्पट करतो असा अनुभव आहे. त्यासाठी लागणाऱ्या पाण्याचे गणित थोडक्यात पाहू या.

**पाण्याचे गणित :**

शेतीची गरज असेल त्याप्रमाणे हुकमी पाणी मिळाले तर दर १० घनमीटर (दर हेक्टर मि.मिटर) पाण्यामागे ३० किलो शेती-उत्पादन निश्चित मिळू शकते. म्हणजे ३ एकराच्या शेतीतून ६००० घनमीटर पाण्यापासून शेतकरी कुटुंब १८ टन शेतउत्पादन मिळवू शकते. (शेतमालाचे हे आकडे 'वाळलेले शेतमाल उत्पादन' या रूपात मोजतात. हा वाळलेला शेतमाल गवत, धान्य, फळे, लाकडू

इत्यादींपैकी काहीही किंवा त्यांचे मिश्रण असू शकते. पैकी ६ टनाचा बायोमास परत जमिनीत गाडून जमिनीचा पोत राखण्यासाठी, वाढवण्यासाठी लाकूड वापरायचा; २ टन जळण, २ टन बैलजोडीसाठी चारा, २ टन अन्नधान्य तर ३ टन बाजारात विकण्यासाठी वरकड. हे वरकड वेगवेगळ्या रूपात असू शकते– वुडगॅसिफायरमध्ये जाळून वीज बनवण्यासाठी किंवा कृषिऔद्योगिक विकासासाठी वेगवेगळ्या प्रकारचा कच्चा माल या स्वरूपात किंवा बांधकाम उद्योगासाठी लाकडू म्हणून किंवा फळे, भाजीपाला या स्वरूपात हे वरकड विकता येईल. थोडक्यात, चांगला बाजारभाव मिळणारे व आधुनिक जीवनप्रणालीशी सुसंगत असे हे वरकड असेल. जमिनीचा पोत सुधारेपर्यंत काही काळ कृत्रिम खतांचा वापर काही ठिकाणी करावा लागेल, पण काही वर्षांमध्येच ही शेती बहुतांश स्वावलंबी होईल.

**पाण्याचे गणित**

हे हुकमी पाणी कसे पुरवणार? त्यासाठी स्थानिक तळी, विहिरी याचे महत्त्व आहे. स्थानिक पाणीसाठे तयार करायचे व पाणी उपलब्ध असताना (पावसाळा, कॅनॉलची पाण्याची पाळी) भरून घ्यायचे. नंतर शेतीच्या गरजेप्रमाणे जेव्हा जसे लागेल तसे हे पाणी वापरायचे. त्यासाठी जमिनीखालचे व वरचे पाणी, या दोघांचे एकत्रित नियोजन करण्यावर दाते भर देतात. यासाठी किती पाणी लागेल? संशोधनातून दिसते की १८ टन बायोमास उत्पादनासाठी एकूण ६००० घनमीटर पाणी लागते. यात रोपे, पावसाचे पाणी थेट वापरतात ते पाणी, यासोबत जमिनीतील ओलावा व वरून दिले जाणारे पाणी या तिघांचा समावेश आहे. शिवाय घरगुती वापरासाठी रोज ५०० लिटर व तेवढेच जनावरांसाठी असे मिळून एकूण वर्षाला ४०० घनमीटर पाणी लागेल. ते धरून वर्षाला ६४०० घनमीटर पाणी पाच जणांच्या कुटुंबाला लागते. हे पाणी स्थानिक पाणलोट क्षेत्र विकासातून मुख्यत: मिळवायला हवे.

महाराष्ट्रात अवर्षण भागात हे कसे साधायचे? तिथे फक्त ३०० ते ५०० मि.मी. पाऊस पडतो. ८०% विश्वासार्हतेचा, म्हणजे ५ पैकी ४ वर्षे नक्की पडणारा पाऊस या भागात ३०० मि.मि.च आहे. अशा भागात कितीही पाणलोट क्षेत्र विकास केला तरी या भागातील लोकसंख्येची घनता, जमिनीचे स्वरूप, ढाळ इत्यादी लक्षात घेता दर कुटुंबामागे वर्षाला सुमारे ४००० घनमीटरपर्यंत पाणी त्यातून मिळू शकते. दर कुटुंबामागे १५०० ते २५०० घनमीटरची म्हणजे एकूण गरजेच्या २५ ते

## माहितीपट : के. आर. दाते : ऊर्जेच्या शोधवाटा

समाजातल्या विविध क्षेत्रांत पथदर्शी काम करणाऱ्या व्यक्तींची आणि त्यांच्या योगदानाची ओळख करून देणारा दस्तऐवजीकरण प्रकल्प म्हणजे 'ऐवज'. काही उत्तुंग व्यक्तिमत्त्वांचा जीवनप्रवास, त्यांचे कार्यक्षेत्र, त्यांचे विचार यांचे चित्रीकरण करून ते सी.डी. व डीव्हीडी.च्या माध्यमातून वितरित करणे आणि व्यक्ती, संस्था व संघटना यांच्यापर्यंत ते पोहोचविणे अशी योजना या प्रकल्पात आहे. नवीन पिढीला आपला वारसा काय आहे हे माहीत व्हावे आणि नव्या वाटा धुंडाळून कार्य करण्यास प्रेरणा मिळावी असा उद्देश त्यामागे आहे.

हा प्रकल्प अतुल पेठे यांनी स्वबळावर हाती घेतला आहे. या प्रकल्पातील पहिला माहितीपट म्हणजे 'के.आर.दाते : ऊर्जेच्या शोधवाटा'. के.आर.दाते हे अतिशय आगळे-वेगळे व्यक्तिमत्त्व आहे. आजही वयाच्या ८२ व्या वर्षी ते उत्साहाने आणि ऊर्जेने काम करीत आहेत. व्यवसायाने सिव्हिल इंजिनिअर असणाऱ्या या माणसाने भारतात आणि भारताबाहेर ५० वर्षांहून अधिक काळ जलसिंचन, ऊर्जा आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रांमध्ये पथदर्शी काम केले आहे. गेली अनेक वर्षे ते ग्रामीण विकासाकरिता झटत आहेत. पाणी, जमीन आणि ऊर्जा हे त्यांच्या आस्थेचे विषय आहेत. समृद्धीसाठी विकास आवश्यक असतो, मात्र तो साधताना अविचार केला तर पर्यावरणाचा नाश होतो आणि सामाजिक समतोलही बिघडतो. याकरिता दाते यांनी पर्यावरणाला पोषक अशा औद्योगिक तंत्रांसाठी तसेच पर्यायी विकासाच्या मार्गांसाठी कसाड, सारमेट आणि सोपेकॉम या सामाजिक विकास संस्थांची उभारणी करून नवनवे प्रयोग केले आहेत. या सृजनशील तंत्रज्ञाच्या समाजभान देणाऱ्या विचारांचा 'ऐवज' आणि त्यातून मिळणारा 'दृष्टिकोन' सर्वदूर पोहोचविण्यासाठी हा माहितीपट आहे.

या माहितीपटात दातेंची मुलाखत आहे. त्या मुलाखतीतून त्यांचे बालपणातील व कॉलेजमधील शिक्षण, अण्णासाहेब सहस्रबुद्धे व प्रा.डी.डी.कोसंबी यांचा त्यांच्यावर पडलेला प्रभाव, त्यांनी भूदान चळवळीत घेतलेला सहभाग, सरकारी नोकरी व नंतर खाजगी व्यवसाय करताना केलेली कामगिरी यांची माहिती मिळते. त्याबरोबरच लोकविज्ञान चळवळ, 'मुक्ती संघर्ष'ची बळीराजा व समान पाणीवाटप चळवळ यांच्याशी त्यांचा जो संबंध आला, त्याचाही आढावा घेतला आहे. सुहास परांजपे हे दातेंच्या सहकाऱ्यांच्या मुलाखतीद्वारे विकासाच्या या नव्या मार्गाची उकल करतात. मुलाखतीवर आधारित चित्रफितीच्या मर्यादा ओलांडण्यासाठी दातेंनी किंवा त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या अभिनव प्रयोगांचे फोटो कल्पकतेने वापरले आहेत. या माहितीपटाचे प्रयोग ठिकठिकाणी व्हायला हवेत व त्यासोबत या पर्यायी हरित क्रांतीवर चर्चाही व्हायला हव्यात.

त्यासाठी संपर्क :- **सुहास परांजपे** : 9987070792, **के.जे.जॉय** : 020-25880786, **अतुल पेठे** : 9422319717.

या माहितीपटाच्या सी.डी./डी.व्ही.डी. 'साधना मीडिया सेंटर', ४३१ शनिवार पेठ, पुणे ३० (फोन : 020-24459635) आणि बालगंधर्व रंगमंदिरात 'समकालीन' मध्ये मिळतील.

३०% तूट भागवण्यासाठी जवळच्या धरणातून पाणी देण्याशिवाय गत्यंतर नाही. शेतावर २२०० घनमीटर पाणी मिळायचे तर धरणातून कुटुंबामागे ३००० घनमीटर पाणी सोडायला हवे, कारण वाटेत झिरपा गळती, बाष्पीभवन मधून ८०० घनमीटर गळती होते.

अवर्षणप्रवण भागात दर कुटुंबामागे दरवर्षी धरणातून ३००० घनमीटर पाणी प्रत्येक कुटुंबाला द्यायचे तर तेवढे पाणी धरणांमध्ये आहे का? डॉ.भारत पाटणकरांनी गणित मांडले आहे की आज कृष्णा-खोऱ्यातील धरणांमधले पाणी तेथील जनतेला समन्यायी पद्धतीने वाटले तर ते या कामासाठी पुरेसे आहे.

धरणांकडे पाहण्याच्या दात्यांच्या वेगळ्या दृष्टिकोणाचा इथे उल्लेख करायला हवा. अवर्षणग्रस्त भागात 'बाहेरून' धरणाचे पाणी द्यावे लागेल व त्यासाठी सुयोग्य जागेवरची व विस्थापनाचा प्रश्न किमानपक्षी ठेवणाऱ्या उंचीची धरणे आवश्यक आहेत हे ते मानतात. पण या धरणांमध्ये वर्षभर पाणी साठवण्यापेक्षा स्थानिक पाणीसाठ्यांमध्ये भरून घेण्यासाठी ते वापरायचे यावर त्यांचा जोर आहे. म्हणजे शेतीच्या गरजेप्रमाणे पाणी वेळोवेळी हुकमीपणे, विकेंद्रित पद्धतीने वापरता येईल. धरणाच्या पाण्याचा वापर स्थानिक पाणलोट क्षेत्र विकासाला पर्याय म्हणून नव्हे तर त्याला पूरक म्हणून वापरायला हवा. केंद्रीय पद्धतीने पाणी सोडून त्याच्या वेळापत्रकावर शेतकऱ्यांनी अवलंबून राहायचे ही पद्धत नाकारली पाहिजे हे या धोरणात अभिप्रेत आहे.

समन्यायी पद्धतीने पाणी वाटायचे तर ते अनेक ठिकाणी उचलून द्यावे लागेल. समतेसाठी अशी जादा ऊर्जा खर्च करावी लागेल. हे परवडेल का? दाते व त्यांचे सहकारी यांनी गणित मांडले आहे की हुकमी पाण्यामुळे जे वाढीव उत्पन्न मिळेल, त्यातून शेतकरी पाणी उचलण्यासाठीच्या वीजेचे बील भरू शकतील. तसेच दर कुटुंब वर्षाला जो ३ टन वरकड जैवभार पिकवेल, त्यातील काही भाग प्रक्रिया केलेले कमी व्यासाचे लाकूड या स्वरूपात बेतला तर बांधकामात हे लाकूड स्टीलऐवजी वापरून जी ऊर्जा वाचेल ती पाणी उचलण्यासाठी लागणाऱ्या उर्जेची भरपाई करेल.

वरील विवेचनावरून लक्षात येईल की केवळ ऊर्जा समस्येच्या सोडवणुकीसाठी एक मार्ग दातेंनी मांडला आहे असे नाही. चिरंजीवी, समतावादी विकासासाठी निसर्गसंपत्तीचा वापर कसा करायचा हे ते सांगतात. त्यासाठी पाण्याचा वापर, धरणांचा उपयोग, शेतीची पद्धत, औद्योगिकीकरणाची रीत याबद्दल एकात्मिक कार्यक्रम या 'पर्यायी हरित-क्रांतीत' सामावलेला आहे.

'पर्यायी हरितक्रांती'त शाश्वत समृद्धीसाठी केवळ निसर्गसंपत्तीच्या सुयोग्य वापराचा विचार नाही. पारंपरिक शेतीज्ञान व पारंपरिक कारागिरी याला आधुनिक विज्ञानाची जोड देत या मनुष्यबळाला सामावून घेत भूमिहीनांसह सर्व शेतकऱ्यांना समान पाणी मिळण्यातून समतेकडे वाटचाल होण्याची दिशाही त्यात आहे. पर्यायी हरित-क्रांतीकडे वाटचाल करायची तर त्याचे आर्थिक गणितही बसले पाहिजे. त्यासाठी दाते व सहकारी यांनी सूत्र मांडले आहे की किमान आवश्यक उत्पादनासाठी लागणारे भांडवल सवलतीच्या दरात म्हणजे सुरुवातीला ५% व्याजाने द्यायचे; किंवा देखभालीचा खर्च लागेल अशा प्रकारे शुल्क आकारायचे तर किमान उत्पादनापेक्षा जास्त उत्पादन करणाऱ्यांना बाजारभावाने दर आकारायचे.

वर थोडक्यात मांडलेल्या या पर्यायी हरितक्रांतीच्या मार्गात अनेक अडचणी आहेत, काही कच्चे दुवे आहेत. पण हे निश्चित की जगभरच्या विविध क्षेत्रांतील संशोधनाच्या आधारे एक सुसंगत, शास्त्रीय विकासधोरण मांडण्याचे पथदर्शी काम के.आर.दातेंनी केले आहे.

**डॉ. अनंत फडके**
मोबा : 9423531478
anant.phadke@gmail.com

## वाचकांना आवाहन

माहितीपट व सिनेमाक्षेत्रात काम करणाऱ्या 'अवकाश निर्मिती' या संस्थेतर्फे प्रा.ग.प्र.प्रधान यांची एक सविस्तर मुलाखत घेण्यात आलेली आहे. ही मुलाखत सीडी.च्या स्वरूपात नजिकच्या काळात प्रकाशित करण्यात येणार आहे. या मुलाखतीत प्रधानसरांनी आपल्या वैयक्तिक तसेच सामाजिक व राजकीय वाटचालीबाबत मोकळेपणाने विचार मांडले आहेत. आजच्या काळातील आव्हाने समजून घेताना प्रधानसरांनी केलेले विवेचन नव्या-जुन्या कार्यकर्त्यांना खूप उपयोगी पडेल असे आम्हाला वाटते.

या संदर्भात साधना परिवारातल्या सदस्यांची आम्हाला मदत हवी आहे. प्रधानसरांचे आपल्या संग्रही असलेले जुने-नवे फोटो आम्हाला या फिल्ममध्ये वापरण्यासाठी हवे आहेत. यात निरनिराळ्या घटना व्यक्ती अर्थातच हव्यात. इतिहास डोळ्यासमोर उभा राहण्यासाठी या फोटोंचा खूपच उपयोग होणार आहे. आपले हे फोटो सुरक्षितपणे परत आपल्यापर्यंत पोचवण्याची जबाबदारी अर्थातच आमची आहे.

कृपया हे फोटो खालील पत्त्यावर अथवा 'साधना'च्या कार्यालयात १० सप्टेंबरपर्यंत आणून द्यावेत. फोटोच्या मागे आपले नाव व फोन नंबर जरूर लिहावेत. आपल्याला शक्य असल्यास हे फोटो 300 DPI Resolution ला स्कॅन करून पाठवले तरी चालतील.

**समीर शिपूरकर,** मोबा.: 9422089310
**अवकाश निर्मिती**
१७१, महात्मा सोसायटी, कोथरूड, पुणे ४११०३८, फोन : 020-25360872
E-mail : avakashnirmitee@gmail.com

# समजून घ्यावे की सर्व ऊर्जा अपुरी आहे!

द. गो भापकर

**भारतात अणुकराराविषयी एवढी चर्चा कशासाठी? वर निवेदन केल्याप्रमाणे जरी ऊर्जा प्राप्त होणार असली तरी ते सर्व करायला बराच मोठा कालावधी व खर्चही लागेलच. आपण मात्र दररोज वाचतो की साठ वर्षे स्वातंत्र्यास होऊनही वीजकपात, कित्येक खेड्यात वीज नाही, विजेअभावी औद्योगिक व शेती उत्पन्नावर परिणाम वगैरेंबाबत समजून घ्यावे की ही सर्व ऊर्जा अपुरी आहे. चांगली प्रगती व्हायची असेल तर विजेचा अखंड पुरवठा कायमस्वरूपी व्हायला हवा. ह्यासाठी अणुऊर्जा महत्त्वाची आहे. थोड्या अवधीत प्रचंड पुरवठा अणुऊर्जेपासून मिळू शकतो. अपरंपारिक नूतनीकरण होणारी सौर, वारा, लाटा, भूगर्भातील उष्णता यांचादेखील उपयोग होणे जरूरीचे आहे.**

पृथ्वीवरील सर्व प्राण्यांना ऊर्जेची जरूरी असते. ऊर्जेशिवाय प्राणी, जगू शकत नाहीत. यात सर्व प्राणी येतात. अगदी जीवाणू हत्तीसारखे जंगली प्राणी, वनस्पती व माणसेही. यातील काही जमिनीवर, काही पाण्यात तर काही हवेत राहतात. यांचे जीवन काही क्षणांपासून कित्येक वर्षे असते. त्या सर्वांना ऊर्जा मात्र आवश्यक आहे, वनस्पती स्वत: सूर्याच्या ऊर्जेपासून अन्न तयार करतात. प्राण्यांना हे शक्य नसल्यामुळे त्यांना वनस्पतीवर अवलंबून रहावे लागते.

पृथ्वीतलावरील ऊर्जा कोणती? ऊर्जेचा सर्वात मोठा स्रोत म्हणजे सूर्य. अखंड ऊर्जा सूर्यापासून मिळते. जमिनीतून मिळणारे क्रूड ऑईल, कोळसा, वाऱ्यापासून मिळणारी तसेच पाण्यांच्या लाटांपासून निर्माण होणारी ऊर्जा उपयुक्त आहे. याशिवाय पृथ्वीच्या अंतरंगात खोलवर तापमान भरपूर आहे, त्याचाही उपयोग होऊ शकतो. नद्यांचे पाणी अडवून त्यापासून जलविद्युत प्रकल्प ऊर्जा देतात. यांपैकी क्रूड, कोळसा यांची ऊर्जा कायमस्वरूपी नाही. एखाददुसऱ्या शतकानंतर ती संपेलही. शिवाय क्रूड, कोळसा याची निर्मिती वनस्पतीपासूनच झालेली असते. यात सूर्यप्रकाशाची ऊर्जा उपयोगी पडलेली आहे. मात्र जलविद्युत ऊर्जा किंवा सौर, वारा, समुद्राच्या लाटा यांपासून मिळणारी ऊर्जा अखंड आहे. या सर्व स्रोतामध्येदेखील सूर्याचे कार्य कारणीभूत आहे हे विसरता येणार नाही. तसे बारकाईने पाहिल्यास आपण सूर्य खात असतो व शास्त्रानुसार आता नाही, पण कित्येक कोटी वर्षांनी सूर्याची उष्णता कमी होत जाणार. यात घाबरायचे कारण नाही, पुढचे पुढे. पण तोपर्यंत मनुष्यप्राणी गप्प थोडाच बसणार? त्याचे संशोधन व तंत्रज्ञान नवीन झेप घेत राहील. हिरव्या वनस्पतीच्या पानांच्या पेशींमध्ये हरितद्रव्य, क्लोरोफील असते. हे द्रव्य जमिनीतून मूळावाटे घेतलेल्या पाण्याचे सौरऊर्जेपासून विघटन करते व त्यातील हैड्रोजन व हवेतील कार्बनडायऑक्साईडमधील कार्बन यांचा संयोग करून साखर बनवतात आणि अविरत प्राणवायू हवेत सोडतात. प्रगत जीव तंत्राद्वारे कदाचित मनुष्यामध्येही हरित द्रव्याप्रमाणे एखादे द्रव्य निर्माण होऊ शकते. आताच अनैसर्गिक हरितद्रव्य तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत. तसे पाहिल्यास वनस्पतींचा मनुष्याला फार मोठा आधार आहे. त्या हवेतील कार्बनडायऑक्साईड घेऊन हवेत शुद्ध प्राणवायू सोडतात.

आपणास ऊर्जा पाहिजेच. आपल्या शारीरिक वाढीसाठी, हालचालीसाठी, श्वसनासाठी, विचारासाठी आपण अन्न ग्रहण करतो. श्वसनाद्वारे प्राणवायू वापरला जातो व ग्रहण केलेल्या अन्नापासून ऊर्जा मिळते आणि कार्बनडायऑक्साईड बाहेर टाकला जातो. शारीरिक व मानसिक क्रियेसाठी अन्नाचा उपयोग होतो. त्या अन्नात वनस्पतींनी सूर्यापासून ऊर्जा वापरलेली असते, पर्यायाने त्या ऊर्जेचा वापर आपण करतो व बाहेर मात्र वातावरणास हानिकारक कर्ब बाहेर टाकतो. हे ठीक आहे, पण आपण काँक्रीटची घरे बांधतो, लोखंडाचा उपयोग करतो, मोठमोठ्या यांत्रिक पद्धतीने तयार झालेला कपडा वापरतो. याशिवाय प्रवासासाठी वाहने वापरतो, रस्ते तयार करतो, इत्यादी सर्वासाठी ऊर्जा वापरली जाते. कित्येक चैनीच्या बाबीवर त्या निर्माण करण्यास पायाभूत ऊर्जा लागते व त्या वस्तू चालविण्यासाठी सतत ऊर्जेचा वापर केला जातो व ह्या सर्व क्रियेमधून वातावरणाची न भरून येणारी हानी होते. विशेष म्हणजे वातावरणातील तापमान वाढते, उत्तर ध्रुवावरील व हिमालयावरील बर्फ वितळत जाते. पुढे ह्याचे दुष्परिणाम आपणास भोगावे लागतील. हा सुनामीसारखा आघात होऊ शकतो, पिकांच्या उत्पन्नावर परिणाम होईल. आपण विनाशाकडे जात आहोत काय? आपण जीवनशैली अशी स्वीकारत आहोत की ज्यामध्ये नैसर्गिक साधनसामग्रीचा ऱ्हास होत आहे, असे सर्व देशातील लोकांना वाटत आहे. ही मंडळी एकत्र येऊन या समस्येचा मुकाबला कसा करायचा ह्याचा विचार करू लागली. क्वेट्टा येथे भरलेल्या जगातील सर्व देशांच्या प्रतिनिधींनी प्रश्नाचे गांभीर्य ओळखून त्यावर कार्बननिर्मिती कमी करण्याबद्दल सुचविले. विशेषत: प्रगत देशांनी ह्यावर किती प्रमाणात हे काम करावयाचे ह्याची बंधने घातली आहेत. तसेच जगातील कर्ब कमी करण्यासाठी वृक्ष लागवडीचा उपाय मान्य करून जेथे वृक्ष लागवड जास्त प्रमाणात होईल, तेथील लोकांना 'कार्बन क्रेडिट' द्यायचे मान्य केले आहे. 'कार्बन फूटप्रिंट' वाढू द्यायचा नाही असे सर्वांनी मान्य केले. मात्र कोणत्याही देशाची आर्थिक प्रगती उद्योग उत्पन्न, औद्योगिकीकरण याशिवाय होणार नाही असे मानले तर विकसित देशांनी ह्यामध्ये बराच पल्ला गाठला आहे, भरपूर कर्ब वातावरणात सोडला आहे व विकसनशील देश- चीन, भारत, ब्राझील, मेक्सिको इत्यादींना कर्ब कमी करण्याचा पर्यायाने विकासाची गती रोखण्याचा सल्ला देत आहेत.

**भारतामध्ये क्रूड ऑईल**

उत्पन्न ३३ मिलियन टन = ६,६०,००० बॅरल दर दिवशी.

वापर १२९ मिलियन टन (२००७-०८)

आयात १२१ मिलियन टन (२००७-०८)

आयातीचा खर्च ११० ते १२० बिलियन डॉलर्स = ४.५ ते ५ लाख कोटी रुपये.

श्रीमंत प्रगत देश जैविक तेल वापरायला लागले. हे जळण तयार करण्यास मका, सोयाबीन ह्यांचा प्रामुख्याने वापर करतात. ह्याचा परिणाम मक्याचा भाग वाढण्यात झाला तो मका आफ्रिकेतील गरीब देशांना परवडणारा नाही. ह्याचा परिणाम गरीब देशातील ३० लाख लोकांवर झाला. मध्य आशियातून तेलाची आयात, भाव वाढविल्यामुळे परवडत नाही. मका तेलासाठी वापरतात, त्यामुळे अमेरिकेत जो मका चार डॉलरला बुशेल होता तो सहा डॉलर झाला. हवामानातील कार्बन वाढल्यामुळे तापमान वाढत आहे. हे हिमालयात दरवर्षी ०.०६°C वाढत आहे. नद्यातील पाणी वाहत जाऊन नैसर्गिक तळी फुटली व उपयुक्त पाणी ३० ते ६० मीटरने कमी झाले. जैविक तेल इथेनॉलपासून बनवता येते व इथेनॉल ऊसरसाच्या मळीपासून तयार होते, तसेच मक्यापासूनही होते त्यामुळे अन्न का तेल यावर वाद सुरू झाला आहे.

जगातील ऊर्जेचा वापर १९७० पासून ८४ टक्क्यांनी वाढला आणि अनुमान आहे की पुढील २० वर्षांत तो आणखी ६० टक्यांनी वाढेल. तेल काढून ते निर्यात करणारे देश- मध्य आशियात आहेत, यांच्याकडे जगातील तेलापैकी ८० टक्के हिस्सा आहे. भारतातील हरित क्रांतीमुळे आपण अन्नधान्यात स्वयंपूर्ण झालो; परदेशी धान्यावर अवलंबून रहावे लागेनासे झाले खरे. परंतु हरित क्रांतीमधील धान्याच्या पिकांच्या वाणांना मोठ्या प्रमाणात रासायनिक खते व कीड-रोगासाठी विषारी औषधे वापरावी लागतात. यांच्या बेदरकार व सततच्या वापरामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. एकतर अन्नधान्याचे उत्पन्न पुढे वाढेना व स्थिर होऊ लागले. रासायनिक खतांच्या बेसुमार वापरामुळे जमिनी खारवट व नापीक बनू लागल्या तर जमिनीतील पाणी विषारी बनून ते मनुष्यास घातक बनले आहे. यंदाच्या वर्षी अन्नधान्याचे उत्पन्न खूप वाढले. (२२७ मिलियन टन) असले तरी दरमाणशी त्याचे प्रमाण पुरेसे नाही. किंबहुना लोकसंख्येच्या वाढीपुढे अन्नधान्याची वाढ कमी पडू लागली आहे. रासायनिक खते व औषधे बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर ऊर्जेचा वापर केला जातो, तर काही प्रमाणात ती आयातही करावी लागतात. यासाठी सेंद्रीय शेतीचा वापर करणे इष्ट होणार आहे. मात्र याबाबत अनेक वाद आहेत, विशेष म्हणजे FAO (Food and Agricultural Organization) प्रमाणे गुरेढोरे मोठ्या प्रमाणात मिथेन हवेत सोडतात. तसेच भाताचे पीकही मिथेन निर्माण करते. हे खरे असले तरी गुरेढोरे साधनसंपत्ती मोठ्या प्रमाणात वाढवतात. भात तर जगातील २/३ लोकांचे अन्नधान्य आहे, शिवाय भातपिकाचे जमिनीला सेंद्रीय खत मिळते. भाताचा पेंढा खाऊन गुरे सेंद्रीय पदार्थ जमिनीला देऊ शकतात.

भारतात तर गुरांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे हे विसरता येणार नाही. भारतातील १४० लक्ष बैलगाड्यामधून एकूण मालवाहतुकीपैकी २/३ माल वाहिला जातो. एकूण शेतीच्या शेतकामाच्या मशागतींपैकी २/३ मशागत बैलांनी होते. सर्व गुरांच्या वापरातून भारतात दरवर्षी १०,००० कोटी रुपयांचे काम होते, ज्यासाठी क्रूड वापरल्यास ते ६० लक्ष टन एवढ्या प्रमाणात लागेल. भारतात गुरांचे शेण ८००० लक्ष टन तयार होते यापैकी बरेचसे शेणखतात रूपांतरित होऊन शेतात वापरले जाते. मिथेन जनावरांपासून होत असला तरी त्यांच्याकडून खूप मोठ्या प्रमाणात शेतीतून निर्मिती होते व शिवाय हवेतील कार्बनचा त्यात वापर केला जातो. हे सर्व लक्षात घेता गुरापासून निर्माण होणारा मिथेन, रासायनिक खतांची निर्मिती आणि वाहतुकीत तयार होणाऱ्या मिथेनच्या मानाने केवळ ४% असतो.

एकूण ऊर्जेच्या पुरवठ्यासाठी अनेक विचार व उपाय मांडले जातात. पहिल्या पिढीतील तंत्रज्ञानात स्टार्च, भाजीपाला, तेल किंवा जनावरांची चरबी वापरतात. पण दुसऱ्या पिढीतील तंत्रज्ञानात बिगरअन्नाचा जसा भाताचे ब्रान (तांदळावरील व तुसाच्या आतील पातळ पापुद्रा) भाजीपाल्यातील तुकडे, पामतेल, मक्याचे तेल, मासे इत्यादी वापरतात. रान एरंडी (जेट्रोफा)चे बी ह्यातूनही तेल निर्माण करून ते वापरतात. सेल्युलोसपासूनही पेट्रोल निर्माण करता येते, परंतु काही लोकांचे म्हणणे आहे की ह्या सर्वांचा जनावरांसाठी वापर होऊ शकतो. लाकडाचे ढलपे व पिकांचे उर्वरित भाग यापासूनही ऊर्जा निर्माण करतात. कोणीतरी कॉफीबियांचे टरफले वापरून ऊर्जानिर्मितीचा प्रयोग केला. परंतु सध्या मोठ्या प्रमाणात मका, सोयाबीन (अमेरिका), ऊस (ब्राझील), पामतेल (पूर्व आशिया) यांचा अन्नधान्याच्या विरोधात जमिनीचा वापर करून ऊर्जानिर्मिती होते. केएलएम ह्या डच विमान कंपनीने शेवाळापासून ऊर्जानिर्मितीचा मार्ग स्वीकारला. त्यांच्यामते मोठ्या यंत्रणेतून शेवाळनिर्मिती करून त्यापासून काढलेले तेल स्वस्त (१०० डॉलर एका बॅरलला) पडते, कारण सध्या आयात तेलाचा भाव १४० डॉलर आहे.

काहीजण मांसाहारी आहार घेतात. यामुळे अधिक ऊर्जा वापरली जाते, कारण एक किलो मांस तयार होण्यास गुरांना ८ ते १० किलो वनस्पतीअन्न द्यावे लागते.

आधुनिक जीवन ऊर्जेशिवाय अशक्य आहे, साधे उदारण घेऊ. आपण शहरात घरातील नळाने आलेले पाणी पितो. प्रथम म्हणजे जास्त पावसाच्या भागात पाणी साठविण्यासाठी धरणे बांधली जातात. त्यातील पाणी कालव्याने, मोठ्या नळांनी शहरात येते. तेथे त्याचे शुद्धीकरण करतात व पंपाच्या दाबांनी विविध भागात ते पुरविले जाते. प्रथम धरण बांधायला प्रचंड ऊर्जा लागते. त्यातील माती काढणे, दगड, सिमेंट आणून बंधारा उभारणे यासाठी ऊर्जेचा खूप वापर होतो. शिवाय धरणापूर्वी त्या जमिनीवर गुजराण करणाऱ्यांना आपले वंशपरंपरागत हक्काचे ठाणे सोडावे लागते. त्या ठिकाणच्या प्राणी, पक्षी यांची हकालपट्टी होते. जमिनीची धूप मोठ्या प्रमाणावर होते. नैसर्गिक संपत्तीचा विनाश होतो. यात पायाभूत ऊर्जा खर्च होते. शिवाय दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी ऊर्जा लागतेच. हेच प्रमाण रस्ते वनीकरण, रेल्वे वगैरेंसाठी असते. ही सर्व ऊर्जा पुन:निर्माण होणारी नसते, खनिज क्रूड मोठ्या प्रमाणावर वापरले जाते.

पुन्हा निर्माण होणारी ऊर्जा सौर, वारा, पाण्याच्या लाटा काही प्रमाणात उपयुक्त आहे, मात्र त्यासाठी सध्या तरी खर्च खूप आहे. सध्या २०० लिटर बंबासाठी ५०,००० रुपये लागतात. हा बंब १५-२० वर्षे टिकला तरी विजेचा तेवढा खर्च होणार नाही. शिवाय बंब बनविताना खूप ऊर्जा वापरावी लागते. पावसाळ्यात ढग असताना ह्या बंबाचा तेवढा उपयोग होत नाही. वाऱ्याच्या बाबतीतही प्रश्न आहेत. ठराविक ठिकाणी हे फिरणारे पंखे चालतात, तेथे किमान वाऱ्याचा वेग १५ कि.मी. ताशीपेक्षा जास्त लागतो. म्हणजेच हे सतत चालत नाहीत. ज्या शेतकऱ्यांकडे गुरेढोरे व लहानसे शेत आहे त्यांना गोबरगॅस स्वयंपाक तसेच दिव्यांची योजना होऊ शकते. शहरात सौरकंदील, सौर कुकर छान चालू शकतात. अमेरिकेचे भूतपूर्व उपराष्ट्रपती अल् गोर (नोबेल पारितोषिक मिळविलेले) यांचा मात्र ठाम विश्वास आहे की, अपारंपरिक अशा सौर, वारा, लाटा इत्यादींपासून मिळणारी ऊर्जा अमेरिकेतील सर्व ऊर्जेची गरज भागवेल.

टाटा केमिकल यांनी हैद्राबादच्या आंतरराष्ट्रीय कृषि संस्थेशी करार करून गोड्या ज्वारीपासून इथेनॉल करावयाचे ठरवले आहे. भारतात साखर कारखान्यातून निर्माण केलेला इथेनॉल जळणतेलात १० टक्के वापरण्यात येणार आहे. यामुळे आपले ८०० लक्ष लिटर तेल वाचेल. तसे पाहिल्यास वारा, सौर, लाटा, पृथ्वीच्या पोटातील ऊर्जेबरोबर ऊसाच्या मळीपासून तसेच शेतातील काडीकचरा, रानटी गवत, शेवाळ, इत्यादींपासून ऊर्जा निर्माण करून आपली गरज भागविणे अगत्याचे होणार आहे.

माणशी कार्बननिर्मिती भारतात इतर देशांच्या मानाने कमी आहे. अमेरिका माणशी २०.१० मेट्रिक टन, युरोप ९.४० मेट्रिक टन, जपान ९.८७ मेट्रिक टन, भारत १.०२ मेट्रिक टन. मात्र देशाचा विचार केल्यास भारताचा क्रमांक जगात चौथा लागतो, चीन, अमेरिका व रशिया यांच्यानंतर.

'जी-८' राष्ट्रांची (जपान, इटली, रशिया, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, अमेरिका व कॅनडा) नुकतीच जपानमध्ये बैठक होऊन त्यात कार्बननिर्मिती २०२० पर्यंत निम्म्याने घटवायचे ठरवले आहे. इतर पाच राष्ट्रे (भारत, चीन, ब्राझील, मेक्सिको व द.आफ्रिका) या चर्चेसाठी हजर होती. या सभेत भारताचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी त्वरीत कार्बननिर्मिती घटविण्यापेक्षा भारत आपल्या प्रगतीकडे अधिक लक्ष देणार आहे असे स्पष्ट केले.

भारत सरकारने नुकतेच आपले हवामान बदलाबद्दल धोरण जाहीर केले आहे. त्यात आठ मोहिमांचा समावेश केला आहे. ऊर्जेची कार्यकुशलता वाढविणे, पुनर्निर्मिती ऊर्जास्रोताची वाढ करणे, शास्त्रीय व तांत्रिक उपायांचा शोध, पाण्याचे संधारण करणे, हिमालयातील वातावरणाच्या बदलाचे संरक्षण, बदलत्या हवामानाच्या पायऱ्या व सर्वांसाठी आवश्यक अर्थकारण.

अशी सर्व परिस्थिती असताना भारतात अणुकराराविषयी एवढी चर्चा कशासाठी? वर निवेदन केल्याप्रमाणे जरी ऊर्जा प्राप्त होणार असली तरी ते सर्व करायला बराच मोठा कालावधी व खर्चही लागेलच. आपण मात्र दररोज वाचतो की साठ वर्षे स्वातंत्र्यास होऊनही वीजकपात, कित्येक खेड्यात वीज नाही, विजेअभावी औद्योगिक व शेती उत्पन्नावर परिणाम वगैरेंबाबत समजून घ्यावे की ही सर्व ऊर्जा अपुरी आहे. चांगली प्रगती व्हायची असेल तर विजेचा अखंड पुरवठा कायमस्वरूपी व्हायला हवा. ह्यासाठी अणुऊर्जा महत्त्वाची आहे. थोड्या अवधीत प्रचंड पुरवठा अणुऊर्जेपासून मिळू शकतो. अपरंपारिक नूतनीकरण होणारी सौर, वारा, लाटा, भूगर्भातील उष्णता यांचादेखील उपयोग होणे जरूरीचे आहे. पृथ्वीवरील एकूण जळणाचे ३/४ भाग खनिज कोळशापासून होऊ शकतो, आणि तो ५X१०$^{६}$ मे.ट. याचा ८०% भाग २२५० पर्यंत संपेल. एकूण क्रूड २०००X१$^{९}$ बॅरल असावे व ते ह्या शतकापर्यंत पुरावे, तसेच नैसर्गिक ज्वालाग्रही वायू ३४०X१०$^{१२}$ घ.मी. आहे ते शतकापर्यंत पुरू शकतो.

सौरऊर्जा तशी प्रचंड प्रमाणात सूर्यापासून मिळते, १.८X१०$^{११}$ मिलियन ज्युल, पण या ऊर्जेचा उपयोग थोडाच केला जाऊ शकतो. ह्या सौरऊर्जेचा फायदा म्हणजे ती प्रदूषण करीत नाही. मात्र फार अल्प दराने मिळत असल्यामुळे ती घेण्यासाठी फार मोठे क्षेत्रफळ लागते. शिवाय ती २४ तास किंवा ३६५ दिवस मिळू शकत नाही. या कारणाने अणुऊर्जेची आवश्यकता आहे. अणुऊर्जेसाठी १ टन युरेनियम वापरले तर सुमारे ३० लाख टन कोळशाइतकी ऊर्जा मिळू शकते. अणुऊर्जा तयार करण्यास प्रचंड अणुभट्ट्या व अणू फोडण्यासाठी युरेनियमसारखे धातू लागतात. भट्ट्यासाठी परदेशातील तंत्रज्ञान विकत घ्यावे लागेल, तसेच युरेनियम वगैरे आयात करावे लागतील. परंतु थोड्याच अवधीत हे साध्य होऊ शकते. ह्या दृष्टीने भारताने अमेरिकेशी करार करावयाचे ठरविले. कालांतराने भारतही अणुभट्ट्या निर्माण करू शकतो व निर्यातही करू शकतो. मात्र भट्टीत उरणाऱ्या राखेचे व्यवस्थापन करणे जबाबदारीचे आहे, पण कमीत कमी काळात भारत खूप प्रगती करू शकतो.

अणुऊर्जा निर्माण करायला आपल्या देशात सुरुवातीला खूप खर्च येणार, परंतु कालांतराने ही ऊर्जा सर्वात स्वस्त पडणार आहे. इराणमधून पाईपमधून गॅस आणला तरी तो गॅस येथे पडणाऱ्या किमतीपेक्षा अणुऊर्जा काही प्रमाणात कालांतराने स्वस्त पडणार आहे.

दरमाणशी २५०० कि.वॅ. ऊर्जा आपण २०३१-३२ मध्ये निर्माण करण्यासाठी अणुऊर्जा जरूरीची आहे. जगातील ऊर्जा माणशी २५०० कि.वॅ. ही २००३ मध्येच प्रगत देशातील वापरामुळे तयार झाली. भारतात सध्या १,४४,००० मेगावॅट ऊर्जा निर्माण होत आहे, आणि जरूरी आहे ९,६०,००० मेगावॅटची.

एकूण अणुऊर्जा हा जरी एक महत्त्वाचा स्रोत असला तरी इतर अपारंपारिक पद्धतीने ऊर्जा निर्माण करणे, त्यात संशोधन करणे चालू ठेवलेच पाहिजे. विशेषत: काडी-कचरा, टाकाऊ सेंद्रीय पदार्थ हाही महत्त्वाचा स्रोत आहे.


**द. गो. भापकर**

२-अ, कृषि हौसिंग सोसायटी,

पुणे ४११०१६.

*(लेखक म.फुले कृषि विद्यापीठाचे संचालक संशोधन म्हणून निवृत्त झाले आहेत.)*

**अर्थकारण**

# शेतीविकासासाठी कोणी प्रयास करील काय?

**रमेश पाध्ये**

**चीनमध्ये बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्था प्रचारात आल्याचे आपण ऐकतो. तेथे गेली तीस वर्षे आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया सुरू आहे, याचा सर्व अभ्यासक आवर्जून उल्लेख करतात, पण चीनमधील ही आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया किती मानवी आहे याचा उल्लेख अभावानेच होतो. चीनमधील आर्थिक विकासाची प्रक्रिया पाहू गेल्यास 'शेती हा अर्थव्यवस्थेचा पाया आहे तर उद्योग हा पुढे नेणारा घटक आहे' या माओच्या वचनाकडे त्यांनी अजून दुर्लक्ष केलेले नाही असेच म्हणावे लागते. यामुळे चिनी राज्यकर्त्यांनी औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष केले नाही. त्यांचा शेतीक्षेत्राच्या उत्पादन वाढीचा वेग आर्थिक उदारीकरणाच्या काळातही चार टक्क्यांहून अधिक राहिला आहे.**

काही दिवसांपूर्वी इंटरनेटवर वेगवेगळ्या बातम्या पहात असताना एका बातमीने माझे लक्ष वेधून घेतले. ही बातमी चीनमधील शेतीक्षेत्राच्या संदर्भातील होती. या बातमीद्वारे जाहीर करण्यात आले होते की या वर्षी चीनमध्ये भाताच्या अधिक उत्पादक वाणाची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात आली आहे. यामुळे आता हेक्टरी सुमारे ८.५ टन भाताचे उत्पादन शक्य होणार आहे. यापूर्वी ते सुमारे ७.५ टन एवढे होते. तसेच पुढच्या ७-८ वर्षात हा सरासरी उत्पादनाचा आकडा हेक्टरी १४ टनापर्यंत नेण्याचा त्यांचा मानस आहे. त्यासाठी संशोधक आणि कृषिक्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी झटून काम करायला सुरुवात केली आहे. ही बातमी वाचून मला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण हरित क्रांतीमुळे भारतात हेक्टरी २.७५ टन भाताचे उत्पादन घेण्यात भारताला यश मिळाले आहे. त्याच्या सुमारे तीनपट उत्पादकतेचा टप्पा पार करण्यात चिनी शेतकरी यशस्वी झाले आहेत. तसेच या यशावर समाधान न मानता ते उत्पादकता वाढविण्यासाठी आपला प्रयास सुरूच ठेवणार आहेत!

चीनने भाताच्या उत्पादकता वाढीमध्ये संपादन केलेल्या यशामागचे रहस्य तेथील कृषि संशोधकांनी विज्ञानाची धरलेली कास हेच आहे. तसे पहायला गेल्यास भाताचे संकरित बियाणे निर्माण करण्यात शास्त्रज्ञांना सुमारे १५ वर्षांपूर्वीच यश मिळाले, पण हे तंत्र वापरून अधिक उत्पादक वाण निर्माण करून ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात चीनने आघाडी घेतली. प्रयोगशाळेत लागलेला शोध शेतकऱ्यांच्या शिवारापर्यंत पोहोचविण्यासाठी गरजेची ठरणारी शासकीय यंत्रणा निर्माण करण्यात चीनमधील राजवटीने यश संपादन केले. आपल्या देशात अशी यंत्रणा अस्तित्वात नसावी. अन्यथा अंतराळात उपग्रह पाठविण्यात किंवा अणुस्फोट घडवून जगाला आश्चर्यचकित करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या या देशात शेतकऱ्यांची अशी परवड झाली नसती.

शेतीक्षेत्रामधील उत्पादकतेचा विचार करायचा तर त्यासाठी नैसर्गिकदृष्ट्या भारताची स्थिती चीनपेक्षा चांगली आहे. कारण भारताला लख्ख सूर्यप्रकाशाचे वरदान लाभले आहे. वनस्पतीच्या वाढीसाठी सूर्यप्रकाश ही प्राथमिक गरज असते. पण मग असे निसर्गाचे वरदान लाभलेल्या भारताला हरितक्रांती होऊनही गेली कित्येक वर्षे कडधान्ये, खाद्यतेले आणि आता तृणधान्यासाठीही आयातीवर विसंबून राहण्याची वेळ का आली आहे? आपण या गोष्टींचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. चीनचे एकूण क्षेत्रफळ भारतापेक्षा खूपच अधिक असले तरी तेथील उपजाऊ जमीन भारताच्या ६०% एवढी कमी आहे. तेथे लख्ख सूर्यप्रकाश नाही. तरीही त्यांचे धान्याचे उत्पादन भारताच्या अडीचपट आहे. चीनमधील शेती विकासाची आकडेवारी तपासून पाहिली तर आर्थिक उदारीकरणाच्या काळात चीनने कृषि उत्पादनात आघाडी घेतल्याचे दिसून येते. याउलट भारतात आर्थिक उदारीकरणाच्या काळात शेती उत्पादन वाढ थंडावलेली दिसते. भारताची लोकसंख्या वर्षाला सुमारे १.८ टक्क्याने वाढत असताना कृषि उत्पादनाची वाढ सुमारे १.२ टक्क्यांनी होणे म्हणजे राज्यकर्त्यांनी जनसामान्यांना पोट आवळण्यास सांगण्याची वेळ जवळ येऊ लागल्याचे चिन्ह आहे. ही सर्वांना सामावून घेणारी विकासप्रक्रिया नव्हे. भारताला वार्षिक ९/१० टक्के दराने आर्थिक वाढ साध्य करायची असेल तर शेतीक्षेत्राला वार्षिक ४ टक्के वाढ साध्य करावी लागेल हे नियोजन मंडळाने निर्देशित केले आहे. मग हे उद्दिष्ट गाठण्यासाठी सरकारने कोणती रणनीती निश्चित केली आहे? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर आज मिळू शकत नाही.

या लेखाची सुरुवात करताना आपण केवळ भात या तृणधान्याच्या उत्पादकतेमधील विस्मयकारक प्रगतीचा मागोवा घेतला असला तरी चीनची शेतीक्षेत्रामधील प्रगती केवळ भाताच्या उत्पादन वाढीपुरती मर्यादित नाही. चीनने तृणधान्याबरोबर तेलबिया, ऊस, शर्कराकंद (बीट), फळे, कपास, पशुपालन, मत्सोद्योग अशा सर्व क्षेत्रामध्ये उत्पादनवाढ करण्यात आघाडी प्रस्थापित केली आहे. चीनच्या या विस्मयकारक प्रगतीची झलक दाखविणारा तक्ता खाली उद्धृत करणे उचित ठरेल. या तक्त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की आर्थिक उदारीकरणाच्या कालखंडात म्हणजे १९७८ नंतर चीनने गतिमान विकासप्रक्रिया साधताना तेथे शेतीक्षेत्राकडे दुर्लक्ष केलेले नाही. उलट या कालखंडात तेथे सर्वांगीण शेती विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यात चीनने यश प्राप्त केले आहे.

**चीनच्या शेतीक्षेत्रातील उत्पादन वाढ**

| उत्पादन प्रकार | उत्पादनाची आकडेवारी दशलक्ष टनामध्ये | | |
|---|---|---|---|
| | १९४९ | १९७८ | १९९९ |
| धान्योत्पादन | ११३.१८ | ३०४.७७ | ५०८.३९ |
| तेलबिया | २.५६ | ५.२२ | २६.०१ |
| ऊस | २.६४ | २१.१२ | ७४.७० |
| शर्कराकंद (बीट) | ०.१९ | २.७० | ८.६४ |
| फळे | १.२० | ६.५७ | ६२.३८ |
| कपास | ०.४४ | २.१७ | ३.८३ |
| मटण | २.२० | ८.५६ | ५९.६१ |
| मासे | ०.४५ | ४.६६ | ४१.२२ |

*संदर्भ : 'चायना विंडो डॉट काम.'*

भारताच्या अर्थव्यवस्थेचा विचार करावयाचा तर लागवडीच्या क्षेत्रात वाढ करून शेतीउत्पादनात वाढ करण्याचा मार्ग आता बंद झाला आहे. एवढेच नव्हे तर वाढत्या औद्योगिकीकरणामुळे व त्यासोबत वाढणाऱ्या शहरीकरणामुळे भविष्यकाळात काही प्रमाणात लागवडीखालील क्षेत्रामध्ये घट येण्याची शक्यता आहे. मग अशा परिस्थितीत उपलब्ध पर्याय केवळ जमिनीची उत्पादकता वाढविण्याचाच शिल्लक राहतो. हा पर्याय निवडायचा म्हटले की त्यासाठी शेतीक्षेत्राच्या विकासप्रक्रियेत शासनाचा हस्तक्षेप नव्हे तर शासकीय प्रयासाची नितांत गरज निर्माण झाली आहे. आणि वस्तुस्थिती अशी असताना आर्थिक उदारीकरणाच्या नावाने शासनाचे काम केवळ चांगले प्रशासन करण्याएवढे मर्यादित करण्याच्या वातावरणात स्वाभाविकपणेच शेतीक्षेत्रात उत्पादकता वाढविण्यासाठी फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत.

आर्थिक उदारीकरणाच्या वातावरणात लोकशाही राज्यपद्धती असणाऱ्या आपल्या देशात राज्यकर्ते काय करू शकतात? तर शेतकऱ्याला उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन म्हणून धान्याच्या किंमती वाढवून देऊ शकतात. शेतकऱ्यांचे कैवारी म्हणवून घेणाऱ्या आमच्या कृषिमंत्र्यांनी ही कृती केली आहे. त्याच्याही पुढे जाऊन शेतकऱ्यांना आर्थिक न्याय मिळण्यासाठी जनतेने हा अधिक किंमतीचा भार सोसला पाहिजे असे प्रतिपादन करण्याची जबाबदारी भारताच्या अर्थमंत्र्यांनी पार पाडली आहे. पण धान्याचे भाव वाढले तर आपल्या उपजीविकेसाठी धान्य खरेदीसाठी बाजारात येणाऱ्या शेतमजूर, सीमांत शेतकरी, छोटे शेतकरी या शेती क्षेत्रातील बहुसंख्यांकांच्या उपासमारीत भर पडेल या उघड वास्तवाकडे राज्यकर्ते काणाडोळा करीत आहेत असेच म्हणावे लागते. तसेच शेती क्षेत्राबाहेर राबणाऱ्या बहुसंख्य असंघटित कामगारांसाठी धान्याचे भाव वाढणे हे वाढत्या उपासमारीचे आमंत्रण ठरणार आहे. बरे अर्थमंत्र्यांनी अशा पद्धतीचा युक्तिवाद करताना नियोजन मंडळाचा सल्लाही धुडकावून लावला आहे. भारतीय नियोजन मंडळाच्या मते वार्षिक ८ ते ९ टक्के आर्थिक वाढीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी महागाईचा दर वर्षाला सुमारे ४ टक्क्यांवर नियंत्रित करावा लागेल. या सल्ल्याचा आता पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्रीयुत रेड्डी यांच्यामते मार्च २००९ पर्यंत महागाईचा दर ७ टक्क्यांपर्यंत खाली येईल. म्हणजे नजिकच्या भविष्यकाळात सरकारला महागाईवर नियंत्रण मिळवता येणार नाही हे आता स्पष्ट झाले आहे. यामुळे आता आर्थिक वाढीचा दर किती घटतो हे पाहणे आपल्यासाठी क्रमप्राप्त आहे. धान्याचे भाव वाढल्यामुळे धान्योत्पादनात विक्रमी वाढ होण्याची शक्यता नाही. कारण ती साधण्यासाठी नवीन अधिक उत्पादक वाणे शोधण्याची आणि ती शेतकऱ्यांच्या शिवारापर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. आज त्या दिशेने प्रवास सुरू झालेला दिसून येत नाही. एवढेच कशाला तर पश्चिम उत्तर प्रदेशात हरित क्रांती यशस्वी झाली असली तरी ती मध्यप्रदेश किंवा पूर्व उत्तर प्रदेशात पोहोचलेली नाही. त्यामुळे साध्य झालेले हरितक्रांतीचे लाभ देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे प्रयास कोणी घेतलेली नाहीत. या सर्व बाबी विचारात घेतल्या की या पंचवार्षिक योजनेच्या काळात धान्योत्पादनात फारशी वाढ होणार नाही हे वास्तव अभ्यासकाला दिसू लागते. तेव्हा धान्याची दरडोई उपलब्धता न वाढता हे सरकार देशातील गोरगरीब जनतेला भेडसावणारी भुकेची समस्या कशी सोडविणार आहे हा एक गहन प्रश्नच आहे!

भारताच्या आर्थिक विकास प्रक्रियेने गेल्या ४ वर्षांमध्ये सरासरी ९ टक्के दराने वाढ नोंदविलेली आहे. पण या विकास प्रक्रियेपासून शेतीक्षेत्र वंचित राहिले आहे. सर्व क्षेत्रांमधील विकासासाठी सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्र यांनी एकत्र येऊन काम करावे अशी सरकारची नीती असताना कृषि क्षेत्रात अशा भागीदारीचे स्वरूप काय राहिले आहे हे पाहणे उद्‌बोधक ठरावे. शेती क्षेत्रामध्ये उत्पादन वाढ करण्यासाठी गेल्या १५ वर्षांत सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्राने एकत्रित किंवा स्वतंत्रपणे फारसे प्रयास केले नाहीत. हां, खाजगी क्षेत्राने मोनसँटोसारख्या बहुराष्ट्रीय कंपनीकडून कापसाच्या नवीन बियाण्यांचे उत्पादन व विक्री करण्याचे हक्क विकत घेऊन व त्यानुसार नवीन बियाणी निर्माण केली. अशा बियाण्यांची सरसकट विक्री करून भरघोस नफा मिळविला. तसेच कलिंगडासारख्या फळाचे बियाणे मोठ्या प्रमाणावर आयात करून त्याच्या विक्रीतून भरपूर माया जोडली. या आर्थिक उदारीकरणाच्या काळात बियाण्यांची परदेशातून आयात करून आणि त्याचे वितरण करून भरघोस नफा मिळविण्याच्या प्रक्रियेला चालना मिळाली आहे. तसेच नव्या काळात ग्रामीण भारतातील शेतकऱ्यांना पठाणी व्याजदराने कर्जे देऊन लुबाडणारा ग्रामीण सावकार आता बऱ्याच अंशी कालबाह्य झाला आहे. त्याच्या जागी आता शेतकऱ्याला शेती उत्पादनासाठी लागणारी बी-बियाणी, खते आणि कीटकनाशके उधारीने देऊन सुगीच्या काळात त्याची चढ्या दराने भरपाई करून घेणाऱ्या व्यापाऱ्यांचा नवा वर्ग आता उदयाला आला आहे. हा व्यापारी देईल ते बियाणे, तो सांगेल तशी मशागत व लागवड, त्याने सांगितल्याप्रमाणे पिकाची निगराणी आणि शेवटी दैवगतीने हाती लागेल ते पीक अशी स्थिती आजच्या शेतकऱ्याची झाली असल्याचे मत अनेक अभ्यासकांनी नोंदविले आहे. यातील सर्व गैरव्यवहारांकडे शासन काणाडोळा करीत आहे. शासन आणि उद्योजक यांच्या भागीदाराचे हे स्वरूप आहे. या 'उदार' धोरणामुळे

शेतकऱ्यांची दैन्यावस्था वाढते आहे. यामुळेच मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरू आहेत. देशात वर्षाला सरासरी १६००० शेतकरी आत्महत्या करतात असे शासनाकडून गोळा केली जाणारी आकडेवारी दाखविते!

आज शासनाच्या अखत्यारीतील कृषि विद्यापीठे आणि शेती-संशोधन संस्था पूर्णपणे बंद करण्यात आलेल्या नाहीत. पण त्यात कालानुरूप बदल केले जात आहेत काय? म्हणजे कृषि विस्ताराचे काम करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जातो की नाही? की सरकारी खर्चाला कात्री लावण्याच्या नावाखाली कृषि संशोधन आणि कृषि विस्तार या कामांना कात्री लावली जात आहे? या सर्व प्रश्नांना विचारात घेऊ सरकारची कृषिविषयक कामगिरी तपासायला हवी. जे कृषि-क्षेत्र सुमारे ६० टक्के लोकांना रोजगार पुरवते, सर्व जनतेची भूक भागविते त्या क्षेत्राची हेळसांड करून जनतेचे शारीरिक आणि सामाजिक स्वास्थ्य जोपासता येणार नाही ही वस्तुस्थिती आहे. या वास्तवाकडे दुर्लक्ष केले, तर विकासप्रक्रियेला खीळ बसेल याची जाणीव राज्यकर्त्या वर्गाला करून देण्याची ही वेळ आहे.

येथपर्यंत आपण प्रामुख्याने उत्पादनवाढीला प्राधान्य देऊन त्या मार्गातील समस्या उघड करण्याचा प्रयत्न केला. पण समजा पुढच्या पाच वर्षात धान्याचे उत्पादन २५-३० टक्यांनी वाढले तर कोणती नवीन समस्या उद्भवण्याची शक्यता आहे याचाही जरा डोळसपणे विचार करण्याची गरज आहे. नजिकच्या भूतकाळातील उदाहरण घ्यायचे तर २००१-०२ साली देशात धान्याचे विक्रमी उत्पादन झाले. अशावेळी देशातील बाजारपेठेत धान्याचे भाव कोसळू नयेत यासाठी सरकारला प्रचंड प्रमाणावर धान्यखरेदी करावी लागली. धान्य साठविण्यासाठी गोदामे अपुरी पडली. यामुळे सरकारचे धान्याचे साठे उघड्यावर ऊन-पावसाशी झुंज देत राहिले. यामुळे काही कालावधीनंतर हे धान्य माणसांसाठी अखाद्य ठरले. मग पुढील दोन वर्षे अशा धान्याची पशुखाद्य म्हणून निर्यात सुरू राहिली. या काळात धान्याचा पुरवठा सुधारला म्हणून त्याचा दरडोई खप वाढल्याचे निदर्शनास येत नाही. याचे सोपे कारण म्हणजे लोक उपाशी असले तरी खिशात पैसा नसेल तर त्यांना बाजारात धान्यखरेदी करता येत नाही हेच आहे. म्हणजे केवळ उत्पादन वाढवून भुकेची समस्या निकालात निघणार नाही. तर लोकांकडे धान्य खरेदीसाठी क्रयशक्ती निर्माण करण्याचे कामही शासनालाच करावे लागणार आहे.

तर अशा या क्रयशक्तीच्या निर्मितीचा एक प्रयत्न म्हणून केंद्र सरकारच्या ग्रामीण रोजगार हमी योजनेकडे पाहता येईल. या योजनेनुसार ग्रामीण भागामधील एका कुटुंबातील एका व्यक्तीला ६० रुपये रोजावर वर्षाला १०० दिवसांचा रोजगार देण्याची घोषणा सरकारने केली आहे. म्हणजे एका कुटुंबाला वर्षाला ६००० रुपये किंवा महिन्याला ५०० रुपये मिळण्याची सोय या योजनेमुळे उपलब्ध होणार आहे, पण ती केव्हा तर ही योजना पूर्णार्थाने राज्यसरकारे राबवितील तेव्हा! गेल्या दोन वर्षातील या योजनेची कार्यवाही व उघड झालेला भ्रष्टाचार लक्षात घेता ही योजना ग्रामीण भागातील बेरोजगारांसाठी किती लाभदायक ठरणार आहे? या योजनेची महाराष्ट्रातील रोजगारहमी योजनेशी तुलना केल्यास महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेत कुटुंबातील सर्व सक्षम व्यक्तींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती याचा आवर्जून उल्लेख करायला हवा. तसेच महाराष्ट्राची ग्रामीण रोजगार हमी योजना १९७२ साली म्हणजे भारत आर्थिक महासत्ता म्हणून पुढे येण्यापूर्वीची होती ही बाबही दुर्लक्षून चालणार नाही. अर्थात आर्थिक उदारीकरणाच्या काळात महाराष्ट्र शासनाची रोजगार हमी योजनाही हळूहळू बंद करण्यात येत आहे. आणि या योजनेसाठी कररूपाने उभी केलेली रक्कम इतर खर्चासाठी वळविण्यास सुरुवात झाली आहे. आर्थिक उदारीकरण म्हणजे काय तर सरकारला अनिर्बंध पद्धतीने आर्थिक व्यवहार करण्यास मुक्तद्वार!

ही सर्व चर्चा करण्यामागचे एकमेव कारण म्हणजे चीनमध्ये बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्था प्रचारात आल्याचे आपण ऐकतो. तेथे गेली तीस वर्षे आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया सुरू आहे, याचा सर्व अभ्यासक आवर्जून उल्लेख करतात, पण चीनमधील ही आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया किती मानवी आहे याचा उल्लेख अभावानेच होतो. चीनमधील आर्थिक विकासाची प्रक्रिया पाहू गेल्यास 'शेती हा अर्थव्यवस्थेचा पाया आहे तर उद्योग हा पुढे नेणारा घटक आहे' या माओच्या वचनाकडे त्यांनी अजून दुर्लक्ष केलेले नाही असेच म्हणावे लागते. यामुळे चिनी राज्यकर्त्यांनी औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष केले नाही. त्यांचा शेतीक्षेत्राच्या उत्पादन वाढीचा वेग आर्थिक उदारीकरणाच्या काळातही चार टक्क्यांहून अधिक राहिला आहे. चीनची लोकसंख्या भारतापेक्षा सुमारे २० टक्क्यांनी जास्त आहे. पण चिनी अर्थव्यवस्थेत भारताच्या अडीचपण धान्य फस्त होते. तेथे उन्हाळ्याच्या दिवसामध्ये भाजीपाल्याचे उत्पादन आणि खप अमाप असतो. आपल्या देशात जसे आंबा हे भारतभर होणारे फळ आहे तशी स्थिती चीनमध्ये सफरचंदांची आहे. या सफरचंदांच्या उत्पादनामध्ये आणि खपामध्ये चीनचा जगात पहिला क्रमांक लागतो. चीनमध्ये अर्धपोटी लोकांची संख्या भारताच्या तुलनेत लक्षणीय प्रमाणात कमी आहे. एक ते सहा या वयोगटातील कुपोषित बालकांची संख्या भारतामध्ये ४७ टक्के आहे तर चीनमध्ये ती ८ टक्के आहे. यामुळेच मनुष्य विकासाच्या निर्देशांकानुसार जागतिक पातळीवर चीनचा क्रमांक ८१ वा आहे तर भारताचा क्रमांक १२८ वा आहे. या साऱ्याचा अर्थ औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत शेतीक्षेत्रातून तात्पुरत्या अतिरिक्त ठरणाऱ्या मनुष्यबळाच्या प्राथमिक गरजा अतृप्त राहणार नाहीत याची सोय त्या अर्थव्यवस्थेत केलेली असणार असे अनुमान काढता येते. विकासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर विकसनशील राष्ट्रामध्ये ज्याला करण्यासाठी काम नाही आणि म्हणून निर्वाहासाठी पैसा नाही असा दयनीय लोकांचा गट निर्माण होतो, पण अशा वर्गाची निर्मिती हा जसा विकासप्रक्रियेतील अटळ भाग आहे तसाच या वर्गाच्या आर्थिक समस्येचे मानवी पद्धतीने निराकरण करण्याचा प्रयत्न करणे हे कल्याणकारी शासनाचे कर्तव्य आहे. आमच्या देशातील राज्यकर्त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

राज्य युपीएचे असो वा एनडीएचे असो. येथील शेतीक्षेत्राला चालना देण्याचे आणि अर्थव्यवस्थेतील अतिरिक्त मनुष्यबळाच्या

*(पृष्ठ २४ वर*

# कोंबडे झाकल्याने सूर्य उगवायचा थांबत नाही!

**शासकीय हस्तक्षेप नसता तर खताचे उत्पादन वाढते राहिले असते, स्पर्धेमुळे कमी खर्चात उत्पादन झाले असते. शासकीय अधिकाऱ्यांना व मंत्र्यांना जरी वाढत्या खतमागणीची कल्पना आली नसली तरी खाजगी व्यापाऱ्यांना व कारखानदारांना ती नक्कीच आली असती, तिचा फायदा उठविण्यासाठी तरी त्यांनी काही पावले आधीच उचलली असती. गुंतवणूकदारांनी या वाढीव मागणीचे भाकित आधीच केले आहे, त्यामुळे काही खत कंपन्यांचे शेअर्स कोसळत्या बाजारातदेखील टिकले, वाढले. एकूणच अर्थव्यवस्थेच्या जाळ्याची स्पंदने खाजगी व्यक्तींना सहज जाणवतात. शासकीय अधिकारी व मंत्री त्या बाबतीत असंवेदनशील व गेंड्याच्या कातडीचे असतात. फ्युचर्स मार्केटमुळेदेखील भविष्यातील टंचाईची किंवा अतिपुरवठ्याची कल्पना येते. भाव काही प्रमाणात स्थिर होतात व आगाऊ उपाययोजना करता येते. फ्युचर्स मार्केट बंद करून भाववाढ थांबवता येत नाही, कोंबडे झाकल्याने सूर्य उगवायचा थांबत नाही.**

**सुभाष आठले**

पर्यावरणाचे जाळे पृथ्वीभर पसरलेले आहे त्यामुळे कोठेही पर्यावरणविषयक काही घटना घडली, की तिचे परिणाम स्थानिक रहात नाहीत, तर जगभर तिची स्पंदने जाणवतात. जाळ्याच्या मध्यभागीच्या कोळ्याप्रमाणे आपण संवेदनशील असलो तर आपल्याला ती स्पंदने, त्यांचे उगमस्थान व त्यांचे अपेक्षित परिणाम जाणवतात. ही संवेदनशीलता पर्यावरण-रक्षणासाठी तसेच आत्मरक्षणासाठी आवश्यक आहे व ती अभ्यासाने मिळवता येते. अर्थव्यवस्थेचेदेखील असेच जगभर पसरलेले जाळे आहे व भारतभर पसरलेले त्याचे एक उपजाळे आहे. भारतीय जाळे जागतिक जाळ्यापासून अलिप्त, स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न भारतीय राजकारण्यांनी केला, तो प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी झाला व त्याचे बरे-वाईट परिणाम आपण जाणतोच. एकंदरीत वाईट परिणाम अधिक झाले, असे वादग्रस्त बहुमत झाल्याने जागतिकीकरणाचे प्रयत्न सध्या चालू आहेत. तरी अजून बऱ्याच प्रमाणात भारतीय व्यवस्था जागतिक व्यवस्थेपासून अलग आहे.

काही घटना भूकंपासारख्या असून त्यांचे धक्के सर्वत्र व अर्थात भारतातदेखील जाणवतात. प्रथमदर्शनी या घटना अनपेक्षित, सुनामी किंवा चक्रीवादळाप्रमाणे अस्मानी वाटल्या तरीही निरीक्षणाने, अभ्यासाने त्यांची आधी किंवा लवकर सूचना मिळू शकते व योग्य उपाय योजून नुकसान टाळता किंवा कमी करता येते- क्वचित फायदादेखील उठवता येतो.

अर्थव्यवस्थेतील भूकंपासारखी अलीकडची जागतिक घटना म्हणजे अमेरिकेतील सब-प्राइम-घोटाळा, म्हणजे (लोभापोटी) कर्ज फेडण्यास नालायक व्यक्तींना किंवा संस्थांना कर्जे देणे. या प्रकरणात अमेरिकन बँकांनी, आजच्या अंदाजाप्रमाणे तीनशे बिलियन डॉलर्सपेक्षा जास्त नुकसान मिळवले. म्हणजे बारा लाख कोटी रुपये ही कर्जे अमेरिकन बँकांनी जगभरच्या बँकांना विकल्याने (सिक्युरिटायझेशन) हे नुकसान जगभर वाटले गेले. भारतीय बँकांचे व परिणामत: भारतीय सर्वसाधारण माणसाचेही यात नुकसान झाले! अमेरिकन बँकांनी फायद्याच्या आशेने अशी कर्जे दिली, पण भारतीय बँका शासकीय आदेशामुळे अशी कर्जे देतात. यात नुकसान राजकारण्यांचे होत नाही, तर सर्वसाधारण भारतीय ठेवीदारांचे व करदात्यांचे होते. राजकारण्यांचा कायम फायदाच होतो.

असाच भूकंपाचा धक्का जलद गतीने वाढणाऱ्या खनिज तेलाच्या किंमतींनी दिला तो जगभर जाणवणारच. पण हा धक्का अनपेक्षित नव्हता. वाढत्या किंमती पूर्णपणे अपेक्षित होत्या. त्याला आपले राजकीय उत्तर हे वाळूत तोंड खुपसून वादळ नाकारणाऱ्या शहामृगाप्रमाणे होते व आहे. वेळच्या वेळी वाढती किंमत ग्राहकांपर्यंत पोचवली असती तर ग्राहकांनी उपभोग कमी केला असता, पर्याय शोधले असते व जास्त उपभोग घेणाऱ्याला त्याची जास्त किंमत द्यावी लागली असती. ते सामाजिक व आर्थिक न्यायाचे झाले असते. कुटुंबप्रमुखाने वाढत्या महागाईची जाणीव सर्व कुटुंब घटकांना दिली नाही, तर खर्च वाढता राहून कर्जबाजारी होण्याची व नंतर एकदम रस्त्यावर यावे लागण्याची शक्यता असते. आजच्या शासकीय धोरणामुळे गाड्या उडवणाऱ्या श्रीमंतांचा भार गरीब जनता सोसत आहे, पर्यायी ऊर्जासाधने शोधण्याची, ऊर्जाबचत करण्याची निकड भासत नाही व शासन म्हणजेच सर्वसाधारण जनता कर्जबाजारी होत आहे. शिवाय डिझेल, पेट्रोलमध्ये रॉकेल मिसळण्याचे परिणाम गुप्तच आहेत. परवाच्या दरवाढीनंतरदेखील वार्षिक ४०००० कोटी रुपयांचा तोटा शासनाला व तेल कंपन्यांना होईल. म्हणजे माणशी ४०० रुपयांचे किंवा पाच माणसांच्या कुटुंबाचे वार्षिक दोन हजार रुपयांचे नुकसान होय. हे नुकसान तेलाच्या आंतरराष्ट्रीय भावाबरोबर वाढतच जाणार. तेलाचे देशातील भाव वाढले असते तरी कुटुंबाचा खर्च वाढला असता हे खरे, पण मग तो तेलाच्या वापरानुसार कमी-अधिक वाढला असता व ते आर्थिक न्यायाचे झाले असते. आज गरिबांच्या खांद्यावर श्रीमंतांचे ओझे असा (अ)न्याय आहे! तेलाचे अंतर्गत भाव वाढवले तर खप कमी होईल, त्यामुळे आयातखर्चात थोडी बचत होईल, जागतिक तापमान वाढीला थोडा, किंचित आळा बसेल. तेलावरील कराचे शासनाचे उत्पन्न बरेच वाढेल, त्यामुळे शिक्षण व इतर पायाभूत गोष्टींसाठी शासनाला पैसा मिळेल, ऑईल बाँडस्‌चा भावी पिढ्यांवरील व भावी शासनांवरील बोजा कमी होईल.

सध्या ऐन पेरणीच्या हंगामात खतांची टंचाई झाली आहे,

खतांसाठी शेतकऱ्यांना आंदोलने करावी लागत आहेत. मागणी वाढल्याने ही टंचाई निर्माण झाली आहे. ही टंचाई व मागणी वाढणे अनपेक्षित होती काय? नाही! मागणी वाढणे अपेक्षितच होते. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांच्या, बँकांच्या हातात ७२ हजार कोटी रुपये ऐन पेरणीच्या हंगामात पडले. गव्हाचे उत्पादन वाढले, गव्हाला भाव वाढवून मिळाला, त्यामुळेही शेतकऱ्याच्या हातात पैसा पडला. बऱ्याच प्रांतात रोजगार हमी योजनेमुळेही शेतकऱ्याला थोडा पैसा मिळाला. वेतन आयोगामुळे सरकारी कर्मचाऱ्यांना अधिक वेतन मिळू लागले व पूर्वलक्षी परिणामाने बरीच रक्कम मिळाली किंवा मिळणार असे नक्की झाले. अनेक शेतकरी कुटुंबांमध्ये एकतरी सरकारी नोकर असल्याने हा पैसाही शेतीकामासाठी उपलब्ध झाला. धान्याचे भाव चढे असल्याने शेतकऱ्याला अधिक उत्पन्नासाठी अधिक गुंतवणूक करण्याची प्रेरणा होती-आहे. पाऊसदेखील अगदी वेळेवर किंवा लवकरच सुरू झाला. यापैकी पाऊस सोडता सर्वच गोष्टी अपेक्षित होत्या. मग खतांची मागणी वाढणार हे सरकारी अधिकाऱ्यांना, मंत्र्यांना कळले नाही काय? कळले असले तर टंचाईवर मात करण्यासाठी त्यांनी काय उपाय केले?

दरवर्षी खतांची मागणी १० टक्के वाढत असल्याने खते निर्माण करण्याची क्षमता तितकी वाढणे आवश्यक आहे. पण शासकीय हस्तक्षेपामुळे खतांच्या किंमती अवास्तव कमी ठेवल्या जातात व फरकाचे अनुदान शासन खत कंपन्यांना देते. या अनुदानाची थकबाकी कित्येक हजार कोटी रुपयांची असल्याने खतकंपन्या उत्पादनवाढीला असमर्थ आहेत. आयातीला बंदी आहे, अनुदानामुळे अकार्यक्षम कारखानेदेखील फायद्यात चालू राहिले, पण देशावर त्यांचा बोजाच होऊन राहिला आहे. कारखाना उभारायला सुरुवात केल्यानंतर किमान तीन वर्षे कालावधीनंतर उत्पादन सुरू होणार! शासकीय हस्तक्षेप नसता तर खताचे उत्पादन वाढते राहिले असते, स्पर्धेमुळे कमी खर्चात उत्पादन झाले असते. शासकीय अधिकाऱ्यांना व मंत्र्यांना जरी वाढत्या खतमागणीची कल्पना आली नसली तरी खाजगी व्यापाऱ्यांना व कारखानदारांना ती नक्कीच आली असती, तिचा फायदा उठविण्यासाठी तरी त्यांनी काही पावले आधीच उचलली असती. गुंतवणूकदारांनी या वाढीव मागणीचे भाकित आधीच केले आहे, त्यामुळे काही खत कंपन्यांचे शेअर्स कोसळत्या बाजारातदेखील टिकले, वाढले. एकूणच अर्थव्यवस्थेच्या जाळ्याची स्पंदने खाजगी व्यक्तींना सहज जाणवतात. शासकीय अधिकारी व मंत्री त्या बाबतीत असंवेदनशील असतात. फ्युचर्स मार्केटमुळेदेखील भविष्यातील टंचाईची किंवा अतिपुरवठ्याची कल्पना येते. भाव काही प्रमाणात स्थिर होतात व आगाऊ उपाययोजना करता येते. फ्युचर्स मार्केट बंद करून भाववाढ थांबवता येत नाही, कोंबडे झाकल्याने सूर्य उगवायचा थांबत नाही. पंजाबमध्ये भूगर्भातील पाण्याची पातळी खाली जाऊ लागली, म्हणून तेथील शासनाने आदेश दिला की पाऊस सुरू झाल्यावरच भाताची पेरणी/लावण करावी. पूर्वी बोअरवेलमधून पाणी पंप करून प्रत्यक्ष पावसाळ्यापूर्वी भाताची लावण सुरू होई. ती सर्वांची एकदम होत नसे, बरीच पुढे-मागे होई. त्यामुळे लावणीसाठी मजूर मिळण्यास अडचण येत नसे. यावर्षी पाऊस आल्यावर सर्वांची लावणी एकदमच, एका मुहूर्तावर सुरू झाली. त्यामुळे मजुरांची टंचाई निर्माण होऊन मजुरीचा एकरी खर्च एकदम दीड पटीने वाढला! अशा परिणामांचे भाकित बऱ्याच वेळा कोणालाच करता येत नाही. या आपल्या मर्यादांचे भान राखून शासनाने शक्यतो सर्वांच्याच मग ते शेतकरी असोत, व्यापारी असोत वा कारखानदार- निर्णयस्वातंत्र्यावर बंधने आणू नयेत. निर्णयाची पातळी जितकी विकेंद्रित, तितका त्यातील धोका कमी. केंद्रीभूत निर्णय बऱ्याच वेळा नुकसानीचे ठरतात.

पंजाब, हरियाणा येथे दरवर्षी बिहार-ओरिसा, पूर्व उत्तरप्रदेश येथील मजूर शेतीच्या हंगामात स्थलांतर करीत असतात, त्या जोरावर बरीच शेतीची कामे होत असतात. यावर्षी रोजगार हमी योजनांमुळे हे मजुरांचे स्थलांतर कमी झाले आहे. या योजना नीट चालू राहिल्या तर पुढील वर्षापासून ते जवळपास थांबेलच. भातलावणीची यंत्रे बरीच महाग व लहान शेतकऱ्यांना न परवडणारी असतात. कोणताही पर्याय निवडला तरी शेतीचा खर्च वाढणार हे नक्की. त्या प्रमाणात भाताला भाव वाढवून मिळणार का?

रोजगार हमीचे उद्दिष्ट चांगलेच आहे, पण ज्यावेळी शेतीच्या हंगामात धान्योत्पादनास आवश्यक असा रोजगार भरपूर उपलब्ध आहे, त्यावेळी या योजना चालू असाव्यात का? शेतकऱ्याला मजूर मिळण्यासाठी सरकारी योजनेबरोबर स्पर्धा करावी लागावी काय? कोणत्याही योजनेचे परिणाम समाजाच्या सर्व घटकांवर सारखेच होतील असे नाही. प्रत्येक योजनेचे बरे व वाईट असे दोन्ही प्रकारचे परिणाम विविध समाजघटकांवर होत असतात, ते स्थानिकच असतील असे नाही. लांब अंतरावर व काही कालावधीनंतरही घडतात. शासनाने समतोल बुद्धीने व जागरूकतेने या परिणामांची नोंद ठेवून ज्यांच्यावर वाईट परिणाम होतो, त्यांना सहृदयतेने मदत करायला हवी. प्रगतीसाठी कोणाचा तरी बळी जाणारच ही वृत्ती नसावी. तसेच एक समाजघटक लाडका व दुसरा दोडका असे असू नये. पण निवडणुकीच्या राजकारणामुळे तसे होणे अटळ दिसते. यावर उपाय?

उपाय असो वा नसो, सर्वसाधारण वाचकाने व नागरिकाने या अर्थव्यवस्थेच्या जाळ्याबद्दल सजग व संवेदनशील राहणे आवश्यक आहे. त्यातूनच काही उपाय निघू शकेल.

संकटांमुळे व्यक्तीच्या कर्तृत्वास बहर येतो असे म्हणतात. १९९१ च्या आर्थिक संकटामुळे भारताच्या आर्थिक कर्तृत्वास बहर आला, त्याचा आत्मविश्वास वाढला व महत्त्वाकांक्षा रूजली. नवनवीन आर्थिक संकटांनी त्यात भरच पडेल- जर शासनाने योग्य पावले उचलली तर!

**सुभाष आठले**
२५, नागाळा पार्क, कोल्हापूर ४१६००३
फोन : 0231-2656647

*हा लेख जून अखेरीस साधनाकडे आला होता, हे यातील पावसाचा संदर्भ वाचताना ध्यानात घ्यावे.* **–संपादक**)

# वलयाला बाय-बाय

## अनुवाद : सुनेत्रा आगाशे

**केंद्र सरकारने विश्वासदर्शक ठराव संमत करून घेतल्यानंतर ‘डॉ.मनमोहन सिंगांबद्दलची उलटसुलट मते’, या विषयावर ‘आऊटलुक’ या साप्ताहिकाच्या ४ ऑगस्टच्या अंकात शीला रेड्डी यांचा अभ्यासपूर्ण लेख आहे. या लेखातील राष्ट्रीय पातळीवरील मान्यताप्राप्त अभ्यासू व्यक्तींची मते ‘साधना’च्या वाचकांसमोर यावीत म्हणून त्या लेखाचा हा मराठी अनुवाद.**

लोकसभेत विश्वासदर्शक ठरावावरील चर्चेच्या दरम्यान भाजपाच्या तीन खासदारांनी सभागृहात नोटांची बंडले दाखवून सर्वांना थक्क करून सोडले. या प्रक्रियेमध्ये पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्याभोवती हुशार, प्रामाणिक, अ-राजकारणी पण धूर्त या विशेषांचे जे वलय आहे, त्यालाच छेद देण्याचा प्रयत्न होता. पण ही नोडांची बंडले दाखवणे, दंगा करून हुल्लडबाजी करणे यामुळे झाले ते एकदम उलटेच. डॉ.मनमोहनसिंग एका अशक्य वाटणाऱ्या नव्या रूपात समोर आले. एका सज्जन गृहस्थाचे मुरलेल्या राजकारणीच्या रूपात परिवर्तन झालेले दिसले आणि ते जनतेच्या दीर्घकाळ स्मरणात राहील असे अनेक बुद्धिवंतांचे मत आहे.

मानसशास्त्रज्ञ **आशीश नंदी** यांच्यामते ‘थोड्याशा चिखलफेकीने डॉ.मनमोहनसिंगांची प्रतिमा मलिन होण्याऐवजी एक धूर्त राजकारणी अशी प्रतिमाच आणखी प्रकाशमान होईल. मुख्य प्रवाहातील राजकीय नेत्याला कधीही साधूसंतांचा आव आणून चालत नाही. प्रागतिक राजकीय नेतृत्वाला हे जाणून घेणे अवश्यकच असते की कुठले कुरण हिरवेगार आहे.’ समाजशास्त्रज्ञ **आंद्रे बेलेल** हे मान्य करून म्हणतात की, ‘सरकार चालवण्यासाठी आवश्यक तो घोडेबाजार अस्तित्वातच नाही किंवा त्याची मला माहिती नाही, असे कोणत्याही पंतप्रधानाने म्हणणे हे अगदी अविश्वसनीय व अवास्तव आहे. पंडिन नेहरूंच्या काळातही हे होत नव्हते असे नाही. कारण तत्त्वांना चिकटून कोणीही राजकारणात टिकू शकत नाही.’

माजी ॲटर्नी जनरल **सोली सोराबजी** म्हणतात, ‘आता पंतप्रधानांनी हिकमतीने सरकार टिकवून दाखवल्यावर त्यांना इतर कोणी सहजासहजी मोडीत काढू शकणार नाही.’ तमिळ लेख अशोक मित्रन हेही मान्य करतात की, ‘मनमोहनसिंग यांनी स्वत:ला राजकारणी म्हणून शाबीत केले आहे. ते एक व्यवहारी, प्रागतिक राजकारणी आहेत, फक्त तत्त्वांना चिकटून राहणारे नाहीत हे सिद्ध झाले आहे.’

सामाजिक इतिहासकार **मुकुल केशवन्** म्हणतात, ‘आघाड्याचा खेळ सुरू करणाऱ्याला हे मान्यच करावे लागते की या आघाड्यांच्या गाड्यांचे वंगण म्हणजे पैसा आहे. आपल्या पक्षातील एकी, नेकी भरभरून बोलत असतानाही मनमोहनसिंगांना सत्य परिस्थितीचे पूर्ण भान आहे. अपघाताने कोणीही अर्थमंत्री, नंतर प्रधानमंत्री बनत नाही. त्यासाठी राजकीय गुंतागुंतीचे रहस्य कळणे महत्त्वाचे आहे.’

**रामचंद्र गुहा** म्हणतात, ‘तडजोडी किती आणि कशा कराव्या लागतात, हे नीट कळण्याइतपत ते राजकारणात मुरले आहेत.’ या सर्व प्रकरणात घोडेबाजार जोरावर होता याबद्दल नव्हे तर त्याची प्रसारमाध्यमांनी जी चर्चा केली त्याचे आश्चर्य वाटले.’

‘गेल्या कमीत कमी २० वर्षांपासून भ्रष्टाचार आपल्या राजकारणात खोल रूजलेला आहे. थोड्याच दिवसांपूर्वी कर्नाटकात भाजपा सरकारला पाच स्वतंत्र उमेदवारांना विकत घेऊन सरकार स्थापावे लागले. मग आताच श्री.अडवानींनी याबद्दल साधूपणाचा आव का आणावा? आपल्या मतांची किंमत मोजून घेणे हे नवीन राहिलेले नाही हे श्री.आशिश नंदी मान्य करतात. जर काही बदलले असेल तर तो लोकसभेचा सामाजिक पोत. ज्यांच्याकडे स्वत:ची काही मालमत्ता नाही ते उमेदवार (खासदार) रोख रकमा स्वीकारतात. इतर मार्गांनी स्वत:चा फायदा करून घेणारे वरच्या स्तरातील लोक पकडले जात नाहीत, पण रोख रक्कम घेणारे पकडले जातात. डॉ.मनमोहनसिंगांनी हे कटुसत्य स्वीकारले आहे. तसेच ते आपल्या तत्त्वे जपणाऱ्या (किंवा तसे भासवणाऱ्या) मध्यम वर्गानेही स्वीकारावे असे श्री.नंदी सुचवतात.

असे ‘राजकीय व्यवस्थापन’ असतेच हे सरदार खुशवंतसिंगही मान्य करतात, पण त्याची माहिती असणे वेगळे व त्यात स्वत:चे हातही काळे करणे यात फरक आहे. डॉ.मनमोहनसिंह हे स्वत: ‘तंत्रज्ञ’ आहेत व त्यांनी त्यांच्या सहकार्यांना त्यांच्या त्यांच्या कुवतीप्रमाणे ‘कार्य’ करण्याची सूट दिली. मुशिरुल हसन यांच्यामते हे डॉ.मनमोहनसिंहांचे एका सद्‌गृहस्थाचे राजकारण्यात झालेले रूपांतर आहे.

मग ‘मिस्टर क्लीन’ अशी जी त्यांची प्रतिमा होती त्याचे काय झाले? **मि.बेतेल** म्हणतात की ‘डॉ.मनमोहनसिहांनी स्वत:ची अशी प्रतिमा कधीही प्रदर्शित केली नाही. कोणी म्हणतील की राजीव गांधींच्या अशा प्रतिमेची नंतर काय अवस्था झाली हे जाणूनच त्यांनी हा शहाणपणा केला. सोली सोराबजी म्हणतात की, ‘सध्याच्या काळात राजकारणात ‘मि. क्लीन’ होऊन सरकार चालवू शकत नाही. मि.बेतेल म्हणतात की त्यांनी एवढेच दाखवून दिले आहे की तो एक प्रामाणिक व स्पष्टवक्ता माणूस आहे. जो

आपले कर व्यवस्थित भरतो व ऑफिसमध्ये नेहमी अगदी वेळेवर हजर असतो. त्यांच्या स्वत:बद्दल कोणत्याही भ्रामक कल्पना नाहीत. ना ते स्वत:चे प्रसिद्धीवलय बनवू पाहतात.'

ते महात्मा गांधी नव्हेत व तेच ठीक आहे. कारण आजच्या काळातील सरकार चालवणे गांधी तत्त्वज्ञानात बसणारे नाही. गांधींनाच लोकांनी खड्यासारखे बाजूला काढून फेकले असते. राजकारण हे सिद्धांतावर आधारित असले तरी त्यासाठी धूर्तपणाची गरज असते. किंवा असे म्हणतात येईल की वैयक्तिक शुचिता वेगळी व प्रामाणिक राजकारणी असणे वेगळे, पण ते दोघे एकत्रित नांदू शकतात.

'इंडिया अनबाऊंड' या पुस्तकाचे लेखक **गुरुचरणदास** म्हणतात, 'राजकारणात आपल्याला आदर्शवादींची गरज नाही. महाभारताची पारायणे करीत मोठ्या झालेल्या भारतीयांना हे पक्के ठाऊक आहे की सत्यवादी युधिष्ठिरालाही असत्याचा आधार घ्यावा लागला. आपण भारतीय असेच व्यवहारी आहोत व आपले नेतेही व्यवहारी असावेत अशीच आपली अपेक्षा असते.'

**मुशिरुल हसन** म्हणतात, 'राजकारणात राहून कोणीही निष्पाप, निरागस राहू शकत नाही. सरकारे चालवताना जी देवाण-घेवाण चालते, चालवावी लागते त्याकडे सोईस्कर दुर्लक्ष करणे हे नेहरूंपासून सर्व प्रधानमंत्र्यांना करावे लागले आहे. यात मनमोहनसिंगाचा वेगळेपणा असा आहे की चातुर्याने स्वत:ची स्वच्छ प्रतिमा डागाळू न देता आपले सरकार वाचवण्यात ते यशस्वी झाले. त्यांची प्रतिमा डागाळली नाही याचे कारण त्यांनी ही अवघड लढाई स्वत:च शिरावर घेतली होती- स्वत:ला सिद्ध करण्यासाठी. सत्तेला चिकटून राहण्याची इच्छा असलेला कोणी अशी जोखीम उचलणार नाही, असे केशवन् म्हणतात. रामचंद्र गुहाही या मताशी सहमत होऊन म्हणतात, 'मनमोहनसिंह हे आदरणीय आहेत, पण त्यांना सरकार चालवायचे आहे व त्यासाठी तडजोडी कराव्याच लागतात हे त्यांना माहीत आहे. विश्वासदर्शक ठरावावरील चर्चेच्या दरम्यान हे दिसून आले की तेही रागावू शकतात.' **खुशवंतसिंहजी** म्हणतात की, 'त्यांची प्रतिमा संपूर्ण देशातील जनमानसात उंचावली आहे. संपूर्ण सत्रात सर्व गदारोळात ते निश्चलपणे बसून होते. शांतपणे, चेहेऱ्यावर भावना न आणता बघत होते व शेवटी विश्वासमत प्राप्त झाल्यावरही त्यांनी अतिरेकी आनंद व्यक्त केला नाही.'

अस्तित्व पणाला लावून त्यांनी स्वत:वरचा दृढ विश्वासच प्रकट केला नाही, तर अडवाणींच्या 'निकम्मा, दुबळा, निर्णयक्षमता नसलेला' या शेरेबाजीचाही पराभव केला, पण आता त्यांची जबाबदारी आणखी वाढली आहे. पुढे येणाऱ्या प्रत्येक संकटातून सरकारला वाचवण्याची जबाबदारी त्यांचीच- असे त्यांचे सहकारी म्हणतील.

**सुनेत्रा आगाशे**
२६१ शनिवार पेठ, सातारा
फोन : २३२०८४

---

*पृष्ठ २० वरून)*
किमान प्राथमिक गरजा भागविण्याचे काम करण्यात कोणीही पुढाकार घेणार नाही. जेथे असंघटित क्षेत्रात राबणाऱ्या ७७ टक्के मजुरांना दरडोई खर्चासाठी २० रुपये मिळत नाहीत तेथे काम नसणाऱ्यांची भूक शमविली जाईल असा विचार करणे हा कल्पनाविलास ठरेल. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतातील मूठभर उद्योजकांकडे नफ्याच्या रूपाने भरभरून पैसा येत राहील. यामुळे कदाचित पुढच्या पाच वर्षामध्ये जागतिक अब्जाधीशांच्या यादीत भारतीय उद्योजक आघाडी प्रस्थापित करतील. कदाचित त्यांची संख्या दुप्पट होईल. यामुळे मूठभर उद्योजकांचे अलिशात महाल उभे राहतील. सधनांच्या गरजा भागविण्यासाठी मॉल्स उभे राहतील. त्यांच्या करमणुकीसाठी मल्टिप्लेक्स निर्माण केले जातील, त्यांना अद्ययावत मोटारी पुरविण्यासाठी टोयाटो, फोर्ड, मर्सिडीस बेंझ अशा कंपन्यात स्पर्धा सुरू राहील. आणि अशा आतषबाजीची बेटे अर्धपोटी, अर्धनग्न अवस्थेत उघड्यावर दिवस काढणाऱ्या लोकांनी वेढलेली असतील. नजिकच्या काळात हे वास्तव बदलण्याची शक्यता नाही. तेव्हा राज्यकर्त्यांकडून जनकल्याणाच्या केल्या जाणाऱ्या घोषणा जनसामान्यांनी गंभीरपणे विचारात घेऊ नयेत हेच उत्तम. कारण अशा प्रकारची घोषणाबाजी हा एक लोकशाही संकेत असतो!

**रमेश पाध्ये**
rameshpadhye@hotmail.com
६, पद्मरेखा, ५९ जयप्रकाश नगर, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६३.
फोन : 022-26861814

## सहवेदना

सुप्रसिद्ध पुरातत्त्व तज्ज्ञ मधुसूदन नरहर ऊर्फ मदन देशपांडे यांचे ७ ऑगस्ट २००८ रोजी नवी दिल्ली येथे निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचे ते (निवृत्त) महासंचालक होते. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणात मूलभूत विचार व संशोधनात्मक अनुशासन आणण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. बुद्धकालीन लेण्यांवरील त्यांचे लेखन 'अजंता म्युरल्स' प्रसिद्ध असून भारतीय संस्कृती व पुरातत्त्व या विषयावर त्यांनी विपुल लेखन केले होते. अफगाणिस्तान, पाकिस्तान, चीन, ग्रीस, व्हिएतनाम, अमेरिका, इटली या देशांना पुरातत्त्व तज्ज्ञ म्हणून त्यांनी भेटी दिल्या.

रहिमतपूर, जि.सातारा येथे त्यांचा जन्म झाला. स्वातंत्र्यसैनिक डॉ.नरहर पांडुरंग देशपांडे यांचे पुत्र. सरकारी सेवेत रूजू होण्यापूर्वी ते राष्ट्र सेवादलात होते. त्यांच्या निधनामुळे एका सुसंस्कृत, गुणी व कार्यक्षम व्यक्तिमत्त्वाचा अंत झाला आहे. साधना परिवाराचे त्यांना विनम्र अभिवादन.

**- संपादक**

## 'आंतरभारती'चे स्वप्न दूर जात आहे!

'साधना'चा ११ जूनचा 'साने गुरुजी स्मृतिदिन विशेषांक' वाचून 'आंतरभारती'चे स्वप्न नजिक येण्याऐवजी कित्येक योजने दूर जात आहे, असे माझ्यासारख्या वाचकाला वाटले तर नवल नाही. स्वातंत्र्योत्तर भारत एकजिनसी होण्याच्या प्रगतीपथावरून भाषा, विकास, स्थानिक व बाहेरचे, आहे रे नाही रे, ज्ञातीची घट्ट वीण, आर्थिक विषमता, शैक्षणिक क्षेत्रातील गैरप्रकार या मुद्यांवरून विभाजनाच्या पुच्छप्रगतीकडे तर वाटचाल करीत नाही ना अशी शंका यावयास लागली आहे. प्रत्येक लोकसभा मतदारसंघ हा एक स्वतंत्र परगणा बनत चालला आहे. पक्षोपक्षांची युती किंवा आघाडी सत्तेचे लोणी कसे खाता येईल या एकमेव हेतूने आढळत आहे. इंग्रजांच्या मुत्सद्देगिरीबरोबरच सरदार, सुभेदार यांच्यामधील भांडणेही पेशवाई लयाला जाण्याची कारणे होती. सांप्रत विविध गट आपला मुद्दा, मत, विचारधारा सर्व समाजाने स्वीकारावी म्हणून संपूर्ण समाजाला वेठीस धरत चालले आहेत व त्यासाठी मानवी हत्या, राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान झाले तरी त्याची खंत नाही. त्यांना याचा बिमोड करण्यासाठी पावले न टाकल्यास आर्थिक, राजकीय, सामाजिक, भाषिक अराजकाला सामोरे जावे लागेल. सत्तेच्या अभिलाषेपासून दूर असणाऱ्यांनी (विचारवंतांनी) परिस्थितीचे वर्णन करण्यावर न थांबता निदान व उपाय यासंबंधात नि:पक्षपातीपणाने मते मांडण्याची गरज आहे. ११ जूनच्या अंकातील वर्णनात्मक माहिती परिस्थितीवरचे निदान व उपाय यांवर भाष्य करण्यात अपुरी ठरली असे मला वाटते.

आर्थिक विषमता वाढत आहे, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांची सत्ता बळकट होत आहे, कायदा मोडण्याकडे प्रवृत्ती बळावत आहे. प्रामाणिकपणे जीवन व्यतीत करणाऱ्यांमध्ये अगतिकता, अनुभवास येत आहे. अशावेळी 'साधना'सारख्या माध्यमांवरची जबाबदारी कसोटीच्या बिंदूवर पोचली आहे. तात्यासाहेब केळकरांना लिहिलेल्या एका पत्रात लोकमान्यांनी लिहिले आहे की, 'A Newpaper must be like a good balance- stable and sensitive at the same time.' साधना साप्ताहिकाच्या रचनेवरून व ध्येयवादी दृष्टीवरून समाजाचे योग्य प्रबोधन करण्यात साप्ताहिक कमी पडणार नाही याची खात्री आहे, पण समविचारी मंडळींचे साहाय्य साधनाने मिळवावे असे वाटते.

**वि. शं. गोखले**, पनवेल ४१०२०६

## साधनाची पुनर्भेट

गेली दहा-बारा वर्षे हिमाचल प्रदेशच्या गागल जिल्ह्यातल्या खनिज निर्मिती प्रकल्पात मी कार्यरत होतो. दीड महिन्यांपूर्वी बदली होऊन मुंबईत परतलो आणि मला हायसे वाटले. 'साधना'चा मी एक जुना वाचक. परंतु मराठमोळ्या देशापासून शेकडो कोस दूर राहिल्यामुळे माझे मराठी वाचन पूर्णतया खंडित झाले होते. साधनाचे जुने-नवे अंक साधना संकेतस्थळावर सहज वाचायला मिळतात, अशी माहिती मला गडचिरोलीच्या भैरव ताकखाव यांनी दिली होती. परंतु मला त्या संकेत स्थळावर एकदाही साधना अंक पाहता आला नाही. नवे तंत्रज्ञान लीलया आत्मसात करणे 'येरा गबाळ्याचे काम नाही' असा विचार मनात आणून पुढील प्रयत्न करणे मी सोडून दिले.

मुंबईत परतल्यावर साधना अंकाचे अलीकडचे अंक हाती लागले. अंक चाळताना काही गोष्टी नजरेतून सुटणे शक्य नव्हते. पहिली गोष्ट म्हणजे साधनाने साठ वर्षांची वाटचाल करून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. मुखपृष्ठावर कृष्णधवल छायाचित्रांच्या रूपात अवतरलेले लोकजीवन आणि काही अंकांच्या मुखपृष्ठावरील विख्यात चित्रकार पुरंदरेंच्या बहारदार कलाकृती माझ्या नजरेतून सुटल्या नाहीत. साधनाचे नवीन अंतरंग व बाह्यरूप पाहताना माझ्या डोळ्यावर माझा विश्वास बसत नव्हता. साधनाची वाढलेली वार्षिक वर्गणी ही गोष्टही कोणाच्याही नजरेतून सुटण्यासारखी नाही. महागाई वाढली म्हणून ही वर्गणीवाढ समर्थनीय वाटली तरी वाचकांना अंक वेळेवर पोहोचवण्याची जबाबदारी (मुळात सभासद नसलेल्या) टपाल खात्यावर टाकणे समर्थनीय वाटत नाही.

काही कामानिमित्त प्रवास करताना प्रभादेवी ते माहीम दरम्यान, रचना संसद कला संस्थेतील काही विद्यार्थी-विद्यार्थिनी माझ्यासह बसमधून प्रवास करीत होते. सांगण्याची खास गोष्ट म्हणजे त्यांच्या हातात पुरंदरे यांची चित्रे असलेला साधना अंक होता. आणि त्या चित्रांचे रसग्रहण चालू होते. मी हे दृश्य पाहून काहीसा अवाक् झालो. कला, साहित्य यांवर मी काय बोलणार? परंतु नव्या पिढीच्या हाती साधना अंक मी याचि डोळा पहात होतो!

इतर अंक पहात असता मला अनेक दर्जेदार लेखकांची नावे दिसली. डॉ. विठ्ठल प्रभू यांचा लैंगिकतेवरील लेख अत्यंत अभ्यसनीय वाटला. दर पंधरवड्याला लैंगिकतेवर एक पान साधनात असावे मला वाटते. सर्वच लेख दर्जेदार आणि तोलाचे लेखक असतील तर संपादकास तारेवरील कसरत करावी लागते. साधना संपादक महाशयांना ती नक्की करावी लागते हे नि:संशय. परंतु साने गुरुजींनी स्थापन केलेल्या साधनामध्ये 'बालसाधना' नियमितपणे-अनियमितपणे येते त्याचा आपल्याला खरोखर संतोष आहे का? काही दिवसांपूर्वी यशवंत क्षीरसागर यांच्या पत्ररूपी हृद्य आठवणीने असंख्य वाचकांना भरभरून आले असेल. त्या दृष्टीने साने गुरुजींच्या खांद्याला खांदा लावून कार्य करणाऱ्या भाग्यवंतांना गुरुजींच्या आठवणी लिहिण्याचे सुचवले तर ते अबालवृद्धांना वाचनीय वाटेल.

प्रधानसरांची सिद्धहस्त लेखणी अधूनमधून प्रसिद्ध न होता

सातत्याने झाली पाहिजे. अवधूतजींचे लेखन आजही मनात रुंजी घालते. माझ्या मताशी इतर वाचक कदाचित सहमत असतीलही.

डॉ. राहुल रेवले यांचे समाजवादावरील सुस्पष्ट विचार साधनाने प्रांजळपणे प्रसिद्ध करून सुदृढ पायंडा पाडला. त्यांच्या लेखावर दादा हासबनीस यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया 'आग सोमेश्वरी, बंब रामेश्वरी' या प्रकारातील वाटली.

**अंबिकाचरण विरुकोंडा,** माहीम, मुंबई ४०००१६.

## 'वारी'चे वेगळेपण

२८ जूनचा 'साधना' अंक खूपच आवडला. 'वारी'वर आजवर विपुल लेखन झाले आहे, परंतु केवळ छायाचित्रांच्या माध्यमातून घेतलेला वारीचा वेध अवर्णनीयच. संदेश भंडारे यांची 'चालती-बोलती' छायाचित्रे तांत्रिकदृष्ट्या अतिशय निर्दोष झाली आहेत.

त्यांनी स्वत: वारी करून आलेले अनुभव शब्दबद्ध केले आहेत. ते वस्तुनिष्ठ व वास्तववादी चित्रण आहे. त्यात 'म.फुले यांना ब्राह्मण संतांविषयी शंका वाटत होती' असे विधान केले आहे, परंतु याबाबत स्वत: म.फुल्यांच्या एखाद्या अवतरणाचा अथवा विधानाचा संदर्भ मात्र दिलेला नाही.

वास्तविक पाहता महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या इतिहासात वारकरी सांप्रदायातील संतांचे सर्वाधिक योगदान आढळते. संस्कृतातील तत्त्वज्ञान प्राकृतात आणण्याचे ज्ञानदेवांचे मूलभूत कार्य असो किंवा समाजव्यवस्थेतील त्रुटींवर कडक शब्दांत प्रहार करून भारुडे, गवळणी इत्यादी लोकभाषेतल्या रचना करणारे एकनाथ असोत. सामाजिक समरसतेची ही अधिष्ठानेच होत. समाजाच्या कर्मठपणाचा जाच 'ब्राह्मण' ज्ञानेश्वरांनीही त्यांच्या बालपणी भोगलेलाच होता. पण पसायदानाची रचना करताना ज्ञानदेवांनी **जो जे वांच्छील तो ते लाहो । प्राणिजात!** असे म्हटले. 'ब्राह्मणजात' नव्हे. पुण्याच्या स.प.महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आणि वारकरी सोनोपंत दांडेकर यांची आठवण आजही वारीच्या निमित्ताने काढली जाते. स्वत:च्या पदाची, ज्ञातीची झूल उतरवून ते वारकऱ्यांच्या मांदियाळीत झोकून देत असत. तेच काय पण त्यांच्यासारखे कितीतरी 'ब्राह्मण' वारीकडे अक्षरश: ओढले जातात, त्यात कसलाही किंतु नसतो. ना उच्चवर्णाचा, ना पदाचा. पंढरपूरच्या विठोबासमोर उपोषण करणारे साने गुरुजी आणि रत्नागिरीत पतित पावन मंदिर स्थापणारे सावरकर याच परंपरेचे पाईक होत.

संतांनी आपापल्या कुवतीप्रमाणे समाजाला सांगायचा प्रयत्न केला, परंतु समाजाने आपल्यात बदल घडवून नाही आणला तर संतांचे मूल्यमापन करून उपयोग काय? परंतु भूतकाळात काय, किंवा भविष्यकाळात काय ज्ञानेश्वर आणि तुकाराम हे ब्राह्मणसहित बहुजन समाजाला 'माऊली' व 'जगद्‌गुरु' असतील यात शंका नाही.

**अमेय रानडे,** मुंबई .

## नको : अवास्तव प्रसिद्धी, बौद्धिक पाजणे

२६ जुलैच्या साधना अंकातील अशोक राजवाडे आणि संतोष खेडलेकर यांचे लेख वाचले. या अंकातील इतर लेख अतिशय अभ्यासनीय आहेत. परंतु वरील लेखकांचे साहित्य दर्जेदार नाही. कुठे तरी लॅटिन अमेरिका व तेथील वाहणारे लिबरेशन थिऑलॉजीचे वारे? साठीच्या दशकात होऊन गेलेल्या व जागतिक

## श्रेयस-प्रेयसाचे महत्त्व वस्तुनिष्ठ भूमिकेतून...

'संतांनी काय शिकवले?... आपण काय शिकलो?' हे २८ जून आणि १२ जुलैच्या अंकातील लेख वाचले. आजच्या सामाजिक वास्तवाच्या पार्श्वभूमीवर संतविचारातील शाश्वततेचे मर्म अभय टिळक यांनी यथार्थपणे विशद केले आहे. हे दोन्ही लेख समाजातील सर्व घटकांच्या विचारांना चालना देणारे आणि त्यांना अंतर्मुख करणारे आहेत. निरिश्वरवादी, विज्ञाननिष्ठ, व बुद्धिप्रामाण्यवादी वैचारिक भूमिका समाजाच्या दृष्टीने निश्चितपणे उपयुक्त ठरणारी असली तरी तिचे आवाहन जनसामान्यांपर्यंत नीटसे पोहोचत नाही. अशावेळी ज्याची नाळ परंपरेशी विशेषत: संतपरंपरेशी जोडली गेली आहे, अशा समाजाला परंपरेतील श्रेयस-प्रेयसाचे महत्त्व वस्तुनिष्ठ भूमिकेतून समजावून देणे आवश्यक असते. उपरोक्त लेखातून ते आले आहे. याच प्रकारचे समाजप्रबोधनपर विचार संत कबीर (उ.प्रदेश), श्री बसवेश्वर व अक्क महादेवी (कर्नाटक), वेमन्ना (आंध्र प्रदेश) आदी भारतीय पातळीवरील संतांनीही आपल्या काव्यातून व्यक्त केले आहेत. स्वामी विवेकानंदांच्या विचार आणि कृतींमागेही समाजहिताची तळमळ आहे. नजिकच्या भूतकाळात संत गाडगेबाबा आणि तुकडोजी महाराजांनी केलेल्या सेवाभागी कार्यामागे संतविचारांचीच प्रेरणा आहे. १९ आणि २० व्या शतकातील सामाजिक-राजकीय क्षेत्रात क्रियाशील असलेल्या मान्यवरांच्या कार्यामागेही संतविचारांचे अधिष्ठान होते. मात्र या सर्वांच्या भूमिकेचा आणि त्यांच्या कार्याचा कृतिशीलपणे किती पाठपुरावा समाजाने आजवर केला आहे, हा प्रश्न संवेदनशील लोकांना छळणारा आहे. अभय टिळक यांनी सामाजिक-राजकीय जीवनातील विसंगती-विरोधाचा निर्देश केला आहे. स्वतंत्रपणे चर्चा करण्याजोगा तो व्यापक विषय आहे. संतांच्या विधायक विचारांपासून दुरावलेल्या, संकुचित परंपरावादी विचारांचा स्वीकार करणाऱ्या आणि चंगळवादी जीवनशैलीचा मोह बाळगणाऱ्या समाजघटकांनी थोडे मागे वळून पाहिले तर समाजहितकर असे बरेच काही हाती लागेल, ही वस्तुस्थिती त्या दोन लेखांतून सूचित होते.

**वि. शं. चौघुले,** सांताक्रूझ, (पश्चिम) मुंबई ४०००५४

इतिहासातील या क्षुल्लक घटनांना अवास्तव प्रसिद्धी राजवाडे कशासाठी देतात?

अमरनाथ यात्रा आणि पंढरपूरची वारी यांची स्वत:ला पटत नसूनही संतोष खेडलेकर यांनी केलेली तुलना म्हणजे प्रवासवर्णनाच्या निमित्ताने बौद्धिक पाजण्याचा प्रयत्न आहे. आज कित्येक वर्षे पंढरपूरची वारी वर्षातून दोन वेळा पार पाडली जाते. खेडलेकर यांनी म्हटल्याप्रमाणे शेतीची नासधूस, गावात घाण झाली असली तर त्याबद्दल कुठेही वाचनात आलेले नाही. असे वाईट प्रकार खेडलेकर यांच्या वारीत घडले असल्यास त्यांनी त्याबद्दल कोणती जबाबदारी उचलली आहे?

**विनोद जमदाडे,** दादर, (प.) मुंबई २८

## तत्परतेने दखल

२१ व २२ जुलै रोजी संपन्न झालेल्या लोकसभेच्या विशेष अधिवशनातील केंद्र सरकारवरील विश्वासदर्शक ठरावावरील चर्चेला उत्तर देणारे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे श्री.विनोद शिरसाठ यांनी अनुवादित केलेले भाषण साधनाने २ ऑगस्टच्या अंकात छापून तमाम मराठी भाषकांच्या मतांची कदर केली आहे. मुख्य म्हणजे जे कारण दाखवून सरकार पाडण्याचा प्रयत्न झाला, त्याबाबत सरकारची बाजू मांडणारे भाषण (विरोधी पक्षांच्या सदस्यांनी गदारोळ केल्यामुळे) पंतप्रधानांना करता आले नव्हते. शिवाय दुसऱ्या दिवशी मोजक्याच इंग्रजी दैनिकांनी ते छापले. त्यामुळे सामान्यांपासून-असामान्यांपर्यंत सारेच मराठीजन एका महत्त्वपूर्ण आणि देशाच्या एकूण प्रगतीचा आलेख मांडणाऱ्या या भाषणास मुकले होते. आपण तत्परतेने याची दखल घेतलीत, त्याबद्दल धन्यवाद.

**शंभू भाऊ बांदेकर,** साळगाव, गोवा.

## 'व्यासपीठ' व 'तळटीप' आवडते

'साधना' साप्ताहिक सातत्याने संपूर्ण वाचले जाते. प्रतिक्रिया लिहिणे होत नाही हे खरे, पण अंक उत्तम असतात. 'व्यासपीठ'मध्ये आलेले अच्युत गोडबोले व अभिजित वैद्य यांचे लेख फार आवडले. त्यांच्या विचाराला आचाराचे बळ आहे. 'आरोग्य सेना'च्या माध्यमातून ते करीत असलेले कार्य मोलाचे तर आहेच, पण आशा वाटावी असे व्हिजन-स्वप्न त्यांचेकडे आहे. अशी स्वप्ने असलेले तेजाचे ठिपके समाजामध्ये भरपूर आहेत. (उदा. अभय बंग, राणी बंग, श्री व सौ.मंदा आमटे असे कितीतरी...) परंतु हे सर्व ठिपके छान जोडून त्याची रांगोळी होत नाही, ती व्हावी असे वाटते. अभिजित वैद्य यांचे लेख तरुणांपर्यंत पोहोचवायला हवेत. 'साधना' फार मोठे वैचारिक व्यासपीठ आहे, याचा आनंद व अभिमान आहेच. पण आता विचार थेट आचारात परावर्तीत होण्यासाठी काय करता येईल याचाच विचार व्हावा. आसाराम लोमटे 'तळटीप'मध्ये ग्रामीण माणसांची दु:खे, कष्ट, प्रश्न प्रभावी पद्धतीने मांडीत आहेत. त्यांचे लेखन उत्तम व शैलीदार आहे.

**लीला दीक्षित,** कोथरूड, पुणे २९.

## पंतप्रधानांचे भाषण

२ ऑगस्टच्या अंकात विश्वासदर्शक ठरावावरील चर्चेला उत्तर देणारे पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांचे भाषण संपूर्णपणे वाचकांना सादर केल्याबद्दल धन्यवाद . आमच्या लोकशाहीचे दुर्दैव असे की देशाच्या सर्वोच्च सभागृहात सरकारवरील विश्वासदर्शक ठरावावरील चर्चेला उत्तर देणारे देशाच्या पंतप्रधानांचे भाषणच करंट्या व दळभद्री विरोधी पक्षांनी होऊ दिले नाही. दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात त्या भाषणातील त्रोटक भागच देशवासीयांना वाचावयास मिळाला. (काही दैनिकांनी नंतर त्याचा गोषवारा छापला, परंतु सविस्तर नाही). पंतप्रधानांनी त्या भाषणात अडवाणी यांनी केलेल्या टीकेला दिलेले उत्तर, तेलाच्या किंमतीत प्रचंड भाववाढ झाल्याने निर्माण झालेली चलनवाढ व महागाईसंदर्भात दिलेले उत्तर, रोजगार कार्यक्रम, सर्वशिक्षा अभियान, पायाभूत सुविधांसाठीचा भारत निर्माण कार्यक्रम या संदर्भातील केलेले विवेचन, उच्च शिक्षणासाठी उभारलेली नवी विद्यापीठे, महाविद्यालये याविषयी दिलेली माहिती, तसेच अणुकरारामुळे देशाच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणाला बाधा येणार नाही हे ठाम निवेदन आणि जनतेला माहीतही अणुकराराचे फायदे नसलेले सविस्तरपणे नमूद केले आहेत.

त्यात जगातील विविध देशांबरोबरच्या भारताच्या संबंधाचीही विस्तृतपणे चर्चा केली आहे. डाव्या पक्षांनी कठोर टीका केली तरीही त्यांनी ज्योती बसू व सुरजित यांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्यांच्या भाषणातील शेवटचा परिच्छेद वाचताना हे जाणवते की हे देशाला लाभलेले 'मनमोहक सज्जनसिंग' आहेत. पुनश्च एकदा पंतप्रधानांचे सविस्तर भाषण साधनेत छापल्याबद्दल संपादकांचे अभिनंदन!

**फुलचंद सांकला,** कोथरूड, पुणे २९

## जाहीर वाचन

या वर्षातील साधनाचे अंक (विशेषांकासह) आम्हा भोपाळवासीयांना अत्यंत वाचनीय वाटले. साधनाच्या मुखपृष्ठावरील छायाचित्रे साधनाची शान वाढवतात, परंतु 'साधनात महिला लेखिका दिसत नाहीत' असे आमच्या मंडळातील सभासद शिला मुद्‌गल यांचे मत आहे. आपल्याला कळविण्यास संतोष वाटतो की डॉ.प्रकाश जोशी यांची 'गणित म्हणजे काय रे काका?' ही बालसाधनातील लेखमाला येथील विद्यार्थ्यांना आवडते.

दर पंधरवड्यातून एक दिवस, म्हणजे रविवारी आमच्या महाराणा प्रताप चौकात साधना अंकातील साहित्याचे जाहीर वाचन केले जाते. गेल्या महिन्यात झालेल्या साधना वाचन कार्यक्रमात य.ब. क्षीरसागर यांनी साने गुरुजींना लिहिलेले पत्र वाचून दाखवण्यात आले. क्षीरसागर यांचे एक नजिकचे दोस्त भाई देशमाने त्या पत्रवाचनाने खूप भारावले.

हेमंत देसाई यांच्या 'सज्जनसिंग' या लेखाचे जाहीर वाचन व्हावे

असे आवाहन साधनात एका पत्रलेखकाने केले आहे. कळविण्यास आनंद वाटतो की 'सज्जनसिंग' हा लेख आमच्या मंडळाच्या सौ.गीता सबरवाल यांनी न अडखळता वाचून दाखवला व श्रोत्यांनी टाळ्यांचा मोठा गरज केला.

**दामोदर भानुशाली,** महाराणा प्रताप चौक, भोपाळ ११.

## विचार करा, उत्तर द्या!

साधना साप्ताहिकाच्या एकंदरीत स्वरूपाबद्दल हे एक पत्र. आपण प्रचलित घटनांचे विश्लेषण करीत असता, परंतु आज धावत्या व वेगाने पळणाऱ्या घडामोडींशी जुळवून घेणे आपल्याला जमतेच असे नाही. त्यात आपण विशेषांक काढता, मग एक आठवडा रजा घेता. याच काळात घडलेल्या काही महत्त्वाच्या घटना आपल्या अंकातून निसटतात, याचे काय? मध्यंतरी ११ जून विशेषांक आला, त्यानंतरचा अंक २८ जूनला मिळाला. त्या विशेषांकाने एक अभ्यास सादर केला. परंतु केतकर यांच्या घरावर नव्हे पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर हल्ला ही महत्त्वाची घटना व टीपणी त्यावरील साधनात दिसलीच नाही. आता पुन्हा १५ ऑगस्टचा विशेषांक येत आहे, मग पुन्हा दिवाळी सुट्टी!!!

संपादक महाशय, शिवाय पोस्टाच्या मेहेरबानीमुळे साधनाचा शिळा अंक आम्ही किती दिवस वाचावा? विचार करा आणि उत्तर द्या.

**गजानन साळुंके,** गिरगाव, मुंबई ४.

## पुन्हा एकदा आठवण...

साधना साप्ताहिकाच्या ३२ पानांच्या मर्यादा वाचकांना समजण्यासारख्या आहेत. पण साधना हे केवळ विचारवंत व साहित्यिक वर्गात वाचले जात नसून छोटे व्यावसायिक, शेतकरी, कामगार वर्गही साधनाचे वाचक आहेत. त्यामुळे साधनात प्रसिद्ध होणाऱ्या साहित्याविषयी बोलायचे झाल्यास ते सर्वसामान्यांच्या आवाक्यातील असावे असे वाटते. अमेरिका, आखाती देश येथील घडामोडींवर व राजकारणावर साधनातील खूप जागा व्यापली जाते असे वाटते, नव्हे हे सत्य आहे. जागतिक स्तरावरील बातम्या त्रोटकपणे द्याव्यात, कारण या बातम्या वृत्तपत्रातून, नियतकालिकातून वाचकांना वाचायला मिळत असतात. वृत्तपत्रात न आलेले साहित्य व माहिती साधनातून दिली जाते, या साधना संपादकांनी दिलेल्या ग्वाहीची पुन्हा एकदा आठवण करून द्यावीशी वाटते म्हणून हे पत्र.

**अर्जुन घोडेस्वार,** स्नेहनगर, परळी वैजनाथ १५.

## तमे केम छो यशवंत!

काही दिवसांपूर्वी मुंबईला गेलो असताना मला यशवंत क्षीरसागर यांनी 'साधना'त साने गुरुजींना लिहिलेले पत्र वाचायला मिळाले. या पत्रामुळे साने गुरुजी यांच्या आठवणी दाटून आल्या आणि आमचा जुना साथी यशवंत याचीही पुनर्भेट झाली. मी सध्या ८३ वर्षीय असून माझे बालपण व तारुण्य मुंबईच्या परळ भागात गेले.

यशवंतापेक्षा मी मोठा असलो तरी माझ्यासह इतरांना तो एखाद्या नेत्याप्रमाणे वाटे. वर्णाने सावळा, अंगाने बारीक असा यशवंत कोणतेही काम नाकारत नसे. दर आठवड्याला बुधवारी-गुरुवारी तो आम्हाला दिसायचा नाही. तो साधना अंकाच्या घड्या करण्यास सात-रस्त्याला जातो असे नंतर कळले. 'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे' हे गुरुजींचे गीत जेव्हा यशवंत गात असे, तेव्हा ते ऐकणाऱ्यांच्या डोळ्यात अश्रूंची धार लागे. ती आठवण आजही ताजी वाटते.

**मोहनदास मेहता,** भावनगर, गुजरात

## गोरेगावचा लेखक हे कसे विसरतो?

१५ जुलैच्या 'साधना' अंकातील रमेश पाध्ये यांचा 'किरकोळ विक्री'च्या व्यवसायाविषयी लेख वाचला. लेखकाने या व्यवसायात बड्या उद्योगपतींच्या पदार्पणाचे आलेल्या सावटाचे वर्णन केले आहे. अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठात ई.चौपाल या पर्यायी व्यवस्थेचा अभ्यास करण्यात आल्याची माहिती देऊन या पद्धतीचे लाभ सांगितले आहेत. मुंबई-पुण्यासारख्या वाढत्या लोकसंख्येच्या महानगरात तर मॉल्सचे पेव फुटले आहे. लेखकाने ही सारी परिस्थिती मांडून सरकारकडे मदतीची अपेक्षा व्यक्त केली आहे.

परंतु या क्षेत्रातील सहकारी संस्थांचे काय? लेखकाने कुठेही त्याचा उल्लेख केला नाही हे खटकले. मुंबईत एकेकाळी आघाडीवर असलेली 'मुंबई कामगार' ही संस्था आज मात्र डबघाईला आली आहे. त्यांच्या दुकानात गेल्यावर रिकामे रॅक्स आणि ठराविक ब्रँडस पाहून त्यांचे एकेकाळचे दिवस आठवतात. नानासाहेब गोरे-एसेम यांच्या आशीर्वादाने कामगार वस्तीतील काही समाजवादी लोकांनी ही संस्था कष्टाने वाढवली, साठ वर्षे होता होता संस्था थकली! मध्यंतरी तर मुंबई कामगारच्या संचालकांनी त्यांची वाशी व नायगाव येथील जागा विकण्याचा निर्वाणीचा घाट घातला होता. तो जागरूक भागधारकांनी उधळून लावला. मॉल्स जे काही उपलब्ध करून देत आहेत, ते अपना बाजारला जमू नये याचे कारण त्यांना नव्या युगाशी, स्पर्धेशी झुंजायची इच्छाच नसावी. किराणा मालापुढे ते जातच नाहीत, असे माझे गेल्या २०/२५ वर्षांचे निरीक्षण आहे. संचालक मंडळे बदलूनही त्यांचे रडगाणे कायम आहे. पण हे सारे रमेश पाध्ये यांना दिसले नाही याचे आश्चर्य वाटते. किरकोळ विक्री व्यवसायावर लिहिताना मुंबईचा गोरेगाव येथे राहणारा लेखक (रमेश पाध्ये) अपना बाजारला कसा काय विसरतो? त्यांनी या संबंधात आपले विचार मांडावेत. अपना बाजारवाल्यांना स्पष्ट शब्दांत मार्गदर्शन करावे. आज ती गरज आहे. गेली सात-आठ वर्षे भागधारकांना डिव्हिडंड न देणाऱ्या या सहकारी संस्थेकडे ती समाजवाद्यांनी चालवली म्हणून 'साधना'ने दुर्लक्ष करू नये. साधनात हेही आले पाहिजे.

**विनायक देशपांडे,** गोरेगाव (पूर्व), मुंबई ६३.

बालसाधना

## गणित म्हणजे काय रे काका : ६

# आततायीपणा नको

डॉ. प्रकाश जोशी

नेहमी उत्साही असणारा रोहन आज पडेल चेहऱ्यानं काकाच्या खोलीत प्रवेशत होता. काकालाही आश्चर्य वाटलं, काय बिनसलं असावं?

शाळेच्या क्रिकेट टीममध्ये त्याचा समावेश न झाल्यानं रोहन खट्टू होता. ६ फलंदाज निवडायचे होते. निवडीसाठी शाळेतर्फे ५ सामने खेळवले गेले. ५ जणांची निवड झाली होती. चुरस होती सहाव्या फलंदाजासाठी रोहन व समीर यांच्यात. समीरच्या धावांची सरासरी भरली २५ तर रोहनची २४. अगदी थोडक्यासाठी रोहनची संधी हुकली.

''निराश होऊ नकोस. प्रयत्न कर. पुढच्या वर्षी संधी मिळेल.'' काका समजूत घालत होता.

''मी शाळेच्या मैदानावर बैठा संप करायचं ठरवलंय.''

''ते का बाबा?'' काकाला हसू फुटलं.

''कारण टीमला समीरहून मी जास्त उपयुक्त आहे असं माझं ठाम मत आहे.''

''तू असं ठामपणे कसा काय म्हणू शकतोस?''

''कारण समीर भरवशाचा फलंदाज नाही. कधीतरी तो चांगली कामगिरी करतो. पण बऱ्याच वेळा लवकर बाद होतो.''

''निवडीसाठी खेळलेल्या तुझ्या आणि त्याच्या ५ सामन्यांच्या धावसंख्या सांगू शकतोस?''

''सांगतो ना, तोंडपाठ आहे. समीरच्या धावा होत्या ८९, ०, २, ३२ आणि २. सरासरी २५. माझ्या धावा २२, २७, १९, २२ आणि ३०. सरासरी २४.''

''तुझ्या बोलण्यात तथ्य आहे.'' आकड्यांवर नजर फिरवत काका बोलला, ''तुझी निवडच अधिक योग्य आहे. तुझ्या खेळात सातत्य आहे.''

''मग मी बसू संपाला?''

''बाबा रे संप, मोर्चा, बंद हे मार्ग आततायीपणाचे. सारे प्रश्न सामंजस्यानं चर्चेनं मिटवणं केव्हाही चांगलं. या बाबतीत डॉ.बंग यांचं उदाहरण देता येईल.''

''काय केलं त्यांनी?''

''बरीच जुनी गोष्ट आहे. रोजगार हमी योजनेचे दिवस. मजुरांना अत्यंत कष्टाचे काम करावे लागायचे आणि मजुरी मिळायची दिवसाला जेमतेम साडेचार रुपये. त्या पैशात भाकरी, भाजीसारखं अन्नदेखील पुरेसं मिळायचं नाही. अतोनात कष्टाला आवश्यक अशी ऊर्जा अपुऱ्या अन्नातून कशी मिळणार? मजुरी वाढवून मिळणं गरजेचं होतं. डॉ.बंग यांनी हा प्रश्न धसास लावला. त्यासाठी त्यांनी संप, रास्ता रोको, बंद अशा आततायी मार्गांचा अवलंब केला नाही. मजुराच्या कष्टाच्या कामाखातर दर दिवशी किती ऊर्जा खर्च होते याचं गणित मांडलं. एवढ्या ऊर्जेसाठी विविध प्रकारच्या अन्नपदार्थांचं किती सेवन केलं पाहिजे याचंही गणित केलं आणि त्या वेळच्या बाजार भावानुसार त्या अन्नपदार्थांचं पैशात मूल्य काढलं. ते आलं किमान साडेबारा रुपये. कमीतकमी एवढी तरी मजुरी मिळालीच पाहिजे याविषयी डॉ.बंग आग्रही होते. याशिवाय मजुरावर अवलंबून असणारं कुटुंब, मुलांचं शिक्षण, औषध-पाणी वगैरे मुद्दे होतेच. तथापि किमान साडेबारा रुपये मजुरी मिळवून देण्यात ते चर्चेद्वारे यशस्वी झाले. तुलादेखील आततायीपणा न करता शिक्षकांना त्यांची चूक ध्यानात आणून देता आली पाहिजे. तुझा मुद्दा सातत्य...''

''ऊर्जेचं गणित ठीक आहे, परंतु सातत्य गणितात कसं मांडायचं?''

''लक्षात घे, कोणतीही गोष्ट गणितात बसवता येते. तू तर तुझ्या शिक्षकांचे स्वभाव गणितात बसवले होतेस. सातत्य क्या चीज है? आता मला थोडं बाहेर जायचं आहे'' काका कपडे करता करता बोलला, ''दोन एक तासात मी परतेन तेव्हा सातत्याचं पाहू. तोवर तू... हां, नेहमीच्या खाद्य पदार्थातील उच्च ऊर्जेच्या पदार्थांसंबंधीचा हा तक्ता. तुझ्या घरातील प्रत्येकजण दर दिवशी सरासरी किती ऊर्जेचं म्हणजे कॅलरींचं सेवन करतो ते तू काढायचं.''

''सोप्पं तर आहे'' तक्त्याकडं पहात रोहन बोलला, ''हे पदार्थ दिवसाला किंवा महिन्याला किती खरेदी केले जातात याची माहिती मी आईकडून घेईन. त्यावरून या पदार्थांचं दर दिवसाचं कॅलरीमधील सेवन काढता येईल. आम्ही तीन माणसं म्हणून त्या संख्येला तीनानी भागलं की दरदिवशी दर माणशी

**१ किलो ग्रॅम अन्न पदार्थांची ऊर्जा (कॅलरीमध्ये)**

| पदार्थ | गहू | तांदूळ | ज्वारी | पोहे | खोबरे | तीळ | शेंगदाणे | केळी | दूध | साखर | गूळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उर्जा (कॅ) | ३४८० | ३४८० | ३५७० | ३५०० | ४४४० | ५६४० | ५४९० | १५३० | ११७० | ४२७० | ३५०० |

कॅलरी सेवन मिळेल.''

''मी परतायच्या आत कर म्हणजे झालं.'' काका निघून गेला.

काकानं दिलेला तक्ता असा होता...

आईकडून माहिती घेऊन रोहननं ऊर्जेचं गणित सोडवलं आणि तो काकाची वाट पहात बसला. काका येताना दिसताच तो त्याच्या खोलीत शिरला. काकाला कपडे बदलण्यासाठी फुरसतही त्यानं दिली नाही.

''काका, हे माझं उत्तर. आम्ही प्रत्येकजण दर दिवशी सरासरी २३२८ कॅलरी सेवन करतो.''

''ते ठिकाय, परंतु यात आणखी काही गोष्टी राहिल्यात.'' काका कपडे बदलता बदलता बोलला.

''आणखी काय राहिलंय?'' काकाचं दरखेपी काही तरी असतंच.

''तुझ्या घरात पाहुणे येत असतात. त्यांचं चहापाणी, जेवण होतं. ते तू हिशोबात धरलंस का?''

''राहिलंच की! परंतु तो हिशोब करायचा म्हणजे...''

''असा बावचळून जाऊ नकोस. तुमच्या घरी जसे पाहुणे येतात तसेच तुम्हीदेखील इतरांच्या घरी जात असता. तेव्हा तो हिशोब बरोबरीत धरला तरी चालेल. परंतु आणखी एक गोष्ट राहिलीय.''

''आता आणखी काय?'' रोहनच्या चेहऱ्यावर नाराजी.

''बऱ्याचदा तुम्ही बाहेरून खाद्यपदार्थ विकत आणता, तू बऱ्याच वेळा बाहेरचं आईस्क्रीम खातोस. तुझे बाबा तर रोज तीन-चार कप चहा बाहेर ढोसतात. ह्या गोष्टी हिशोबात नको धरायला? हिशोबात अगदी काटेकोर असावं लागतं एवढी गोष्ट लक्षात घे. आता तुझ्या जीवनमरणाचा प्रश्न, सातत्याचं गणित.''

रोहन सरसावून बसला.

''रोहन, तुझं अभ्यासाबाबतीत कितपत सातत्य आहे. म्हणजे प्रत्येक महिन्यात दर दिवशी, म्हणजे दर दिवशी सरासरी तू किती तास अभ्यास करतोस?''

आता हे नवीन झेंगट. मुख्य मुद्यावर येण्याआधी काका आणखी काही गणितं करायला लावणार. तोपर्यंत काकाचा फोन खणाणतो. फोनवर काका गुलूगुलू गप्पा मारायला लागतो. प्रश्नच नाही काकाच्या गर्लफ्रेंडचा फोन. आता १५-२० मिनिटांची गच्छंती.

दर महिन्याला आपण किती अभ्यास करतो, रोहन आठवू लागला. जून महिना आणि अभ्यास यांचा ३६ चा आकडा. कधी मधी गृहपाठ करावा लागतो. या महिन्याचा अभ्यास दर दिवशी सरासरी १५ मिनिटे = ०.२५ तास धरायला हरकत नाही. जुलै पावसाचा महिना. बराच वेळ घरी जातो. तेव्हा पुस्तकात डोकं खुपसतो. दर दिवशी सरासरी १ तास? ठिकाय. ऑगस्ट महिना वर्षाभटकंतीचा. दर दिवशी सरासरी अर्ध्या तासाचा. सप्टेंबर महिना पुन्हा तासाभराचा. ऑक्टोबर महिना सहामाही परीक्षेचा. रोज सरासरी ४ तास तरी अभ्यास होतोच. नोव्हेंबर महिना दिवाळी सुट्टीचा, तेव्हा अभ्यासाला सुट्टीच. तो महिना हिशोबात घ्यायचाच नाही. डिसेंबर पुन्हा अर्ध्या तासाचा. जानेवारी एखादा तास. फेब्रुवारीत शाळेचा क्रीडाउत्सव आणि गॅदरींग, अभ्यासाला जेमतेम अर्धा तास. मार्च आणि एप्रिल हे खडतर महिने, अनुक्रमे दर दिवशी ५ आणि १० तासांचे. रोहननं अभ्यासांच्या महिन्यांची दरदिवशी वार्षिक सरासरी काढली. ०.२५+१.०+०.५+४.०+०.५+१.०+०.५+५.०+१०.०) / ९ = २.५३ तास. सरासरी सुमारे अडीच तास.

काकानं मोठ्या खुषीत फोन खाली ठेवला. रोहनचं गणित पाहू लागला.

''पहा, ह्या ९ महिन्यातील ६ महिने तू सरासरीपेक्षा फारच कमी अभ्यास करतोस आणि ३ महिने सरासरीहून बराच जास्त. याचाच अर्थ तुझ्या अभ्यासाच्या वेळापत्रकात सातत्य नाही. ते कसं राखायचं ते तुझं तू पहा. आता सातत्याचं मूल्यांकन गणितानं कसं करायचं ते मी सांगतो.''

**डॉ. प्रकाश जोशी**
१०, विक्रम को-ऑप. हौसिंग सोसायटी,
टिळकनगर, जिजामाता रोड, ठाणे ४००६०३
फोन : (022) 25326690

## महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम)

### अनुभवी स्त्री समुपदेशक हवी आहे

संस्थेच्या सासवड, ता. पुरंदर येथील 'संवाद' या स्त्रियांवरील हिंसेमध्ये हस्तक्षेप करणाऱ्या सल्ला-मार्गदर्शन केंद्रासाठी अनुभवी समुपदेशक (कौंसेलर) हवी आहे.

**शैक्षणिक पात्रता :-** एम. एस. डब्ल्यू किंवा एम.ए. (सायकॉलॉजी)

**अनुभव :-** किमान ४ ते ५ वर्षांचा अनुभव असावा.

**संपर्कासाठी पत्ता- 'मासूम'**, ४२ कुबेरा विहार, ६ वा मजला, हडपसर, गाडीतळाजवळ, पुणे ४११०२८.

फोन : ०२०-२६९९५६२५ / ३३

E-mail - masumfp@vsnl.com. website - masum-india.org

## जाहिर दरपत्रके

सहसंचालक, आरोग्य सेवा, (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) राज्य आरोग्य सोसायटी **(NVBDCP)** पुणे-०६ हे खालील तपशीलानुसार दैनंदिन किटकशास्त्रीय सर्व्हेक्षण नोंदवही छपाई करुन घेण्याबाबत पुरवठादारांकडून जाहिर दरपत्रके मागवित आहे.

| तपशील | दरपत्रके स्विकारण्याची अंतिम तारीख. | दरपत्रके उघडण्याची तारीख. |
|---|---|---|
| **किटकशास्त्रीय सर्व्हेक्षण नोंदवही छपाई :-** ८.५"×११" आकार, एकूण ६४ पाने, आतील पाने ८० जीएसएम मॅपलिथो पेपरवर १ रंगात (फ्रंट/बॅक) छपाई व कव्हर जाड खाकी रंगाचे व त्यावर १ रंगात छपाई तसेच सेंटर पिनिंग बाईडींग सह तसेच २५ नोंदवहीचे १ गठ्ठा प्रमाणे बंडल बाधून, एकूण १३५०० नग सर्व्हेक्षण नोंदवहींचा पुरवठा करणे. | दिनांक- २५.०८.२००८ ते ०५.०९.२००८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | दिनांक- ०६.०९.२००८. |

पुरवठादारांनी किटकशास्त्रीय सर्व्हेक्षण नोंदवही छपाई करुन पुरवठा करणेसाठी दरपत्रकांचे सीलबंद लखोटे दिनांक -०५.९.२००८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत संहसंचालक, आरोग्य सेवा, (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) राज्य आरोग्य सोसायटी **(NVBDCP)** पुणे, आरोग्य भवन, सर्व्हे नं.९४/१ए, आळंदी रोड, विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर, येरवडा पुणे-४११ ००६ या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत भांडार शाखेत सादर करावेत. त्यानंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दरपत्रकांच्या लखोटयांवर (किटकशास्त्रीय सर्व्हेक्षण नोंदवही छपाई दरपत्रके) असे स्पष्ट नमूद करावे.

सदरील प्राप्त दरपत्रकेही दिनांक ०६.९.२००८ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील.

### अटी व शर्ती

१) पुरवठादारांनी संस्था नोंदणी प्रमाणपत्रा व सेल्स टॅक्स (व्हॅट) २००७-०८ या वर्षा अखेरीस पर्यंतचे निपटारा प्रमाणपत्र **(Sales Tax Clearance Cerfificate)** दरपत्रका सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) दरपत्रकासोबत किटकशास्त्रीय सर्व्हेक्षण नोंदवहीचा नमुना **(Sample)** असणे आवश्यक आहे. नसल्यास दरपत्रक उघडले जाणार नाही.

३) दरपत्रके सादर करणाऱ्या पुरवठादारांची वार्षिक उलाढाल किमान दोन लाख रुपये असावी.

४) मागील दोन वर्षात शासकिय कार्यालयास पुरवठा केल्याबाबतच्या कामाचा अनुभव असावा.

५) दरपत्रकांमध्ये सर्व करांचा समावेश असावा. सर्व्हेक्षण नोंदवहीचा पुरवठा हा या कार्यालयाच्या वरील पत्त्यावर करावा.

६) सर्वात कमी दर असलेल्या व गुणवत्ता सिध्द केलेल्या पुरवठादारासच काम देण्यात येईल.

७) सदरील मालाचा पुरवठा हा पुरवठा आदेश दिल्यापासून ३० दिवसांत करणे आवश्यक आहे.

८) स्थानिक, शासकिय, निमशासकिय सहकारी तत्वावरील पुरवठादारांचा प्राधान्याने विचार केला जाईल.

९) सर्वात कमी दर अथवा अनेक दरपत्रके मान्य अथवा अमान्य करण्याचा अधिकार मा. सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप,हत्तीरोग व जलजन्यरोग) पुणे यांनी स्वत:कडे राखून ठेवलेला आहे.

सहसंचालक, आरोग्य सेवा,
(हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) पुणे-६

विमाका-पुणे-जाहि-३९५-२००८-२००९

साधना साप्ताहिक : ३० ऑगस्ट २००८

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र. एल-२/आर.एन.पी./पी.एन.डब्ल्यू./डब्ल्यू/६८/२००६-२००८
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं. ७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केटयार्ड पी.एस.ओ. सॉर्टिंग ऑफिसमधून

ग्रामीण जीवनाच्या विविध भावनांचे अस्सल ग्रामीण बाजात वर्णन करणारा साहित्य अकादमी पुरस्कार विजेते सदानंद देशमुख यांचा नवीन कथासंग्रह.



खुंदळघास

विनामूल्य मिळवा

मूळ किंमत : रु. २२५.००

पॉप्युलर मित्रमंडळ

सभासदांसाठी एक विशेष ऑफर

- आपण पॉप्युलर मित्रमंडळाचे सभासद असाल तर आजच दोन नवीन सभासद मिळवून द्या आणि आपली प्रत आजच मिळवा.
- आपण पॉप्युलर मित्रमंडळाचे सभासद होऊ इच्छित असाल तर रु. १००/- प्रतिवर्षीप्रमाणे दोन वर्षांची वर्गणी रु. २००/- एकत्र भरून मित्रमंडळाचे सभासदत्व आणि खुंदळघास या कथासंग्रहाची प्रत विनामूल्य मिळवा.

पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.

३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई -२६ ● दूरध्वनी:२३५३०३०३ ● फॅक्स:२३५३५२९४
Email : info@popularprakashan.com Website: www.popularprakashan.com